ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १४ ऑक्टोबर, १९५९ | अंक ४१

## विविध माहिती

**सुशिक्षित बेकारांना काम**—दिल्ली येथील उद्योग-विनिमय केंद्रानें सुशिक्षित बेकारांना दिवसांतून कांहीं वेळ काम देण्याची योजना आखली आहे. टंकलेखक, हिशेब ठेवणारे कारकून, खाजगी शिकवण्या करणारे शिक्षक, मोटार ड्रायव्हर्स, इत्यादि लोकांना अशीं कामें देण्याचा प्रयत्न प्रयोग म्हणून करण्यांत येणार आहे. केंद्रानें पार्लमेंटचे सभासद आणि वकिलांची असोसिएशन ह्यांचें सहकार्य घेण्याचें ठरविलें आहे.

**कोळशाच्या खाणींत दोरांचा पूल**—जम्मूपासून ७५ मैलांवर असलेल्या एका कोळशाच्या खाणींत १२ मैल लांबीचा एक दोरांचा पूल बांधण्याचें काश्मीरच्या सरकारनें ठरविलें आहे. ह्या पुलासाठी ५० लाख रुपये खर्च करावे लागतील. पुलामुळें कोळशाच्या खाणीचें उत्पादन दरमहा १०,००० टनानें वाढणार आहे.

**जंगलें वाढविण्याच्या योजना**— भारताच्या अन्न व शेतकी खात्यानें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जंगलांच्या वाढीसाठी कांहीं योजना तयार केल्या आहेत. त्या अमलांत आणण्यासाठी ११७ कोटी रुपये लागणार आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ह्या कामासाठी १७ कोटी रुपये व दुसऱ्या योजनेंत ४७ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती.

**सिरिआंतील नवा कारखाना**—मध्य सीरिआंत तेलाच्या शुद्धीकरणाचा एक नवा कारखाना सुरू करण्यांत आला आहे. हा कारखाना झेकोस्लोव्हाकिआच्या सहकार्यानें बांधण्यांत आला आहे. पश्चिम आशिआंत तेलाचे कारखाने उभारण्याचें काम आतांपर्यंत पश्चिम युरोपिअन देशच करीत असत. त्यांची मक्तेदारी मोडणारा हा पहिलाच कारखाना आहे.

**ब्रिटनची नेपाळला मदत**– नेपाळला डिझेल तेलावर चालणारे तीन जनरेटर्स ब्रिटननें मदतीदाखल देण्याचें ठरविलें आहे. ते बहुधा पुढील वर्षी पुरविण्यांत येतील. नेपाळच्या राजधानींतील विजेच्या पुरवठ्याची परिस्थिति त्यामुळें बरीच सुधारेल. ह्याशिवाय आणखीहि कांहीं मदत विकासकार्यासाठी ब्रिटनकडून नेपाळला मिळण्याची शक्यता आहे.

**पूर्व-जर्मनी व भारत ह्यांचा व्यापार**—पूर्व-जर्मनी व भारत ह्यांच्या दरम्यान पहिला व्यापारी करार १९५४ सालीं झाला. तेव्हांपासून उभयतां देशांतील व्यापाराची वृद्धि होत गेली आहे. १९५४ सालीं भारतानें पूर्व जर्मनीला ९९,००० रुपयांचा माल निर्यात केला होता; १९५८ सालीं भारतानें ३१३ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात केला. आयात व्यापारांतहि वाढ झालेली आहे.

**साखरेचा सांठा करण्याचा विचार**—मध्यवर्ती अन्न-खात्याचे मंत्री श्री. थॉमस ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, साखरेच्या किंमती भडकल्यास त्यांना आळा घालतां यावा म्हणून सरकार साखरेचा सांठा करण्याचा विचार करीत आहे. भारतामधून साखर निर्यात करण्याचें ह्यापुढें बंद करण्यांत आलें आहे, असेंहि त्यांनीं सांगितलें. अन्नधान्याचा सांठा करण्याच्या सरकारच्या धोरणाचाच हा भाग आहे.

**कामगारांना तीन महिन्यांचा बोनस**—मिरज तालुका गिरणी कामगार संघ आणि सांगली येथील माधवनगर कॉटन मिल्सचे चालक ह्यांच्या दरम्यान कामगारांना द्यावयाच्या बोनस-बद्दल करार करण्यांत आला आहे. करारांतील शर्तीप्रमाणें ६५० गिरणीकामगारांना तीन महिन्यांचा पगार बोनस म्हणून मिळणार आहे.

**साखरेचा सहकारी कारखाना**—कोपरगांव तालुक्यांत टाकळी येथें साखरेचा आणखी एक सहकारी कारखाना काढण्यास मुंबई सरकारनें अनुमति दिली आहे. श्रीरामपूर-कोपरगांव भागांत सध्या पांच सहकारी साखरकारखाने आहेत. राज्य सरकारकडून मध्यवर्ती सरकारकडे ह्या बाबतींत शिफारस करण्यांत आली आहे. तिचा बहुधा स्वीकार करण्यांत येईल.

**म्हैसूर राज्याची योजना**—कर्नाटकाच्या ग्रामीण भागांत रस्ते बांधण्याची व पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची मोठी योजना म्हैसूरच्या सरकारनें आंखली आहे. ह्या योजनेसाठी १२ कोटी रुपये खर्च येणार आहे. सुमारें १७,००० मैल लांबीचे रस्ते बांधण्यांत येणार असून पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या प्रत्येक खेडेगांवांत एक तरी विहीर खोदण्यांत येणार आहे.

**सौराष्ट्रामधील साखर-कारखाना**—राजकोटपासून ८० मैलांवर असलेल्या धोला ह्या गांवीं स्थापलेला साखरकारखाना पुढील हंगामापासून चालू करण्यांत येणार आहे. कारखाना चालविणें परवडेनासें झाल्यामुळें गेलीं कांहीं वर्षे तो बंद आहे. मुंबई सरकारनें तो चालू करण्याची व्यवस्था केली आहे. कारखान्यांत रोज ३५० टन उस गाळण्याची यंत्रसामुग्री आहे.

**कृत्रिम रबराचा कारखाना**—अमेरिकेंतील फायरस्टोन टायर अँड रबर कंपनीनें भारतांत कृत्रिम रबर तयार करण्याचा कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. कारखान्याच्या उभारणी-साठी तीन कोटी डॉलर्स लागतील. कृत्रिम रबर तयार करण्याचा भारतामधील हा पहिलाच कारखाना असेल. तो बहुधा उत्तर प्रदेशांत काढण्यांत येईल.

### पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकांतील वाढत्या सोयी

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेची सोय असलेल्या सर्व हेड तथा सब-पोस्ट ऑफिसांतून, १ ऑक्टोबर १९५९ पासून चेकद्वारें पैसे काढण्याची सवलत देण्यांत आली आहे. स्थानिक बँकांकरितां म्हणून देण्यांत आलेल्या चेक्सच्या बाबतींत बँकर्सचें कमिशन मिळणार नाहीं. तथापि, परगांवच्या चेक्सच्या बाबतींत, परगांवच्या बँकांसाठी देण्यांत आलेल्या चेक्ससाठीं प्रत्येक १०० रुपयांमागें १५ नये पैसे ( कमींत कमी १ रुपया ) कमिशन आकारण्यांत येईल. येत्या सुगीच्या हंगामांत अधिक स्मॉल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें देतां यावींत म्हणून सर्व पोस्ट ऑफिसांना सर्टिफिकेटें व फॉर्म्सचा पुरेसा पुरवठा करण्यांत यावा; तसेंच अल्प बचतीच्या बाबतींत मोठ्या प्रमाणावर कार्य करणाऱ्या जिल्ह्यांतील मुख्य ठाण्याच्या ठिकाणच्या पोस्ट ऑफिसला आणि जिल्ह्यांतील इतर ठिकाणच्या दोन पोस्ट ऑफिसांना राज्य सरकारकडून मान्यता देण्यांत यावी, असाहि निर्णय घेण्यांत आला आहे.

### चलनांत असलेलीं नाणीं

अधिकृत आंकडेवारीनुसार ३१ मार्च, १९५९ रोजीं या देशांत १६५८ कोटी रुपयांच्या नोटा (एक रुपयाच्या नोटा वगळून), १२१ कोटी रुपयांचीं एक रुपयाचीं नाणीं व एक रुपयाच्या नोटा चलनांत होत्या.

सन १९५८–५९ मध्यें २.२४ कोटी रुपयांचीं नवीं दशमान नाणीं चलनांत आलीं. यांत ९९ लाख रुपयांच्या १० नया पैशांच्या, ६४ लाख रुपयांच्या ५ नया पैशांच्या, ३० लाख रुपयांच्या २ नया पैशांच्या व ३१ लाख रुपयांच्या १ नया पैशाच्या, नाण्यांचा समावेश होतो.

रिझर्व्ह बँकेकडे १९५८–५९ मध्यें भारत सरकारच्या एक रुपयाच्या नोटांसुद्धां एकूण ५,४८९ बनावट नोटा आल्या. रेल्वे स्टेशनें व ट्रेझरींत ११.४ लाख खोटी नाणीं कापण्यांत आलीं. रिझर्व्ह बँकेनें ४८ लाख रुपयांच्या गहाळ, नष्ट झालेल्या व फाटलेल्या नोटांबाबत नुकसानभरपाईचे अर्ज स्वीकारून त्या बदल्यांत ४४ लाख रु. दिले.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था गिरगांव, मुंबई ४




अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें — मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष श्री. छोटालाल डी. शहा

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. ५६,००,००० |

★ चालू खातें व्याज ½ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १४ ऑक्टोबर, १९५९



संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

## इतर ग्रहांवर जीवसृष्टि आहे काय ?

जीवसृष्टीच्या उत्पत्तीबद्दल मनुष्याला जसें जबरदस्त कुतूहल वाटत असतें त्याचप्रमाणें पृथ्वी सोडून इतर ग्रहगोलकांवर मनुष्यवस्ती असेल काय ह्याबद्दलहि वाटतें. हा सर्वच प्रांत अद्याप मनुष्याच्या कल्पनासृष्टींत असला तरी त्याची सत्यासत्यता पारखण्याची शक्ति शास्त्रज्ञांना लवकरच येईल असें दिसतें. चंद्रलोकावर केलेलें यशस्वी आरोहण हेंच सांगतें. दरम्यान एका रशिअन ज्योतिर्विदानें असें म्हटलें आहे कीं, सूर्याच्या ग्रहमालिकांसारख्या १,५०,००० ग्रहमालिकांत जीवसृष्टि असण्याचा बराच संभव आहे; इतकेंच नव्हे तर त्यापैकीं कांहीं ग्रहगोलांवर माणसापेक्षाहि प्रगत झालेला "जीव" असणें शक्य आहे. ह्यांपैकीं कांहीं लोकांनीं अंतरिक्षभ्रमणाला सुरुवात केली असणें अगदीं शक्य आहे. मनुष्यानें अशा लोकांशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे अनंत अवकाशावर प्रभुत्व मिळविण्याच्या प्रयत्नांत यश येण्याचा संभव वाढेल. इतर ग्रहांवर उतरण्यासाठीं माणसाला जे प्रश्न सोडवावे लागतील त्यांचें स्वरूप चंद्रावर जाण्यासाठीं सोडविल्या गेलेल्या प्रश्नासारखेंच असेल. चंद्रावर वस्ती करण्याच्या योजना रशिआंत आतांपासूनच आखण्यांत येत आहेत. कदाचित् चंद्रावरील वस्ती होण्याचा प्रसंग कांहीं दशकापेक्षा अधिक लांबणार नाहीं. चंद्रावर बहुधा युरेनिअम व तत्सम खनिजें ह्यांचा बराच मोठा सांठा असावा असा अंदाज आहे. ह्या खनिजांचा उपयोग करून चंद्रावर अणुशक्तीचीं केंद्रें बांधतां येतील आणि त्यांच्या साह्यानें माणसाला लागणारी हवा निर्माण करतां येईल. रशिआची अग्निबाण सोडण्याची प्रगति इतकी झालेली आहे कीं, आजच मंगळावर व शुक्रावर अग्निबाण सोडणें शक्य आहे.

## भारताला अमेरिकेकडून मिळालेली मदत

भारताला अमेरिकेकडून मिळालेल्या आर्थिक व तांत्रिक मदतीचा आकडा गेल्या ऑगस्टपर्यंत १७४·९ कोटी डॉलर्सपर्यंत पोंचलेला होता. रुपयांच्या चलनांत मदतीची किंमत सुमारें ८३१ कोटी रु. होते. ह्या मदतींत देणग्या व कर्जें अशा दोन्ही प्रकारांचा समावेश आहे. त्याशिवाय अमेरिकेंतील फौंडेशन्स-सारख्या खाजगी अमेरिकन संस्थांनीं २० कोटी रुपयांची मदत केलेली आहे. कांहीं खास प्रकारच्या शिक्षणसंस्था आणि धर्मादाय संस्था ह्यांच्याकडून आणखी २४ कोटी रु. मदतीदाखल मिळालेले आहेत. ह्या सर्वांची बेरीज केली तर आठ वर्षांच्या कालांत भारताला अमेरिकेकडून ८७५ कोटी रुपयांची मदत मिळाल्याचें दिसतें. म्हणजे दरसाल ११० कोटी रुपयांची सरासरी मदत भारताला मिळत गेली आहे. सर्वांत अधिक रक्कम अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० प्रमाणें शेतीच्या मालाच्या कर्जाच्या रूपानें देण्यांत आली आहे. ह्या मालाची किंमत ३१२·६ कोटी रु. आहे. त्या खालोखाल आर्थिक व तांत्रिक साह्याच्या रूपानें २१२ कोटी रुपये मिळालेले आहेत. ह्या मदतींत ओरिसामधील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्यासाठीं दिलेल्या कर्जाचा समावेश आहे. मदतीच्या प्रकारांचें वर्गीकरण करावयाचें झाल्यास १७४·९ कोटी डॉलर्सपैकीं ४९·०३ कोटी डॉलर्स देणग्या म्हणून मिळालेले आहेत. शिवाय ३४·१६ कोटी डॉलर्स इतकें कर्ज मिळालेलें असून त्याची फेड डॉलर्समध्येच करावयाची आहे. ७२·८८ कोटी डॉलर्स इतकें कर्ज रुपयाच्या चलनांत फेडावयाचें ह्या अटीवर मिळालेलें आहे. १८·५ कोटी डॉलर्सची रक्कम बाजूला काढून ठेवण्यांत आली असून तीमधून योग्य स्थैर्य लाभलेल्या अमेरिकन व हिंदी कंपन्यांना कर्जें देण्यांत येणार आहेत.

## 'मनोहर' मासिकाच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्तानें

'मनोहर' मासिकाचा ऑक्टोबर, १९५९ चा अंक रौप्य महोत्सव विशेषांक म्हणून दि. ८ ऑक्टोबर रोजीं प्रा. गंगाधर गाडगीळ ह्यांच्या हस्तें प्रकाशित करण्यांत आला. साहित्य-कला क्षेत्रांत 'मनोहर'नें केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा वाचकांना परिचय आहेच. प्रस्तुत विशेषांकांत अधिकारी साहित्यिकांचें साहित्य योजनापूर्वक ग्रथित करण्यांत आलें असल्यामुळें तो अंक वाचनीय व संग्राह्य झाला आहे. किर्लोस्कर मासिकांचे संस्थापक श्री. शंकरराव किर्लोस्कर हें समारंभासाठीं घटप्रभेहून मुद्दाम आले होते. त्यांनीं आपल्या भाषणांत मासिकाला त्याच्या स्थलांतरामुळें लेखकांचें अधिक प्रभावी सहकार्य मिळूं शकल्यानें, मासिकाचा अधिकाधिक उत्कर्ष होत राहील अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. गंगाधर गाडगीळ ह्यांनीं सांगितलें, कीं उद्योगपतींनीं आपल्या नफ्याचा कांहीं भाग समाजकल्याणासाठीं खर्च करावा, साहित्यिकांना व कलाकारांना उत्तेजनार्थ वर्षासनें द्यावीं आणि समाजविषयक आपलीं कर्तव्यें पार पाडावीं. ह्या बाबतींत त्यांना किर्लोस्कर मासिकांचें विस्मरण झालें असावें. कारण, किर्लोस्कर ब्रदर्स लि. च्या मुख्य व्यवसायाशीं (लोखंडी अवजारें व यंत्रें निर्माण करण्याशीं व विकण्याशीं) किर्लोस्कर मासिकांचा कांहींहि संबंध नाहीं. किर्लोस्करांनीं ४० वर्षांपूर्वींच 'किर्लोस्कर' सुरू करून व त्याला 'स्त्री'ची व 'मनोहर'ची पुढें जोड देऊन महाराष्ट्रीय समाजाची मोलाची सेवा केली आहे. आजवर हजारों साहित्यिकांना लक्षावधि रुपये मोबदल्याच्या स्वरूपांत ह्या मासिकांनीं दिलें आहेत; तेंहि त्यांनीं न मागतां, भरपूर, घरपोंच, त्यांचा मान राखून. कांहीं निवडक साहित्यिकांना कांहीं हजार रुपये देऊन प्रसिद्धि होते, त्या मानानें ह्या अप्रसिद्ध पण हितकारक प्रथेचें महत्त्व कितीतरी अधिक आहे. साहित्यिकांना हक्कानें मोबदला मिळूं लागणें, ही किर्लोस्कर मासिकांची वाङ्मयक्षेत्रांतील कामगिरी उपेक्षणीय नाहीं.

### "अर्था"चा दिवाळी अंक

*ह्यापुढील "अर्था"चा अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल.*

**दि. २१ चा अंक प्रसिद्ध होणार नाहीं.**

### दि इस्लामपूर को. पीपल्स बँक लि.

चेअरमन : एम्. डी. पवार

मॅनेजर : डी. डी. लाटकर

सभासद संख्या ५२८, ठेवी १,७५,८१९ रु., येणें कर्जे १,२७,३०९ रु., थकबाकीचें प्रमाण ११·८%, नफा ७,२३६ रु., असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. सभासदांस ६¼% डिव्हिडंड मिळणार आहे. बँकेचें खेळतें भांडवल सुमारें २५,००० रु. नीं वाढून तें २,७३,६३७ रु. झालें आहे. थकबाकीदार कर्जदारांनीं वेळेवर कर्जाची फेड केली असती, तर नफा १०,७२१ रु. पर्यंत गेला असता.

---

### कल्याण पीपल्स को. बँक लि., कल्याण

चेअरमन : पां. शि. देशमुख

ऑ. मॅ. डायरेक्टर : कृ. ल. भिडे

मॅनेजर : गो. रा. करमाळकर

वरील बँकेची पुनर्रचना होऊन दि. ९५-१२-५८ पासून कल्याण, डोंबिवली, शहापूर व अंबरनाथ येथील कचेऱ्यांतून नेहमींप्रमाणें बँकेचा व्यवहार सुरू झाला. बँकेनें ३२,५०० रु. चें नवीन शेअर भांडवल गोळा केलें आहे. नवीन १,५२,९०८ रु. च्या ठेवी अवघ्या सहा महिन्यांत बँकेनें मिळविल्या आहेत. अहवालाचे सालीं बँकेनें जुन्या कर्जेपोटीं २,६३,९७५ रु वसूल केले आहेत. ३५ वर्षांची ही जुनी बँक आतां पुनः सर्वांच्या विश्वासास पात्र राहून लोकसेवा करण्यास सज्ज होत आहे.

---

### दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

चेअरमन : द. न. कुलकर्णी, कणेरकर, आर. एम. पी., वैद्य

मॅनेजर : ए. ए. बोगार, बी. ए.

शेअर भांडवल १,४०,८६० रु., फंडस् १,५१,५३६ रु., ठेवी ४,३१,८८४ रु., कर्जे ५,०१,९८९ रु., नफा १९,२८५ रु., खेळतें भांडवल ७,८५,४३४ रु., डिव्हिडंड ६¼%, असे वरील बँकेच्या ३० जून, १९५९ अखेरच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. थकबाकीचें प्रमाण ९·६३% पडतें. बँकेची एकूण इन्व्हेस्टमेंट २,०६,८२५ रु. ची आहे. आणखी चार वर्षांनीं बँकेचा सुवर्णमहोत्सव होईल, त्यासाठीं चालू सालापासून दरसाल १,००० रु. नफ्यांतून बाजूस काढण्याचें बोर्डाचें धोरण अत्यंत स्तुत्य आहे.

---

### श्रीमहालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

अध्यक्ष : दा. श्री. मुनीश्वर, बी. ए., बी. टी.

इन-चार्ज मॅनेजर : गो. बा. कुलकर्णी.

शेअर भांडवल १,४४,०५० रु., रिझर्व्ह व इतर फंडस् १,२१,८५० रु., ठेवी १६,३०,९४८ रु., कर्जे ९,००,१४७ रु., इन्व्हेस्टमेंटस ४,९०,९६७ रु., खेळतें भांडवल १९,८९,३५४ रु. थकबाकी २७·१%, नफा १०,७४९ रु., डिव्हिडंड ४% असे बँकेच्या व्यवहाराचे प्रमुख आंकडे आहेत. गतवर्षी ठेवींत सुमारें १,६८,००० रु. नीं वाढ झाली. बँकेनें नुकतीच जोशीरावांचे वाड्याची पूर्व बाजूची जागा खरेदी केली आहे. त्या जागेवर भव्य इमारत बांधणेचा विचार चालू आहे. बँकेचा रौप्यमहोत्सव दि. २१ जून रोजीं सहकारमंत्री श्री. भारदे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें साजरा करण्यांत आला.

### दि नासिक डि. सें. को. बँक लि.

चेअरमन : भाऊसाहेब हिरे

मॅनेजर : वि. गो. पुराणिक

अहवालाचे वर्षांत बँकेनें चांदवड, वणी आणि पेठ येथें नवीन शाखा उघडल्या. म्हणजे, बँकेच्या एकूण १५ शाखा झाल्या. सुरगाणा, वावी, निफाड, दाभाडी, रावळगांव, सायखेडें आणि नासिक रोड येथें शाखा उघडण्यांत येणार आहेत. भाग भांडवलांत २ लक्ष, १९ हजार रु. ची भर पडून तें १६,३६,३५० रु. झालें. ठेवींत २२ लक्ष रु. ची भर पडून त्यांची रक्कम ९१ लक्ष, ६० हजार रु. झाली. ठेवींतील वाढीपैकी १३½ लक्ष रुपये व्यक्तिगत ठेवींचे आहेत, हें विशेष उल्लेखनीय आहे. हातांतील रोकड व बँकांतील शिल्लक ३१ लक्ष रु., इनव्हेस्टमेंटस १८¾ लक्ष रु., हे आंकडे भांडवलाचा तरतेपणा दर्शवितात. सहकारी संस्थांना बँकेनें १ कोटी, ६ लक्ष रु. कर्ज दिलेलें आहे. वर्षअखेर १ लक्ष, ५३ हजार रु. नफा राहिला. ४% डिव्हिडंडला ६०,८०० रु. लागतील.

---

### दि इसलांपूर अर्बन को. बँक लि.

चेअरमन : जी. एल. फडणीस; सेक्रेटरी : के. डी. बोरकर

वृत्तांतसालीं नवीन आठ मेंबर झाल्यामुळें मेंबरसंख्या २६६ झाली. शेअर भांडवलांत ६७० रु. ची वाढ होऊन तें २६,८७५ रु. झालें. ठेवींत ४३ हजार रु. ची वाढ होऊन तें १,९३,९०७ रु. वर गेलें; आणि खेळतें भांडवल २,६२,९६८ रु. झालें. वार्षिक उलाढाल ४० लक्ष रु. झाली. निव्वळ नफा ५,१९७ रु. होऊन भागीदारांस ४% डिव्हिडंड मिळणार आहे. बँक 'अ' वर्गांत आहे.

---

### लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

तुलनात्मक आंकडे

| | १९५७ | १९५८ |
|---|---|---|
| विम्यासाठीं आलेले अर्ज (रु.) | ३२०·५८ कोटी | ३८५·९२ कोटी |
| दिलेले विमे (रु.) | २८१·९० „ | ३४३·०७ „ |
| हप्त्यांचें उत्पन्न (रु.) | ८८·१२ „ | ७३·०८ „ |
| (१९५७ अखेरचे १२ महिने) | | |
| मिळालेलें व्याज (%) | ३·७४ | ३·५२ |
| खर्चाचें प्रमाण (%) | २७·३ | २९·२ |
| रिन्युअल खर्चाचें प्रमाण (%) | १५·८९ | १५·४६ |
| ला. इं. फंड (रु.) | ४०९·५५ कोटी | ४४७·८१ कोटी |
| फील्ड ऑफिसर्स | ५,२२२ | ४,८३० |
| विमा एजंट | २,०७,३७३ | २,३०,६०४ |

प्रियजनांना द्यावयाची भेट कशी असावी ?

**सतत ताजा आनंद देत राहणारी !**

श्री. वा. काळे ह्यांचीं कौटुंबिक पुस्तकें

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. १=५० |
| पुढे पाऊल | रु. १=०० |
| तुमचें स्थान कोणतें ! | रु. १=०० |

**ही भेट देऊन आपली गुणज्ञता व्यक्त करा.**

### दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.

### चेंबूर-मुंबई ३८.

## —: हीरक महोत्सव :—

### ( १८९९-१९६० )

सन १८९९ सालीं सांडू ब्रदर्स यांनीं मुंबईस ठाकुरद्वारांत आयुर्वेदिक औषधें तयार करण्यास अल्प प्रमाणावर सुरुवात केली. औषधें कमालीचीं गुणकारक ठरत गेल्यामुळें त्यांना दिवसेंदिवस अतोनात प्रसिद्धि मिळत गेली. त्यामुळें कालांतरानें झपाट्यानें वाढत जाणाऱ्या या धंद्यास मुंबईची लहानशीं जागा अपुरी भासूं लागली. म्हणून १९०८ सालीं कारखान्याचें स्थलांतर करून तो चेंबूर ( मुंबई उपनगर ) येथील प्रशस्त व स्वच्छतेच्या दृष्टीनें हल्लींच्या जागेंत नेण्यांत आला. आज चेंबूर हें बृहन्-मुंबईतील औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचें ठिकाण म्हणून प्रसिद्धीस येत आहे.

सन १९४० च्या फेब्रुवारीमध्यें कारखान्याचें रूपांतर लिमिटेड कंपनींत करण्यांत येऊन त्याचें "दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लिमिटेड" असें नामकरण करण्यांत आलें. नंतर कंपनीच्या १९५६ च्या कायद्यानुसार "दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लिमिटेड" असें नामांतर झालें.

सांडू ब्रदर्स हे त्यांच्या प्रसिद्ध ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे आद्य कारखानदार आहेत. त्यांच्या ब्राम्ही तेलाच्या अनेक नक्कला होत असून सुद्धां भारतांतील सुज्ञ लोक सांडू ब्रदर्स म्हणजेच ब्राम्ही तेल, हें पूर्ण ओळखून आहेत.

कंपनी मुख्यतः अंगमेहनतीच्या साहाय्यानें व शास्त्रोक्त पाठ बारकाईनें अनुसरून ७५० च्या वर आयुर्वेदिक औषधें तयार करीत असते. योग्य ऋतूमध्यें होणारी कच्च्या मालाची निवड, स्वच्छता व शास्त्रशुद्ध कृति या विषयींची दक्षता व माल तयार होत असतांना सुरुवातीपासून अखेरपर्यंत त्यावर व्यक्तिशः ठेवलेली देखरेख यामुळें सांडू ब्रदर्सचीं औषधें कमालीचीं गुणकारी ठरलीं आहेत. आयुर्वेदीय औषधें आजच्या आर्थिक मंदीच्या काळांत जनतेला स्वल्प किंमतींत शास्त्रशुद्ध रीतीनें बनवून देण्याकडे चालकवर्गाचें विशेष लक्ष असतें. गेलीं ६० वर्षे सांडू ब्रदर्सचीं औषधें हीं भारतांतील व परदेशांतील कित्येक आयुर्वेदिक आणि ॲलोपॅथिक चिकित्सकांकडून वापरलीं जातात; तसेंच लोकलबोर्ड व नगरपालिका यांच्या दवाखान्यांतून व पुष्कळ खाजगी व सार्वजनिक रुग्णालयांतून तीं वापरलीं जातात. कंपनीचें स्वतःचें बोधचिन्ह ( ट्रेडमार्क ) दत्तमूर्ति हें ठरविलेलें आहे. ही खूण म्हणजेच कार्यक्षमता, शुद्धता व विश्वसनीयता यांचें प्रतीक म्हणून मानण्यांत येत आहे.

सांडू ब्रदर्स यांचा कारखाना स्थापन होऊन ६० वर्षे पूर्ण झालीं याबद्दल कंपनीचे चालक कारखान्याचा हीरक महोत्सव ( १८९९-१९६० ) लवकरच साजरा करण्याचें सहर्ष जाहीर करीत आहेत.

### दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

या बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक रविवार दि. २७ माहे सप्टेंबर, सन १९५९ रोजीं होऊन त्यांत खालील सभासदांची डायरेक्टर्स म्हणून निवड झाली :—

सर्वश्री ( १ ) गोविंदराव मेघोजीराव दळवी, ( २ ) विठ्ठलराव नागोजीराव मिसाळ, ( ३ ) अर्जुनराव गोविंदराव घोरपडे, ( ४ ) नारायणराव व्यंकोजीराव भातकांडे, ( ५ ) शिवाजीराव यल्लापा काकतकर, ( ६ ) कृष्णाजीराव इरापा भातकांडे ( ७ ) सिद्दाप्पा फकिरप्पा कामुले, ( ८ ) गजाननराव महादेवराव भातकांडे आणि ( ९ ) जिवाप्पा लुम्माण्णा चोळेकर.

या बँकेची दि. ३०-६-१९५९ इ. रोजीं आर्थिक स्थिति खालीलप्रमाणें सुधारलेली दिसून येते :—

शेअर भांडवल रु. ८६,९६०, रिझर्व्ह फंड रु. ४६,६९३, इमारतनिधि रु. ११,१४९ व इतर रिझर्व्ह फंडस् रु. १८,१०८ असून बँकेजवळ एकूण ठेवी रु. ९,०६,४६१ झालेल्या आहेत आणि बँकेचे एकूण खेळतें भांडवल रु. ११,२१,९४१ इतकें झालें आहे. गतवर्षापेक्षा यंदाचे वर्षी एकूण खेळत्या भांडवलांत सुमारें सव्वादोन लाख रुपयांनीं वाढ झालेली दिसून येते. तसेंच बँकेला यंदाचे वर्षी निव्वळ नफा रु. १८,४०३ झाला आहे. हा नफा गेल्या वर्षाचे नफ्याचे मानानें दीडपटीनें वाढलेला दिसून येतो. याचें श्रेय मागील वर्षी काम करणाऱ्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांच्या कार्यक्षम कारभाराला देणें अवश्य आहे. चालू वर्षी देखील बहुतेक तीच मंडळी निवडून आली असल्याकारणानें चालू वर्षी देखील त्यांचा कारभार प्रगतिपरच होईल याची खात्री वाटते. बँकेचा ऑडिट वर्ग आरंभापासून "अ" वर्ग आहे. या एकाच गोष्टीवरून बँकेची आर्थिक सुस्थिरता भक्कम आहे, याची खात्री होईल. चालू वर्षी झालेला निव्वळ नफा रु. १८,५६९ पैकी रु. १२,४६८ इतकी रक्कम निरनिराळे रिझर्व्ह फंडस् वाढविण्या-करितां राखून सभासदांना शे. ३ टक्के डिव्हिडंड अधिक २ टक्के बोनस, म्हणजे एकूण ५ टक्के डिव्हिडंड देणेचें बँकेनें जाहीर केलें आहे शिवाय, स्वस्त धान्य शाखांकडील झालेल्या नफ्यां-पैकी रु. १,१७२ इतकी रक्कम रिझर्व्ह फंडांत वर्ग केली आहे.

या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंग व्यवहार केले जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सभासदांस, काटकसर करणेची संवय दृढमूल होण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या प्रकारच्या आकर्षक बचत योजना उपलब्ध आहेत. त्याचा सभासद आणि सर्वसाधारण जनता या दोहोंनाहि चांगला उपयोग होत असल्याचें दिसून येतें; आणि ठेवीदारांना योग्य सवलती मिळतात.

---

### पोलिसांना शस्त्रांचा तुटवडा

मध्यप्रदेशांतील पोलिस दलाजवळ पुरेशीं शस्त्रें व दारूगोळा नाहीं, असें त्या राज्याच्या सरकारी पत्रकांतच म्हटलें आहे. एकूण १६,५६,७०० रुपयांच्या खर्चाची गरज आहे, परंतु आर्थिक अडचणीमुळें हा खर्च तीन वर्षांवर वाटण्यांत येणार आहे. चालू वर्षी ५,७५,८५० रु. शस्त्रें व दारूगोळा ह्यांवर खर्च केले जातील.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**दि शिरपूर मर्चंटस को. बँक लि., शिरपूर**
**प्रेसिडेंट: छगनलाल मोतीलाल मंडारी**
**मॅनेजर: मा. ग. ओसवाल**

शेअर भांडवल १,००,००० रु., रिझर्व्ह फंड २३,९०९ रु., इतर फंड ३१,७०४ रु., ठेवी ५,७१,६४८ रु., कर्जे ४,३२,०४५, रु., नफा १३,२६८ रु., डिव्हिडंड ६१/४%, असे वरील बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. इन्व्हेस्टमेंट १,९३,३६५ रु. ची आहे. थकबाकीचें प्रमाण ७·२% आहे.

**चिपळूण अर्बन को. बँक लि.**
**अध्यक्ष: भिकाजी गोविंद खातू, बी. ए., एलएल. बी.**
**असि. मॅनेजर:—अ. रा. हेळेकर**

शेअर भांडवल १,१४,११० रु., ठेवी १२,२६,७८९ रु., निधि ९०,२१७, रु., इन्व्हेस्टमेंटस ६,३७४७९ रु., कर्जे ७,७४,८५२ रु., खेळतें भांडवल १६,८४,२५७ रु., नफा ३,५४६ रु., असे अहवालांतील प्रमुख आंकडे आहेत. गुहागर व दापोली ह्या दोन्ही शाखांचें काम प्रगतिपथावर आहे. बँकेनें आतां नाशिक, अहमदनगर व मिरज येथील बँकांत खातीं उघडलीं आहेत. बँकेचा रौप्यमहोत्सव दि. ३१-१-१९५९ रोजीं सहकारमंत्रि श्री. भारदे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

**अन्योन्य साहाय्यकारी मंडळी लि., बडोदें**
**अध्यक्ष: सखाराम अमृत सुधाळकर, बी. ए., एलएल. बी.**
**मॅनेजर: नरहर केशव कोरान्ने**

वसूल भांडवल २,८६,६४० रु., निधि ५,६१,३९८ रु., ठेवी ३३,१०,६३८ रु., शेअर्स १,२५,६९५ रु., सरकारी रोखे ८,४१,७३४ रु., बडोदा म्यु. लोन २४,८७५ रु., सहकारी मंडळ्यांचे रोखे ८४,५५० रु., कर्जे २०,४०,०५७ रु., नफा ४५,८९५ रु, असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. ह्यापूर्वी ठरल्याप्रमाणें सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें बांधकाम झालें असून एकंदर लॉकर्सची संख्या ६०० होत आहे. खेळतें भांडवल ४१,३६,६२७ रु. झालें असून देवघेवीचा व्यवहार २,०२,०४,२१२ रु. चा झाला आहे.

**रत्नागिरी अर्बन को. बँक लि.**
**अध्यक्ष: डॉ. बाळकृष्ण नारायण सावंत, एल्. सी. पी. एस.**
**मॅनेजर: विनायक विष्णु भाटवडेकर**

शेअर भांडवल १,२६,७०७ रु., रिझर्व्ह फंड १,११,२४४ रु., इतर फंड १,१४,७१९ रु. ठेवी २१,५१,७९६ रु., कर्जे १७,१०,१६४ रु., खेळतें भांडवल ३२,०३,५५० रु., नफा २८,७८७ रु, डिव्हिडंड ५% + ११/४% (बोनस), असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. थकबाकीचें प्रमाण ५·१३% पडतें.

**पुणें म्यु. सर्व्हंटस को. अर्बन बँक लि.**
**अध्यक्ष: कृ. द. घारमळकर**
**कार्याध्यक्ष: आ. ब. टण्णू**
**मॅनेजर: ना. कृ. कुलकर्णी, जी. डी. कॉम.**

अहवालाचे वर्षी बँकेच्या व्यवहारांत सर्वच बाबींत प्रगति झाली आहे. वसूल शेअर भांडवल १,८८,६१० रु., रिझर्व्ह व इतर फंडस् ७२,५११ रु., ठेवी १२,५२,२७७ रु, कर्जे १४,०९,९५४ रु., नफा १८,५८७ रु., ६१/४% डिव्हिडंड, असे ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. इनव्हेस्टमेंट ९६,६४० रु. ची झाली आहे. बँकेनें सभासदांना दिलेल्या कर्जापोटीं दरमहा सुमारें ६८ हजार रु. चा वसूल येतो, त्यामुळें आर्थिक मदतीसाठी परावलंबी रहाण्याची पाळी येत नाहीं. उलट बँकेजवळ भरपूर शिल्लक रहातें. थकबाकीचें प्रमाण १·१% आहे. थकबाकी ही केवळ मयत व नोकरी सोडून गेलेल्या सभासदांचीच आहे. काटकसर फंडाची योजना आकर्षक असून त्या फंडाच्या वर्गणीचें प्रमाण खेळत्या भांडवलाच्या ५८% (८,८४,६७४ रु.) झालें आहे. बँकेला जागा अपुरी पडते, तिला प्रशस्त इमारत मिळवून देण्याचे कामीं कॉर्पोरेशननें मदत करावी, अशी सूचना श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनीं आपल्या भेटीच्या वेळच्या शेऱ्यांत केली आहे.

**दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली**
**चेअरमन: गुलाबराव आर. पाटील, बी. ए., एलएल. बी.,**
**मॅनेजर: पी. बी. टाकवेकर, बी. ए., एच्. डी. सी.,**

बँकेच्या कार्यक्षेत्रांत संपूर्ण द. सातारा जिल्ह्याचा समावेश झालेला आहे. जिल्ह्यामध्यें बँकेच्या नऊ शाखा आहेत. कवठे-महांकाळ येथें शाखा लवकरच सुरू होईल. शेअर भांडवल ११,०१,८७० रु., फंडस् २,६४,८२० रु., ठेवी ७४,११,३०० रु., रिझर्व्ह बँक कर्जे २३,५०,००० रु., रोख व बँकांतील शिल्लक १३,२०,१२१ रु, इन्व्हेस्टमेंट्स २५,३८,६७२ रु., सहकारी संस्थांना दिलेलीं कर्जे ७४,८२,२८३ रु., नफा ६४,७४० रु, असे वरील बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. थकबाकीचें येणें रकमेशीं प्रमाण १·२% आहे. खेळत्या भांडवलांत ३९,७१,६४९ रु. ची वाढ होऊन तें १,२०,८२,२४० रु. झालें आहे. ४% डिव्हिडंडला ३३,४५० रु. लागतील. गेल्या वर्षापेक्षा नफा २२,९०७ रु. नीं जास्त आहे.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
सरदारगृह
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिटे यांची वसुली माफक दरानें केली जाते.

## पब्लिक कंपन्यांच्या कामाची वाढ

( १,००१ पब्लिक लिमिटेड कंपन्या, आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९५५ | १९५६ | १९५७ | शतमानानें वाढ (+) अथवा घट (–) १९५५ चे मानानें १९५६ साली | १९५६ चे मानानें १९५७ साली | १९५५ चे मानानें १९५७ साली |
|---|---|---|---|---|---|---|
| वसूल भांडवल + रिझर्व्हं (नेट वर्थ) | ७,४२ | ८,०९ | ८,५७ | + ९.० | + ५.९ | +१५.४ |
| ग्रॉस फिक्स्ड असेट्स | ९,३४ | १०,६७ | १२,४१ | +१४.३ | +१६.३ | +३२.९ |
| नेट फिक्सड असेट्स | ५,२६ | ६,२२ | ७,४९ | +१८.१ | +२०.५ | +४२.४ |
| इन्व्हेंटरी | ४,१८ | ५,०८ | ५,५९ | +२१.४ | +१०.० | +३३.६ |
| एकूण निव्वळ जिंदगी | १४.२४ | १६,४२ | १८,३१ | +१५.३ | +११.५ | +२८.६ |
| एकूण उत्पन्न | १६,०९ | १८,२८ | १९,९४ | +१३.६ | + ९.१ | +२३.९ |
| विक्री | १३,९३ | १५,५८ | १६,९५ | +११.९ | + ८.७ | +२१.६ |
| करापूर्वी नफा | १,१८ | १,२९ | १,०४ | + ९.६ | –१८.९ | –११.१ |
| करानंतर नफा | ६७ | ७० | ५३ | + ४.५ | –२४.० | –२०.६ |
| डिव्हिडंडस | ३९ | ४२ | ४२ | + ९.० | – ०.८ | + ८.२ |
| न वाटलेला नफा | २८ | २८ | ११ | – १.८ | –५९.५ | –६०.२ |
| एकूण भांडवलाशीं ग्रॉस नफ्याचें प्रमाण | १०.२ | ९.५ | ७.४ | | | |
| एकूण विक्रीशीं ग्रॉस नफ्याचें प्रमाण | १०.४ | १०.० | ८.० | | | |
| निव्वळ जिंदगीशीं निव्वळ नफ्याचें प्रमाण | ९.० | ८.७ | ६.२ | | | |
| वसूल भांडवलावरील डिव्हिडंड | ९.१ | ९.५ | ८.७ | | | |

### दि पूजा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें २

१९५९–६० सालासाठीं या बँकेच्या दि. २७–९–५९ रोजीं झालेल्या वार्षिक साधारण सभेंत खालीलप्रमाणें पदाधिकाऱ्यांची निवडणूक झाली आहे.

**सल्लागार मंडळ :**—द. व. इनामदार, (अध्यक्ष), कि. ल. बारणे, आ. सा. देशमुख, गो. ल. थत्ते, ना. अ. सुकाळे.

**व्यवस्थापक मंडळ :** मो. वि. रबडे, (कार्याध्यक्ष), व्यं. बा. पोळ, (उपकार्याध्यक्ष) दि. वि इनामदार, र. पां. भोंडे, बी. ए., एलएल. बी. वकील, म. भा. शेळके, व. ल. गोसावी, ल. घ. डुंबरे, मा. म. पवार, दे. व्यं. निसाळ, एलू. सी. पी. एस्.

**स्थानिक हिशेबतपासनीस :**—स. कृ. देशपांडे, बी. ए., बी. कॉम, जी. डी. सी. ॲन्ड ए

**नफा व डिव्हिडंड :**—वर्षअखेर बँकेस रु. ७,८५०.०२ नफा झाला असून डिव्हिडंड ४ टक्के प्रमाणें जाहीर करण्यांत आलें. बँक गेलीं तीन वर्षे सतत ' अ ' वर्गांत आहे.

### कामगार व व्यवस्थापक यांच्या प्रतिनिधींचें संयुक्त मंडळ

दिल्ली येथील हिंदुस्थान इन्सेक्टिसाइड कारखान्याची व्यवस्था पाहण्यासाठीं या कारखान्याच्या कामगारांचें व व्यवस्थापकीय वर्गाचें समान प्रतिनिधी असलेलें एक संयुक्त मंडळ स्थापन करण्यांत आलें आहे. बुधवार ३० सप्टेंबर रोजीं या मंडळाचें औपचारिक उद्घाटन झालें.

सरकारी क्षेत्रांतील कारखान्यांसाठीं नेमण्यांत आलेलें अशा प्रकारचें हें दुसरें मंडळ आहे. गेल्या जूनमध्यें जलहल्ली येथील हिंदुस्थान मशीन टूल्स लि. कारखान्यासाठीं असें पहिलें संयुक्त मंडळ स्थापन करण्यांत आलें होतें.

### इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचा वार्षिक अहवाल

तीस जून १९५९ ला संपलेल्या वर्षांत दि इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या एकूण उत्पन्नांत, त्यामागील वर्षांतील १५४.९१ लाख रुपयांवरून २०३.३८ लाख रुपयांपर्यंत वाढ झाली. त्याचप्रमाणें या काळांत निव्वळ नफाहि २८.२० लाख रुपयांवरून ३५.३७ लाख रुपयांवर गेला.

सदर वर्षांत ६ उद्योगधंद्यांतील १९ अर्जदारांस एकूण ३.७९ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर झालीं. अशा रीतीनें १९४८ मध्यें या कॉर्पोरेशनची स्थापना झाल्यापासून एकूण १९० कंपन्यांस ६६.६९ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर झालीं आहेत. या वर्षांतहि कॉर्पोरेशननें एकूण ४.२५ कोटी रुपयांची हंगामी कर्जें दिलीं.

नोव्हेंबर १९५८ मध्यें या कॉर्पोरेशननें रोख्यांची तिसरी मालिका विक्रीस काढली. ही मालिका प्रथमतःच जनतेसाठीं खुली करण्यांत आली होती. कॉर्पोरेशननें ४ कोटी रुपयांचे रोखे विक्रीस काढले होते, परंतु प्रत्यक्षांत मात्र पहिल्याच दिवशीं एकूण ८ कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री झाली.

तीस जून १९५९ ला संपलेल्या या कॉर्पोरेशनच्या ११ व्या वार्षिक अहवालांत ही माहिती देण्यांत आली आहे.

या कॉर्पोरेशनला सदर वर्षांत झालेल्या ३५.३७ लाख रुपये निव्वळ उत्पन्नापैकीं १० लाख रुपये मध्यवर्ती सरकारला देण्यांत येतील तर ११.२५ लाख रुपयांचा भागीदारांस २½ टक्के डिव्हिडंड देण्यासाठीं विनियोग करण्यांत येईल.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १२८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षे | : | २¾ टक्के |
| ३ वर्षे | : | ३ टक्के |
| ५ वर्षे | : | ३½ टक्के |
| १० वर्षे | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. } वा. ग. आळतेकर
ता. ११–७–५७ } कार्यकारी संचालक

---

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

### बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

---

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक )
(६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. वा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

---

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

### मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434- Licence No. 53.
Licenced to post without prepayment

# अर्थ

दिवाळी अंक १९५९



यंदाची दिवाळी व नूतन वर्ष आमचे मागीदार, खातेदार, आणि हितचिंतक यांना सुखाचें व भरभराटीचें जावो !

# दि बेळगांव बँक लिमिटेड

शेड्यूल्ड बँक ] मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव [ स्थापना : १९३०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें भांडवल | रु. | ६,००,००० |
| राखीव निधि | रु. | ३,६१,००० |
| ठेवी | रु. | १ कोटी, ६४ लक्षांवर |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १ कोटी, ७८ लक्षांवर |

] संचालक-मंडळ [

श्री. एम. जी. हेरेकर ( अध्यक्ष ), श्री. एस. एम. मुत्तूर ( उपाध्यक्ष ), श्री. जी. व्ही. सराफ,
श्री. एन. एस. शिराळी, श्री. एस. व्ही. कलघटगी, श्री. बी. बी. पोतदार,
श्री. एल. व्ही. देशपांडे, श्री. ए. आर. नाईक, ( मॅ. डायरेक्टर )

—: शाखा :—

म्हैसूर राज्य :—( बेळगांव जिल्हा ) संकेश्वर, होसूर ( शहापूर ), गोकाक, नंदगड, रामदुर्ग, चिकोडी, सौंदत्ती, बेळगांव, निपाणी, बेलहोंगल, अथणी, टिळकवाडी ( बेळगांव ), गोकाक फॉल्स, कागवाड. ( धारवाड जिल्हा ) नरगुंद.

बँकेची २७ वी शाखा विजापूर जिल्ह्यांतील बदामी येथें लवकरच उघडण्यांत येईल.

मुंबई राज्य : ( रत्नागिरी जिल्हा ) वेंगुर्ला, मालवण, शिरोडा, चिपळूण, कणकवली, देवगड, सावंतवाडी. ( दक्षिण सातारा जिल्हा ) मिरज. ( सोलापूर जिल्हा ) बार्शी. ( कोल्हापूर जिल्हा ) जयसिंगपूर, गडहिंग्लज.

बेळगांव येथील मुख्य कचेरींत आणि निपाणी व गोकाक शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत. बँकिंगच्या सर्व व्यवहारासाठी लिहा अगर समक्ष भेटा—

एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.



# ☆ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली ☆

—जि. दक्षिण सातारा—

स्थापना १९३९ * फोन क्र. ५३ * तार-अर्बन बँक

मुख्य कार्यालय—हरभट पथ, सांगली. ★ शाखा—माधवनगर, द. सातारा

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० | ठेवी | रु. ४३,२९,८२६ |
| वसूल भांडवल | रु. १,८५,९७० | खेळतें भांडवल | रु. ५०,६३,४८१ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ३,५८,८३१ | ऑडिट वर्ग | अ |

वैशिष्ट्यें— * अल्प भाड्यांत मौल्यवान् जिन्नस ठेवण्याची सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें सोय.
* लहान ठेवी चांगल्या व्याजानें स्वीकारणेची बचत योजनेंत सोय.
* रौप्यमहोत्सव ठेव रोख्यांची विक्री चालू आहे.
* बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
* बँकेचे स्थापनेपासून आतांपर्यंत प्रतिवर्षी ६½% डिव्हिडंड दिलें आहे.

—: व्यवस्थापक मंडळ :—

श्री. म. ह. गोडबोले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

श्री. ज्ञा. आ. येडके, जमीनदार
श्री. ल. द. भिडे, जमीनदार
श्री. वा. वि. वाटवे, बी. ए., एलएल. बी., वकील
श्री. ग. का. दांडेकर, डी. एम. ई. ई., कारखानदार

श्री. रा. ल. कुलकर्णी, उदगांवकर, जमीनदार
श्री. के. वि. भिडे, लोखंडाचे व्यापारी
श्री. वि. ह. माईणकर, बी. एससी., एलएल. बी., वकील
श्री. गं. गो. बिनीवाले

ल. य. लागू, बी. ए., एलएल बी.
मॅनेजर

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र हें नांव सार्थ कसें होईल ? ... | ५ |
| २ | उद्योगपतींच्या नव्या जबाबदाऱ्या ... | ७ |
| ३ | सहकारी संघटनेची नवी धाटणी ... | ९ |
| ४ | बँकिंगच्या व्यवसायासाठी पंचवार्षिक कार्यक्रम ... | ११ |
| ५ | साखरेच्या धंद्यांतील अडचणींचें स्वरूप ... | १५ |
| ६ | भारताच्या चहाच्या धंद्याचें भवितव्य ... | १८ |
| ७ | कामगारांची उद्योगधंद्यांतील भागीदारी ... | २१ |
| ८ | कॉफीच्या धंद्यापुढील कांहीं प्रश्न ... | २३ |
| ९ | बँकांतील गंमती–जमती ... | २६ |
| १० | परदेशांकडून घेतलेल्या कर्जांची फेड ... | २७ |
| ११ | सहकारी शेतीचा अभिनव प्रयोग ... | २९ |
| १२ | रबराच्या उत्पादनांत वाढ झाली पाहिजे ... | ३१ |
| १३ | परदेशी भांडवलदारांना वाटणारी भीति ... | ३४ |
| १४ | बँकेंतील नोकरी कां आवडते ? ... | ३५ |
| १५ | इंडेक्स नंबरसंचा व्यावहारिक उपयोग ... | ३९ |


"अर्था"चा ह्यापुढील अंक नेहेमीप्रमाणें दोन सुट्यानंतर दि. १८ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.


दक्षिण भारतांतील जुनी व नाणावलेली बँक

**दी इंडियन बँक लि., मद्रास**

( स्थापना : १५ ऑगस्ट १९०७ )

**ही बँक आपल्या जनतेची सेवा करीत आहे.**

या बँकेची पुणें शाखा ( २४८ बुधवार पेठ, पुणें २. )

**दि. १७–११–५८ पासून उघडण्यांत आली आहे.**

योग्य तारणावर कर्जें व ओव्हरड्राफ्टस् दिले जातात.

ठेवी
- चालू ठेवी.
- सेव्हिंग्ज बँक ठेवी, व्याजाचा दर द. सा. द. शें. २½ टक्के
- ( दर आठवड्यास २ वेळ चेकनें रु. १,००० पर्यंत पैसे काढण्याची सवलत आहे. )
- कायम ठेवी व ३ वर्षें मुदतीची कॅश सर्टिफिकेटस्.

**व्याजाचे दराबाबत चौकशी करावी**

परदेशी हुंडणावळीसुद्धां बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

तपशीलवार माहितीकरितां शाखाकचेरींत समक्ष भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

के. व्ही. राममूर्ती, अकौंटंट. | फो. नं. ७७५७ | सी. एस्. नागराज रावसाहेब, एजंट, पुणें शाखा.

पुण्यांत लग्नसमारंभ

थाटामाटांत, ऐषआरामांत, दगदग–त्रास न करतां, योग्य खर्चांत करून देणारी

**ए क मे व सं स्था**

**उद्यान कार्यालय**

६१९ शनिवार पेठ, केळकर पथ, पुणें २.

टेलिफोन नं. ७४९१ * * * * * * * * * * * * * * * टेलिग्राम–'उद्यान'

पुणें स्टेशनवरून कार्यालयांत आणण्यापासून कार्य संपवून स्टेशनवर पोंचवीपर्यंत व्रतबंध–विवाहादि मंगलकार्यांतील सर्व कामें अत्यंत हौशीनें केलीं जातात. पत्रव्यवहार करावा.

# दिवाळी आली, साखर मात्र गेली !

## सर्वांना पुरेशी साखर आपल्याजवळ नाहीं,

हें खरें.

## पण जी थोडी आहे,

तिचें योग्य वांटप आपण करूं शकतों.

## पुणें जिल्ह्यांत सहकारी संस्था सध्यां साखरेचें वांटप करीत आहेत.

या साऱ्या संस्थांना साखरवांटप जलद व वेळच्या वेळीं करतां यावें म्हणून आम्हीं तत्परतेनें पैसा पुरविला आहे–पुरवीत आहोंत. इतकेंच नव्हे तर ऊंस जास्त पिकावा म्हणून शेतकऱ्यांना आणि साखर जास्त गाळावी म्हणून

## सहकारी साखर कारखान्यांनाहि आम्ही पैसा पुरवीत आहोंत.

गेल्या जूनपासून आम्ही पिकांसाठीं वाढत्या प्रमाणांत पैसे देत आहोंत.

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लि., पुणें २.

★ ठेवी अडीच कोटींचेवर ★

★ वीस शाखा ★

★ खेळतें भांडवल साडेतीन कोटी ★

**वा. ग. अळतेकर,**

कार्यकारी संचालक.

# अर्थ

## दिवाळी अंक

१८ ऑक्टोबर, १९५९





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

# "महाराष्ट्र" हें नांव सार्थ कसें होईल ?

## आर्थिक अभ्युदयाची सामाजिक बाजू

( संपादकीय )

एका वर्कशॉपमधें मी गेलों होतों. तिथं दारांतच तिघेजण बसले होते आणि शेजारीं पोस्टमन उभा होता. पोस्टमननें आणलेलीं रजिस्टर्ड पत्रें ते सर्वजण बघत होते, आणि योग्य त्या पावत्या सही करून देत होते. हे तिघेहि सख्खे भाऊ वर्कशॉपच्या फर्मचे भागीदार होते, पण भागीच्या उत्पन्नाच्या वांट्यासबंधीं त्यांचेमधील वाद आपसांत न मिटल्यामुळें त्यांनीं प्रकरण कोर्टांत नेलें होतें. एकमेकाला ते वकिलामार्फत नोटिसा पाठवीत असत; वादी-प्रतिवादी बनत असत. ह्याच संबंधांतलीं, एकमेकाला पाठवलेलीं-आलेलीं राजिस्टर्ड पत्रें पत्ता नीट तपासून पाहून ते देत-घेत होते. त्यांच्यामध्यें दावे चालले असूनहि, त्यांचेमधील ही खेळीमेळी पाहून मला आश्चर्य वाटलें. वर्कशॉपच्या कामांत ते कसूर करीत नाहींत; प्रत्येक जण फर्मच्या प्रगतीसाठी झटत असतो. वाद होतो, तो फक्त नफ्याच्या वांटणीपुरता. "आम्हीं कसून काम केलें नाहीं, फर्मचें काम वाढलें नाहीं, तर नफाहि मोठा होणार नाहीं. नफा वाढत गेला, तरच आम्हांला त्यांत जास्त वांटा मिळणार. तेव्हां, आमचे वाट्यासंबंधीं कितीहि वाद झाले, तरी उत्पन्नाचा झरा अबाधित राहलाच पाहिजे" अशी त्या तिघांचीहि भावना आहे. त्याप्रमाणे ते वागतहि असतात. फर्मच्या उत्कर्षाला त्यांच्या वांटणीच्या तंट्यानें बाध येत नाहीं. प्रत्येकाच्या घरीं धुसपुस चालली, तरी कामाच्या जागीं तिचा दुष्परिणाम होऊं दिला जात नाहीं.

कारखानदार विरुद्ध त्यांचे कामगार, बँका विरुद्ध त्यांचे नोकर, असे तंटे वरचेवर होतात आणि त्यामुळें कटुता निर्माण होऊन त्याचा उत्पादनावर आणि कामावर प्रतिकूल परिणाम होतो, असा अनुभव आहे. संपामुळें उत्पादन घटतें, कामाचा उठाव होत नाहीं, महागाईला आळा बसत नाहीं, आणि आम जनतेला त्याचा उपसर्ग पोचतो. कामाच्या जागीं व बाहेरहि तंग वातावरण राहतें; एकमेकांचा दृष्टिकोन समजून घेण्याचा कोणीच प्रयत्न करीत नाहीं. मालक वर्गाला कामगार व नोकर हेच नेहमी दोषी वाटतात, तर कामगार व नोकर हे मालकवर्गाच्या भांडवलशाही वृत्तीला सदैव दोष देतात. ह्या संघर्षांत उत्पादन घटून, नफा कमी होऊन, उभय पक्षांचें व अखेर देशाचें अहित होतें; कित्येक प्रसंगीं कामगारांच्या रोजगारावरहि गदा येते, व त्यांचीं कुटुंबें धुळीस मिळतात.

भारत स्वतंत्र झाला; मराठी भाषिकांचें संयुक्त महाराष्ट्र राज्यहि आतां हाताशीं आलें आहे. परकी सरकारला आपल्या दुरवस्थेबाबत आतां दोष देण्याचा प्रश्नच उरलेला नाहीं; आपलें स्वतंत्र राज्य झाल्यावर आपणांवर कुणाचें दडपण आहे, कुणी आपली पिळणूक करीत आहे, अशीहि आतां तक्रार करतां येणार नाहीं. आपल्या बऱ्या-वाईटाचे आपणच निर्माते। भारतांतील सर्व राज्यांत महाराष्ट्र आघाडीवर रहावयाचा असेल, मध्यवर्ती सरकारांत आपल्या राज्याचा व आपल्या पुढाऱ्यांचा प्रभाव पडावयाचा असेल, आपली राहणी सुधारून दारिद्र्य व दौर्बल्य नष्ट व्हावयाचें असेल तर महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास झपाट्यानें झाला पाहिजे; त्याचे मार्गांतील सर्व अडचणी आपण दूर केल्या पाहिजेत. "अर्थ एव प्रधानः" हें कौटिल्यवचन ध्यानांत ठेवून, आणि महाराष्ट्राचा अर्थ साधण्यावरच आपली वैयक्तिक व कौटुंबिक अर्थसिद्धि आणि अर्थमूल धर्म व काम हेहि अवलंबून आहेत, हें लक्षांत ठेवून सर्वांनीं एकदिलानें कामास लागलें पाहिजे. मालक व कामगार ह्यांतील अंतःस्थ कुरबूर उत्पादनवाढीच्या मार्गांत कदापि येतां कामा नये.

हें सर्व केव्हां शक्य होईल ? समाजाच्या प्रत्येक घटकाला त्याचें रहस्य पटेल, तर। प्रत्येक घटकाला हें रहस्य केव्हां पटेल ? त्याला पटवून देणाराची प्रत्यक्ष कृति उपदेशाप्रमाणें असेल, तर ! परोपदेशे पांडित्यम् करून, केवळ एकमेकावर दोषारोप करून, कांहींहि साध्य होणार नाहीं. उत्पादनाच्या सर्व घटकांना फलनिष्पत्तींत न्याय्य वांटा मिळत आहे, हें त्यांना अनुभवास यायला हवें. वाढत्या संपत्तीमध्यें आपल्याला योग्य तो हिस्सा मिळेल, अशी प्रत्येकाची खात्री व्हायला हवी. आपण एकाच राज्याचे, एकाच ध्येयानें प्रेरित झालेले नागरिक आहोंत, हें माणुसकीच्या वागणुकीनें सिद्ध करायला हवें. कामगार व त्यांचे पुढारी ह्यांच्यापेक्षां कारखानदार हे संख्येनें कमी आणि दूरदृष्टीचे असल्यानें ह्या बाबतींत त्यांनींच धडा घालून दिलेला बरा. त्यांना पैसे किती मिळतात, ह्यापेक्षा त्यांच्या श्रीमंतीच्या दिमाखामुळें कामगार वर्गावर विपरीत परिणाम होतो. मालकाच्या घरच्या मंडळींच्या दिमतीला कंपनीच्या खर्चानें घेतलेल्या किती मोटारी असाव्यात, त्या किती भारी किंमतीच्या व लांबरुंद असाव्यात, त्यांचा वापर कुणी व कुठे करावा, मालकांच्या कुटुंबीयांनीं किती नटून-थटून व रंगून कामगारांसमोरून हिंडावें, समाजांत स्वतःचें किती स्तोम माजवावें, ह्या सर्व गोष्टी आतां वृत्तपत्रें वाचणाऱ्या, सिनेमा-नाटकांना जाणाऱ्या कामगारांच्या बैठकींत चर्चेचा विषय होतात. इनकमटॅक्स खात्याला फसविणारे, कर चुकविणारे, परदेशी हुंडणावळ वाम मार्गानें मिळवून "धंदा वाढीसाठी" सपत्नीक परदेश प्रवास करणारे, लायकी नसणाऱ्या आपल्या नातेवाइकांना वरच्या आरामाच्या जागा

देणारे मालक आपल्या कामगारबंधूंना कष्टाचा, सचोटीचा काटकसरीचा उपदेश करूं लागले, त्यांना कामचुकार म्हणूं लागले, तर कसें चालेल! कामगारांवर पूर्ण अविश्वास ठेवणारा मालक, स्वतः चोऱ्या करून पचवूं लागतांना कामगारांच्या दृष्टीस पडला, त्याचे अफरातफरीचे खटले वृत्तपत्रांत गाजूं लागले, तर कामगारांनीं तरी सचोटी का बाळगावी! कामगारवर्ग मालकवर्गाचे मानानें कमी शिकलेला, दूरदृष्टि नसलेला. त्याला "आधी: केलें, मग सांगितलें" हेंच ज्यास्त पटणार, देशहिताच्या बुरख्याखाली केवळ स्वार्थ साधणाऱ्या मालक वर्गाविषयीं त्याला कधीच आस्था वाटणार नाहीं. मध्यमवर्गीय मनुष्यहि मालक-वर्गाच्या तारतम्यरहित, डोळ्यांत खुपणाऱ्या हालचालींना आणि समाजांतील वागण्याला चिडून, चिडून जाऊन, कामगारांचीच बाजू घेऊं लागतो. मालक लोक समाजांत वावरतात, त्यांत ते मिसळण्यापेक्षां आपला मोठेपणा मिरवण्यासाठीं, अशी इतरांची समजूत; तर इतरांना आपला मत्सर वाटतो, अशी मालक लोक समजूत करून घेतात. पण, अर्धपोटी आणि उपाशी लोकांच्या समुद्रांत कपाळभर गंध लावून ढेकर देत विनदिक्कत जाणारे लोक तिरस्करणीयच ठरतात, मग 'बुभुक्षितः किं न करोति पापम्!'

कारखानदारांनीं आपली वृत्ति सुधारल्याखेरीज, आपल्या लायकीचें आणि संपत्तीचें कुप्रदर्शन टाळल्याखेरीज, कामगारांशीं समरस झाल्याखेरीज, त्यांची उत्पादनवाढीची ओरड ही केवळ स्वार्थप्रेरितच ठरल्याविना राहणार नाहीं. देशहिताचा डांगोरा पिटून आपली पोळी पिकवूं पाहाणाऱ्या कारखानदारीला ह्यापुढें समाजांत सध्याचें स्थान उरणार नाहीं. कामगारांनींसुद्धा, उत्पादनवाढीखेरीज रोजगार वाढूं शकणार नाहीं हें ओळखायला हवें; त्याचप्रमाणें उत्पादन-वाढ झाली, कीं त्यामुळें त्यांना प्रथम अधिक वेतन मिळेल; त्यांची राहणी सुधारण्यास प्राधान्य दिलें जाईल, अशी त्यांची खात्री पटवून दिली गेली पाहिजे. कारखानदारांना पूर्वीच्या मानानें कितीतरी अधिक प्रमाणांत आतां सरकारी मदत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मिळत आहे; जनतेच्या त्यागांतूनच ही मदत निर्माण झालेली असते. जनतेनें पुरविलेल्या भांडवलाच्या कारखान्यांचे मॅनेजिंग एजंट वास्तविक व्यवस्थापक असतात; पण ते मालकाप्रमाणें वागूं लागतात. आपल्या आढ्यतेचें समर्थन "स्वतःची श्रेष्ठ लायकी व पत्करलेला आर्थिक धोका" असें त्यांनीं करून भागणार नाहीं. महाराष्ट्राच्या वैभवासाठी त्यांनीं आपली परंपरागत वृत्ति सोडायला हवी; सामाजिक न्यायाला मंजूर असेल तेवढ्यावरच आनंद मानायला हवा; कामगारांच्या मनोवृत्तींत इष्ट तो बदल घडवून आणण्यासाठी निष्ठेनें प्रयत्न करायला हवा. आचार, विचार, राहणी, बोलणी, ह्या सर्वांचे द्वारां महाराष्ट्राचा उत्कर्ष साधण्याची पराकाष्ठा करायला हवी. कामगारवर्गाच्या पुढाऱ्यांनींहि आपल्या स्वतःच्या पुढारी-पणापेक्षा जास्त महत्त्वाच्या अशा हिताकडे कानाडोळा करतां कामा नये. आर्थिक बाबतींतील प्रश्न संख्याबलानें सोडविण्यामधील धोके जेवढे सत्वर लक्षांत येतील; तेवढें बरें. महाराष्ट्र हें नांव सार्थ होण्यास अनुकूल वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी प्रत्येक जणानें आपआपल्या परीनें उचलली पाहिजे. "उत्पादन सुधारलें, तरच वाढत्या वांट्याची शक्यता" हें सत्य सर्वांच्या रोमारोमांत भिनलें पाहिजे.

कामगार आणि कारखाना विषयक कायद्यांचा हेतु लक्षांत न घेतां, त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या किरकोळ इन्स्पेक्टरांशीं हातदाबीच्या मार्गानें संगनमत करून, कामगारांच्या समोर त्यांतून बेमुरवत पळवाटा काढीत बसण्याचा, कारखानदारांनीं प्रयत्न केला म्हणजे ते सहानुभूति गमावूं लागतात. आपल्याप्रमाणें कामगारहि कुटुंबवत्सल असतो, हे ते विसरले आणि कामगाराला मानवता सोडून वागवूं लागले म्हणजे प्रकरण अधिकच चिघळतें आणि संघर्षाला धार येऊं लागते. सबंध कारखानदार वर्गालाच मग दूषण प्राप्त होतें आणि कारखानदारांना कामगारांच्याच नव्हे तर, सबंध समाजाच्याच पोशिंद्यांचें आणि स्वार्थत्यागी द्रष्ट्यांच्या वारसदारीचें न्याय्य श्रेयहि दिलें जात नाहीं. कांहीं कारखानदार खरोखरच प्रेमळ, माणुसकीनें वागणारे, समाजहितास प्राधान्य देणारे असले, तरी 'कोरड्याबरोबर ओलें जळतें' ह्या म्हणीप्रमाणें त्यांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. "नाहींतरी कामगार मला ओळखत नाहींत; मग माझ्या चांगुलपणाचा काय उपयोग!" असें सत्प्रवृत्त कारखानदारांना त्यामुळें साहजिकच वाटूं लागतें. चांगुलपणाचा हा ऱ्हास टाळतां आला पाहिजे आणि कामगारांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं "सब घोडे बारा टक्के" प्रमाणें सर्वांना सारखे न लेखता, तारतम्यानें पाहायला आणि वागायला हवें.

कारखानदार व कामगार ह्यांच्या सहकार्याची आवश्यकता निर्विवाद आहे. महाराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याच्या इर्ष्येनें सर्वांनींच एकदिलानें झटण्याचें ठरविलें, तरच हें सहकार्य प्रभावी होणार. कामगारांत ह्या दृष्टीनें जागृति व्हावयाची असेल, तर पुढाकार कारखानदारांनींच घ्यायला हवा आणि कामगारांना सहकारी ह्या नात्याचा दर्जा देण्यास प्रारंभ करायला हवा. असें केल्यानें इष्ट तें साध्य न होतां, विपरीतच परिणाम घडून येईल, अशी भीति व्यक्त केली जाते. परंतु, व्यापारी वृत्तीच्या मालक वर्गानें मनापासून सुधारणा करण्याचें ठरविलें तर तें आज वाटतें तितकें अवघड ठरणार नाहीं. मालक आणि कामगार हे भिन्न धर्माचे व जातीचे असले, म्हणजे मात्र मालकांना आपला वरचढपणा टाकून देण्यास विशेष प्रयत्न करावा लागेल. पण, व्यापक हितास जागणाऱ्यांना तेंहि कठीण नाहीं. स्वतःच्या दूरगामी हिताची आणि स्वराज्याच्या संवर्धनाची गुरुकिल्ली एकच आहे. येथें मालकवर्गाला जरा विस्तारानें आवाहन केलें आहे, ह्याचा गैरसमज होऊं नये ह्यासाठीं हें स्पष्ट केलें पाहिजे, कीं त्यांचे हातीं नेतृत्व असल्यानें त्यांनीं पुढाकार घ्यावा हेंच येथें मुख्यतः म्हणावयाचें आहे. महाराष्ट्राच्या अभ्युदयासाठी कारखानदारांना केलेलें हें आवाहन समाजांतील सर्वच घटकांना लागू आहे. *कामगारांना उद्देशूनहि पुष्कळच सांगण्याजोगें आहे. पण त्याचें हें स्थळ नव्हे.* लक्ष्मीपूजनाचे वेळीं, लक्ष्मीचा वरहस्त मागतांना, आपल्या जबाबदारीचीहि जाणीव राहूं दे. आपण सर्वच जण कष्ट आणि घाम ह्यांची तयारी ठेवूनच महाराष्ट्राच्या राज्याचें स्वागत करूं या; सामाजिक न्यायाच्या कसोटीला उतरण्याचा दृढनिश्चय करूं या; "आपला तो बाब्या, कामगाराचें तें कारटें" ह्या वृत्तीचा विसर पडूं द्या.

---

**ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस व वाचकांस सुखाचें जावो !**

# उद्योगपतींच्या नव्या जबाबदाऱ्या

( शं. वा. किर्लोस्कर )

उद्योगपतींच्या नव्या जबाबदाऱ्या कोणत्या, ह्याचें उत्तर देण्यापूर्वी उद्योगपति हा शब्द स्वतःला चिकटवून घेणें मला तितकेसें पसंत नाहीं हें सांगून टाकलेलें बरें. कारण; हा शब्द जरा बडेजावपणाचा दिसतो. असा बडेजाव मिरविण्याचे हे दिवस नाहींत. हातानें काम करणाऱ्यास कामगार म्हणावयाचें तर मोठा उद्योग करणाऱ्यास हवें तर उद्योगगार म्हणा; किंवा नेहमींचा कारखानदार हा शब्द वापरला तरी काय बिघडलें?

असा कारखानदार होणाऱ्यास जन्मतः कांहीं गुण असावे लागतात. यांत्रिक विषयाची आवड, आत्मविश्वास, संघटनाचातुर्य, इत्यादि गुण अंगीं असल्याशिवाय या क्षेत्रांत पुढें येण्याचें काम कोणालाहि कठीण. कोणती तरी नवी वस्तु अथवा माल तयार करून समाजाची एखादी गरज दूर करण्याची त्याच्या मनांत अत्यंत उत्सुकता पाहिजे. मग ती काड्याच्या पेटीसारखी साधी वस्तु असो, अथवा एखादें मोठें यंत्र असो. प्रत्येक कारखानदार हा एक निर्माता असतो. तेव्हां त्याची खरी जबाबदारी कोणती असेल तर निर्मितीचें कार्य शक्य तितक्या यशस्वी रीतीनें पार पाडणें ही होय. समजा, त्याचा चाकू-कात्र्यांचा कारखाना आहे. तर हा माल शक्य तितक्या चांगल्या प्रतीचा तयार करून तो माफक किंमतीला ग्राहकांस पुरविणें, हें त्याचें काम.

हें त्याचें काम सोपें नसतें व बदलत्या परिस्थितीप्रमाणें त्याच्यापुढें नव्या नव्या अडचणी उत्पन्न होत असतात. त्यामुळें त्याची स्वतःच्या जबाबदारींतून पूर्ण मुक्तता कधींच होऊं शकत नाहीं.

याची कल्पना येण्यासाठी आपण ५०-६० वर्षांपूर्वीच्या काळांत जरा नजर टाकूं. त्यावेळीं आपल्याकडे आधुनिक प्रकारचे उद्योगधंदे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेहि देखील नव्हते. जे जुने हस्तव्यवसाय देशांत चालत होते, त्यांची ब्रिटिश राजवटींत पार धुळदाण उडाली होती. सारा देश कंगाल बनत चालला होता.

देशावर असा निर्वाणीचा प्रसंग गुदरला असतां लोकमान्यांचा अवतार झाला. लोकमान्य धैर्याचें मेरुमणि. खरे मुत्सद्दी. ब्रिटिश सरकारला नरम आणण्यास त्यांनीं जनतेला स्वदेशीचा महामंत्र दिला. त्याप्रमाणें जिकडे तिकडे परदेशी मालावर बहिष्कार पडतांच लंडन-मँचेस्टरचे कारखानदार व गिरणीवाले गडबडले. ती कळ मर्मापर्यंत जाऊन भिडण्यास वेळ लागला नाहीं.

पण एवढ्यानेंच स्वदेशी चळवळ यशस्वी होणें कठीण होतें. परदेशी मालाची जागा भरून काढण्यासाठी आपल्या देशांत भराभर नवे कारखाने निघणें तितकेंच अत्यावश्यक होतें.

महाराष्ट्रांतील होतकरू व कल्पक कारखानदारांवर पडलेली ही पहिली जबाबदारी होय.

त्यांना हें एक आव्हानच होतें नाहीं. पूर्वीचा अनुभव; नाहीं पैशाचें पाठबळ. आणि सरकारचा आश्रय म्हणावा तर त्याचें नांवच नको. उलट, अशा नव्या कारखान्यांना आडकाठी कशी करतां येईल इकडेच त्याचें लक्ष. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे असे स्वदेशी कारखाने काढायचें काम एक दिव्यच होतें.

अशा एका नव्या कारखान्याला लोकमान्यांनीं तेव्हां भेट दिली होती. त्यावेळीं सरकारच्या प्रतिकूल धोरणामुळें त्या कारखान्याला डोकें वर काढणें किती कठीण जात आहे याची त्यांना प्रत्यक्ष कल्पना आली. त्यावर त्या कारखानदाराला उद्देशून ते म्हणाले :

"पारतंत्र्यांत असें न होईल तरच आश्चर्य. तथापि तुम्ही करीत आहांत हें एक मोठें राष्ट्रकार्य आहे. उद्यां हिंदुस्थानला स्वराज्य मिळालें तरी उद्योगधंद्यांच्या वाढीशिवाय त्याचा तरणोपाय नाहीं. तेव्हां असल्या कसल्याहि संकटाला न जुमानतां पुढील काळावर नजर ठेवून तुम्ही आपलें काम नेटानें चालवा."

अशा निश्चयानें व धडाडीनें आपल्या अंगीकृत कार्याला वाहून घेणारे कांहीं कल्पक तरुण आपल्या देशाला लाभले म्हणून तशाहि प्रतिकूल परिस्थितींत निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें बीजारोपण त्यांच्याकडून पार पडलें. महाराष्ट्रांत आज जे कारखाने नांवारूपाला आलेले दिसतात त्यांची मुहूर्तमेढ अशा प्रयत्नवादी तरुणांनीं रोवली आहे हें दिसून येईल.

त्यानंतर गेल्या ५०-६० वर्षांत महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाचें पाऊल आणखी बरेंच पुढें पडलें आहे. त्याची साक्ष ठिकठिकाणीं चालू झालेले निरनिराळ्या मालाचे कारखाने कोणासहि सहज देऊं शकतील.

या औद्योगिक विकासाला त्या त्या कारखान्याच्या चालकांचे परिश्रम कारणीभूत आहेतच. पण मध्यंतरीं झालेल्या दोन जागतिक युद्धांमुळें भारतीय औद्योगिक प्रगतीला फार मोठी चालना मिळाली, हेंहि तितकेंच खरें. दुसऱ्या महायुद्धानंतर तर नवे उद्योगधंदे काढणेची देशांत मोठीच लाट उसळली.

त्यानंतर देश स्वतंत्र झाला. आपल्या घराचे आपणच आतां मालक. नवनवे उद्योगधंदे काढणारास ही तर पर्वणीच आली; नव्हे यापुढें देशाची औद्योगिक आगेकूच झपाट्यानें केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कारण भारताचें परावलंबन, आर्थिक दौर्बल्य, बेकारी व मागासलेपणा दूर करावयाचा असेल व सुधारलेल्या जागतिक राष्ट्रांच्या बरोबरीचें त्याला स्थान मिळवून द्यावयाचें असेल तर शेतीचें व औद्योगिक उत्पादन चौफेर वाढवून देश स्वयंपूर्ण करणें हा त्यावर एकमेव उपाय आहे. त्या उद्योगाला सरकार व कारखानदार दोघेहि मोठ्या नेटानें लागले. त्यासाठी पंचवार्षिक योजना आंखण्यांत आल्या.

एकीकडे देशाच्या औद्योगिक विकासाला असें अत्यंत अनुकूल वातावरण निर्माण झालें असता, त्याबरोबर कारखानदारांपुढें कांहीं बिकट समस्याहि उभ्या राहिल्या. याचें कारण देशांत स्वातंत्र्य येतांच आपल्या जुन्या सामाजिक व आर्थिक रचनेंत मोठेंच स्थित्यंतर सुरू झालें. जुनी घडी बदलून देशांत समाजवाद प्रस्थापित करण्याचें ठरतांच व्यक्तीचें पूर्वीचें अधिकारक्षेत्र व त्याची मिळकत यावर आपोआपच नियंत्रण आलें. त्याबरोबर उद्योगधंद्यांत राष्ट्रीयीकरणाचें तत्त्व अमलांत येतांच सरकारी मालकीचे व खासगी मालकीचे कारखाने असा त्यांत भेदाभेद झाला व स्वतःच्या हिंमतीवर कारखाने काढणाऱ्यांची कदर पूर्वीसारखी उरली नाहीं. आणि या सर्वांवर कडी म्हणजे प्रत्येक क्षेत्रांत वर्गकलहाचें भूत संचार करूं लागल्यानें

कारखाना तिथें बखेडा व कटकटी, असा प्रकार सगळीकडे दिसूं लागला.

देशांतील उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धीची मुख्य मदार ज्या वर्गावर त्याला आपली जबाबदारी पार पाडण्याचें काम सध्यां किती मुष्कीलीचें झालें आहे याची एवढ्यावरून थोडी कल्पना येईल. या परिस्थितींत कांहीं सुधारणा व्हावी असें त्यांस वाटत असेल तर त्यांनींच योग्य दिशेनें प्रयत्न केले पाहिजेत. आपण आतां लोकशाहींत रहात आहों. लोकसभा करील ते कायदे व निर्बंध सर्वांना पाळावे लागतात. या लोकसभेंत स्वतःची बाजू योग्य प्रकारें पुढें मांडली गेली पाहिजे. आपला आवाज कायदे-मंडळांत जोरदार रीतीनें उठवला नाहीं तर कारखानदारांची दाद कोण घेणार? राजकारणापासून अलिप्त राहून यापुढें भागणार नाहीं, ही जाणीव कारखानदारांस जितक्या लवकर होईल तितकें बरें.

या ठिकाणीं मला एक जुनी आठवण होते. ती सांगितल्यावर कारखानदारांस त्याचें योग्य स्थान सध्यां का मिळत नाहीं याचें एक कारण लक्षांत येईल.

सात–आठ वर्षांखालीं मुंबईचे तेव्हांचे गव्हर्नर सांगली–मिरज भागाला भेट देण्यास आले असतां तिकडील कारखानदारांनींहि त्यांचा सत्कार केला. त्यावेळीं त्यांना एक निवेदन सादर करण्यांत आलें. त्यांत सरकारच्या विविध निर्बंधांपुळें व औद्योगिक कायद्यांमुळें कारखानदारांची कुचंबणा होत आहे याची वास्तविक हकिकत दिली होती. उद्देश हा कीं, सरकारचें तिकडे लक्ष जाऊन कारखानदारांविषयींच्या धोरणांत इष्ट तो बदल व्हावा.

गव्हर्नरसाहेब जरा गमती स्वभावाचे होते. आमचें निवेदन आटोपल्यावर त्यांनीं विचारलें :

'बरें, तुम्ही इथें किती कारखानदार जमला आहां?'

मी म्हणालों, 'असतील सुमारें शंभर.'

'आणि तुमच्या कारखान्यांत सगळे कामगार किती असतील?'

'असतील १५–२० हजार.'

'झालं तर! १५–२० हजार व्होट एकीकडे व १०० व्होट दुसरीकडे. इथें तुमची डाळ कशी शिजावयाची?' गव्हर्नरसाहेबांनीं हंसत हंसत वस्तुस्थितीचें निदान बरोबर केलें.

राजकारणाप्रमाणें सामाजिक जीवनापासूनहि यापुढें कारखानदारांना दूर राहून भागणार नाहीं. समाजापासून अलग राहणाऱ्या वर्गाबद्दल अनेक प्रकारचे गैरसमज व विकृत भावना निर्माण होतात. हा ग्रह प्रसंगापात केवढें अनर्थकारक स्वरूप धारण करतो याचा १० वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील कारखानदारांस चांगलाच अनुभव आला आहे. तेव्हां कारखानदार आपापल्यापरी एक महत्त्वाची भूमिका पार पाडीत असले, तरी तेवढ्यावरच संतुष्ट न राहतां, बहुजन समाजाशीं जितका जवळचा संबंध जोडतां येईल व त्याचें जेवढें प्रेम संपादन करतां येईल तेवढें त्यांनीं केलें पाहिजे.

आपल्या देशांत मोठमोठ्या यंत्रांपासून साध्यासुध्या वस्तूपर्यंत किती विविध प्रकारचा व विलायतीच्या तोडीचा माल तयार होऊं लागला आहे हें पाहिल्यास कोणीहि चकित होईल. तथापि आपल्या गरजा आपण भागविल्या म्हणजे संपलें नाहीं; तर 'मेड इन इंडिया' या शिक्क्याचा तऱ्हतऱ्हेचा माल परदेशांतहि मोठ्या प्रमाणावर निर्यात होऊं लागला पाहिजे. भारताची लक्ष्मी ज्या वाटेनें बाहेर गेली, त्याच वाटेनें तिला परत आणली पाहिजे. हेंहि कारखानदारांचेंच काम.

देशाच्या स्वातंत्र्यरक्षणाची महत्त्वाची जबाबदारीहि आधुनिक युद्ध-पद्धतींत कारखानदारांवरच पडते. आमच्या सौजन्याचा फायदा घेऊन आमच्यावर कोणी आक्रमण सुरू केल्यास आम्हांलाहि हातीं शस्त्र घ्यावें लागेल. असा प्रसंग आल्यास आपल्या देशबांधवांच्या नेहमींच्या गरजा भागवून जरूर त्या शस्त्रास्त्रांची व युद्धसाहित्यांची निर्मिति करण्याकडे आपल्या कारखान्यांतील यंत्रांचें तोंड वळवावें लागेल. आजचीं युद्धें हीं यंत्रांवरच अवलंबून असतात. त्यामुळें खरी लढाई राष्ट्राराष्ट्रांतील कारखानदारांमध्येंच जुंपते. स्वतंत्र भारतांतील कारखानदारांनीं ह्या नव्या जबाबदारीची जाणीव अवश्य ठेवली पाहिजे.

स्वातंत्र्यपूर्व काळांतील कारखानदारांपेक्षा सध्यांच्या कारखानदारांपुढें अधिक उज्ज्वल भवितव्य आहे. अर्थात् हेंहि कबूल केलेंच पाहिजे कीं, नव्या कायद्यांमुळें निर्माण झालेले निर्बंध व विशिष्ट कामगारविषयक परिस्थिति यामुळें कांहीं अडचणी वाढल्याहि आहेत. परंतु त्यामुळें निरुत्साही होऊन चालणार नाहीं. उलट, या परिस्थितीशीं जुळतें घेऊन चातुर्यानें व विशाल राष्ट्रहित डोळ्यांपुढें ठेवून कारखानदारांनीं आपलीं पावलें आत्मविश्वासानें उचललीं पाहिजेत. त्यामुळेंच सरकार व जनता यांच्या आदरास ते पात्र होतील. आणि शांततेच्या काळांत किंवा युद्धाच्या काळांत राष्ट्राचे खरें आधारस्तंभ आपण आहोंत असा सार्थ अभिमान त्यांना बाळगतां येईल. (पुणें नभोवाणी केंद्राच्या सौजन्यानें)

रजिस्टर्ड ट्रेड मार्क

सर्व सुगंधी कारखानदारांना लागणारा कच्चा माल, एसेन्शियल ऑइल्स, ॲरोमॅटिक केमिकल्स, रेझिनॉइड्स, इत्यादि हिंदुस्थानांत प्रथमच तयार करणारे कारखानदार

एस. एच. केळकर आणि कं. प्रायव्हेट लि.

आमचे प्रख्यात व उच्च प्रतीचे 'नाग छाप' सुगंधी अर्क सौंदर्य-प्रसाधनांत सर्वत्र वापरले जातात.

पत्ता:–३६ मंगळदास रोड, मुंबई नं. २

# सहकारी संघटनेची नवी धाटणी

( वैकुंठ ल. मेहता )

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची आखणी करण्याच्या दृष्टीनें देशांत आतां चर्चा चालू झाली आहे. गेल्या जुलै महिन्यांत म्हैसूर येथें समाजविकास योजना परिषद् भरविण्यांत आली होती. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आखणीच्या दृष्टीनें ह्या परिषदेला विशेष महत्त्व आहे. समाजविकास योजनांची संघटनाहि भारतांत नवीन आहे ह्या संघटनेची सुरुवात ऑक्टोबर १९५२ मध्यें झाली सहकारी संघटना स्थापन होऊन मात्र ५५ वर्षे लोटलेलीं आहेत. समाजविकास परिषदेंत बोलतांना नियोजन समितीचे उपाध्यक्ष ह्यांनीं असें सांगितलें कीं, समाजविकास योजनांची संघटना आणि सहकारी संघटना ह्यांचा निकटचा संबंध आहे; इतकेंच नव्हे तर त्यांच्या तत्त्वज्ञानांतहि मुळींच भेद नाहीं. उपाध्यक्षांच्या ह्या विचारांशीं सहमत होण्यास कांहींच हरकत नाहीं. तथापि, सुसंबद्ध रीतीनें अंमलांत आणण्याचा कार्यक्रम ह्या नात्यानें समाजविकास योजनांची जबाबदारी मध्यवर्ती सरकारच्या त्या खात्याकडे ह्याच वर्षी पहिल्यानें सोपविण्यांत आली. दोन वर्षांपूर्वी डॉ. कार्ल टेलर ह्यांनीं समाजविकास योजनांच्या कार्याविषयीं आढावा घेतला होता. त्यांत त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, समाजविकास योजनांची कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती, त्यांना एकंदरीनें सहकारी संघटनांसारख्या लोकाधिष्ठित संघटनांच्या स्थानाची नीटशी कल्पना आलेली नाहीं. त्यामुळें अर्थातच लोकांच्या संघटनांशीं व्यवहार करतांना ज्या प्रकारच्या मनोवृत्तीची जरूरी असते ती मनोवृत्ति त्यांनीं निर्माण केलेली नाहीं.

अशा तऱ्हेचें मत समाजविकास योजनांचें मूल्यमापन करतांना प्रा. कर्वे आणि डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं पूर्वीच्या अहवालांतून व्यक्त केलेलें आहे. तेव्हां श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी समजतात त्याप्रमाणें समाजविकास योजना व ग्रामपंचायती, ह्या सहकारी संघटनापासून वेगळ्या पडलेल्या असल्या तर त्याचा दोष समाजविकास योजनेच्या कारभाराशीं पोंचतो. त्यांच्यांत हा दुवा निर्माण करण्यांत आला नाहीं. त्यामुळें नियोजन समितीनें असा दृष्टिकोन स्वीकारला कीं सुसंबद्ध व सहकारी तत्त्वावर आधारलेला कार्यक्रम रद्द करण्यांत यावा आणि प्राथमिक संघटनेसाठीं नवीनच पद्धतीचा स्वीकार करण्यांत यावा. वास्तविक दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नियोजन-समितीनेंच सुसंबद्ध सहकारी कार्यक्रमाचा अंतर्भाव केलेला होता. पण, सहकारी संघटनांचें स्वरूपच बदलावें असा नियोजन-मंडळाचा हेतु नाहीं. जुन्या पद्धतीच्या ग्रामीण समाजपद्धतीचाच पुन्हा स्वीकार करण्यांत आलेला आहे. फक्त संघटनेच्या सभासदांच्या संख्येंत बदल करण्यांत आलेला आहे. ह्या बदलामुळें सहकारी संघटनांच्या सभासदांत परस्परांच्या ओळखीमुळें संयुक्त-जबाबदारीची भावना वाढीला लागेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. सध्यां तरी एकेका खेड्यापुरती मर्यादित अशीच सहकारी संघटना आपल्यापुढें आहे. ह्या पद्धतीच्या संघटनेचे दोष व उणीवा रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें उजेडांत आणल्या. वास्तविक ही पद्धत आपल्या कार्यक्षेत्रापुरती सर्वदृष्ट होती. तरीसुद्धां उत्पादनासाठीं लागणाऱ्या एकूण कर्जपुरवठ्यापैकीं फारच अल्प भाग ती पुरवूं शकली.

अन्नधान्यांच्या उत्पादनाच्या बाबतींत चाकें रुतल्यासारखीं झालेलीं होतीं. ह्या संबंधांत उत्पादनासाठीं कर्जपुरवठ्याची तांतडीची गरज कमिटीला पटली. म्हणूनच ग्रामीण भागांतील कर्जपुरवठ्याचा एखादा सुसंगत कार्यक्रम आखण्याची गरज कमिटीला वाटली; आणि असा कार्यक्रम दुसऱ्या योजनेंत समाविष्ट करण्यांत आला. जून, १९५६ ते जून, १९५८ ह्या काळांत सहकारी संघटनांनीं शेतीसाठीं पुरविलेल्या कर्जाच्या पुरवठ्याची रक्कम ५९.८५ कोटी रुपयांपासून १००.१० कोटी रुपयांपर्यंत वाढली. ह्यावरून वरील कार्यक्रमाला मिळालेल्या प्रतिसादाची कल्पना येईल. शेतीच्या उत्पादनासाठीं राष्ट्रीय साधनसामुग्रीपैकीं अधिक मोठा हिस्सा वापरला जाऊं लागला तर काय होऊं शकेल, ह्याची कल्पना वरील आंकड्यांवरून येईल. अगदीं तळाच्या सहकारी संघटनेचा मध्यवर्ती सहकारी संघटनेच्याद्वारां मध्यवर्ती बँकिंगशीं संबंध जोडून शेतीसाठीं एक सुसंगत कर्जपुरवठ्याचा कार्यक्रम आखणें शक्य झालें असतें. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआकडून जादा पैशाचा पुरवठा झालेला आहे. बँकेनें सहकारी संघटनांच्या बाबतींतील आपल्या व्यवहारांचें क्षेत्र शुद्ध व्यापारी पायावर वाढविलेलें आहे. कारण, अंगभूत संरक्षणाची व्यवस्था करून कर्जपुरवठा करण्याची जी यंत्रणा आहे ती रिझर्व्ह बँकेला संमत अशीच आहे. आतां ह्या पद्धतीची यंत्रणा रद्द करण्यांत यावी असें सुचविण्यांत येत आहे.

ह्या सूचनेचें कारण म्हणून असें सांगण्यांत येत आहे कीं उत्पादनाचा जो कार्यक्रम आखण्यांत आलेला असेल तो खेड्यांतच रुजलेला असा असला पाहिजे आणि प्रत्येक खेड्याची जर स्वतःची सहकारी संघटना असेल तरच हें शक्य होणार आहे. नव्या पद्धतींत कुटुंबांची एकूण संख्या जर २०० च्यावर जात नसेल तर एखाद्या खेड्याच्या कार्यक्षेत्रांत त्या शेजारच्या खेड्यांचा अंतर्भाव करण्यास हरकत ठेवलेली नाहीं. अर्थातच प्रत्येक खेड्यासाठीं स्वतंत्र सहकारी संघटना ठेवण्याचें तत्त्व अगदीं कटेकोर रीतीनें पाळतां येणार नाहीं. ज्या खेड्यांची लोकसंख्या १,००० च्या वर आहे अशा खेड्यांची देशांतील संख्या अवघी दोन लाख आहे. बहुतेक खेड्यांतून दोनशेंपेक्षा कमीच कुटुंबें आहेत. शेतीसाठीं कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या कार्याबद्दलच्या आंकडेवारीच्या कोष्टकांवर सहज नजर टाकली तरीसुद्धां एक गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे. त्यांचें व्यवहाराचें क्षेत्र इतकें लहान आहे कीं त्यांपैकीं बहुतेकांना वर्षानुवर्षे तोटा सहन करावा लागतो. त्यांचा कारभारावर होणारा खर्च दरसाल सरासरी १०० रुपयांपेक्षा अधिक नसतो; तरीहि तोटा येतो. इतक्या लहान प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या खेड्यांतील सहकारी संघटना प्रत्यक्ष उत्पादनाचें काम हातीं घेतील अगर स्थानिक बचतीचा संचय करतील अगर कर्जपुरवठ्याचा बाजाराशीं व विक्रीशीं संबंध जोडून कर्जाच्या नियमित फेडीची व्यवस्था करतील, अशी कल्पनाहि करणें अवघड आहे. पूर्वी भरलेल्या परिषदेनंतर राज्यसरकारांच्या सहकार-मंत्र्यांची परिषद् भरविण्यांत आली होती. तींत उत्पादनाचा कार्यक्रम किंवा खरें म्हणजे त्यासाठीं लागणारा पैसा ह्याच विषयावर चर्चा करण्यांत आली.

त्यापूर्वी मध्यवर्ती सरकारनें राज्यसरकारकडे अशी इच्छा प्रदर्शित केली होती कीं, त्यांनीं सर्व देशांत मिळून ४०० खड्यांत शेतीला कर्जपुरवठा करणाऱ्या प्रायोगिक उत्पादक योजना हातीं घ्याव्या. ह्या प्रायोगिक योजनेसाठी मध्यवर्ती सरकार ८ कोटी रुपयांचा खास निधि उभारण्यास व तो राज्यसरकारांच्या हवालीं करण्यास तयार होतें. सहकारी संघटनांच्या द्वारां सध्यां जो कर्जाचा पुरवठा केला जातो त्यापेक्षा अधिक कर्जपुरवठ्याची गरज आहे असें अर्थातच गृहीत धरण्यांत आलें होतें. नियोजन समितीच्या उपाध्यक्षांनीं परिषदेंत बोलतांना मात्र वरील सूचनेशीं विसंगत असें मत व्यक्त केलें आहे. आपल्या भाषणांत त्यांनीं असें सांगितलें कीं, खेड्यांवर आधारलेला उत्पादनाचा कार्यक्रम आंखतांना एक धंदेवाईक व्यापारी संघटना ह्या नात्यानें सहकारी संघटनांना कमीपणा येईल अगर त्यांच्या मजबुतीला धक्का पोंचेल असें कांहींहि करण्यांत येणार नाहीं. ज्या संस्थांचें अस्तित्व बँकिंगच्या तत्त्वांच्या मजबूत पायावर आधारलेलें नाहीं त्यांना मदत करण्याचा सल्ला रिझर्व्ह बँकेला देण्यांत येणार नाहीं.

ज्या ज्या शेतकऱ्यानें कर्ज घेतलें त्या त्या शेतकऱ्याची उत्पादनक्षमता आणि काम करण्याची पात्रता ह्यांच्यांत जर वाढ झाली आणि तो पतीवर कर्ज देण्यास अधिक योग्य झाला तर ही प्रायोगिक योजना यशस्वी होण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या प्रयोगाच्या कक्षेंत येणाऱ्या उत्पादक शेतकऱ्यांच्या वर्तणुकीवर आणि कार्यक्षमतेवर उत्पादनाच्या कार्यक्रमाचा परिणाम काय होईल हे स्पष्ट झालेलें नाहीं, ही पहिली गोष्ट. दुसरें असें कीं, प्रायोगिक योजनेंत सुचविण्यांत आलेला उत्पादनाचा कार्यक्रम सर्व खेड्यांसाठी मिळून आहे. शेतकऱ्याची उत्पादनक्षमता आणि तीवर आधारलेली त्याची पत ह्यांच्यावर अत्यल्प परिणाम घडवून आणणाऱ्या कांहीं गोष्टी कार्यक्रमांत आहेत. असें असलें तरी, सर्व उत्पादकांना त्यांच्या दानतीचा अगर पात्रतेचा विचार न करतां संस्थांमार्फत कर्ज देणें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें इष्ट ठरलें तर सरकारला त्यासाठी लागणारा पैसा तरी दिला पाहिजे अगर सरकारनें तोटा भरून देण्याची हमी तरी घेतली पाहिजे, ही गोष्ट उघड आहे.

सहकारी पतपेढ्यांचा मुख्य आधार म्हणजे दानत व पात्रता आहे, हे ह्या ठिकाणीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

मध्यवर्ती बँका, केंद्रीय बँका आणि रिझर्व्ह बँक ह्यांच्या ऐवजीं मध्यवर्ती सरकारनें कर्जासाठी पैसा पुरवावयाचा ह्या न्यास त्यामधील अडचणी सहजपणें कळण्यासारख्या आहेत. मुंबई राज्यांत सध्यां भाताची लागवड भरपूर खतपाण्याच्या साह्यानें करण्याची योजना चालू आहे. सर्व शेतकऱ्यांना तिचा फायदा मिळत आहे. कर्ज देणाऱ्या संस्थांना तोटा आल्यास तो भरून देण्याची हमी सरकारनें घेतलेली आहे व राज्यसरकार सहकारी संघटनांच्या भाग-भांडवलाचा कांहीं भागहि घेतें. नियोजन समितीनें असा दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो कीं, सरकारनें प्राथमिक सहकारी संघटनांच्या भाग-भांडवलांत रक्कम गुंतविणें योग्य होणार नाहीं. कारण एखादी सहकारी सोसायटी काढूं शकत असलेल्या कर्जाची मर्यादा वाढवून तिची कर्ज मिळविण्याची पात्रता वाढवितां येईल. ही मर्यादा वाढविली तर धनकोची जोखीम वाढते. खेडेगांवच्या एखाद्या सहकारी सोसायटींमधील छोट्या भागीदाराची जोखीम वाढते कारण तोटा आल्यास त्यांच्या भागाची किंमत कमी होण्याचा अगर संपूर्ण नाहींशी होण्याचा धोका असतो. म्हणून प्रारंभीं गॅरंटी फंडाला सरकारकडून मजबुती आणण्यांत आली तर शेतकरी सभासदांना उत्तेजन मिळतें आणि त हळूहळू आपल्या जवळील निधि वाढवून राज्यसरकारनें दिलेलें भाग-भांडवल परत फेडण्यास मदत करतात. सरकारकडून मिळणाऱ्या ह्या स्वरूपाच्या मदतीऐवजीं सहकारी संस्थांच्या प्राथमिक पातळीवर एक बँक डेट फंड निर्माण करण्यांत यावा आणि कर्ज देणाऱ्या मध्यवर्ती संस्थाकडून मिळणाऱ्या कर्जाबद्दल टक्केवारीनें हमी देण्यांत यावी अशा सूचना करण्यांत आल्या होत्या. अखेर सध्यांच्या कायद्याप्रमाणें व व्यवहाराप्रमाणें प्राथमिक सहकारी संघटनांना पैसा पुरविण्याची पुरेशी व्यवस्था आहे कीं नाहीं हें पाहाण्यासाठी आणि प्राथमिक सहकारी संघटनांची कर्ज काढण्याची मर्यादा वाढविण्यासाठी काय करावें तें सुचविण्यासाठी एक छोटी कमिटी नेमण्यांत आली. कमिटीच्या शिफारशी येण्यास अद्याप अवधि आहे.




# बँकिंगच्या व्यवसायासाठी पंचवार्षिक कार्यक्रम

## नागरी नाणेबाजार व ग्रामीण नाणेबाजार ह्यांच्यामध्यें दुवा असण्याची आवश्यकता

हिंदमधील आर्थिक घडामोडींना जोराची गति मिळाली असल्यामुळें बँकांजवळील संचयावर वाढतें दडपण येत आहे. त्यामुळें पैशाची तात्पुरती सोय करण्याच्या मागण्यांत एकदम वाढ झालेली आहे. शिवाय, जीं कर्जे अल्प मुदतीनें घेण्यांत आलीं होतीं त्यांचा उपयोग मध्यम मुदतीच्या कर्जासारखा करण्यांत येऊं लागला आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, बँकिंगकडे पहाण्याच्या दृष्टिकोनांत आणि कार्यांत क्रांतिकारक बदल झालेला आहे. बदलत्या व बदललेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी बँकिंगची एखादी योजना हेतुपुरस्सर आंखण्यांत आली पाहिजे असें दिसत आहे. हिंदी बँकिंग उपयुक्ततेच्या कसोटीला उतरावयाचें असेल तर बँकिंगबद्दलच्या विचारसरणींत आणि हेतूंत कांहीं बदल घडवून आणणें अगत्याचें झालें आहे. समाजपद्धतींत जो बदल घडून येत आहे त्याची दखल घेणाऱ्या आणि वसाहतींच्या स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेंतून बाहेर पडून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या अवस्थेंत प्रवेश करणाऱ्या नव्या अर्थव्यवस्थेच्या गरजा ह्या विचारसरणीनें लक्षांत घेतल्या पाहिजेत. सध्यां बँकिंगची जी स्थिति आहे तिच्या मुळाशीं कांहीं कारणें आहेत. वसाहतीला शोभण्यासारख्या मागासलेल्या अर्थव्यवस्थेचें औद्योगिक अर्थव्यवस्थेंत रूपांतर करण्यासाठी हिंद आज जोराचे प्रयत्न करीत आहे. बँकिंगच्या सध्यांच्या परिस्थितीचें निदान ह्या संक्रमणावस्थेंत सांपडण्यासारखें आहे. औद्योगिकरण साधण्यासाठी पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांच्या द्वारां अनेक विकास-योजना ह्यापूर्वींच पूर्ण करण्यांत आलेल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आलेल्या विकास-योजना पार पाडण्याचें काम सध्यां चालू आहे. दोन्ही पंचवार्षिक कार्यक्रमांचा बँकिंगवर प्रत्यक्षच परिणाम घडत असतो. तथापि, पंचवार्षिक कार्यक्रम आणि बँकिंग ह्यांच्यामधील परस्परसंबंधांची जाणीव मात्र फारच थोड्या लोकांना आहे असें दिसतें. श्रॉफ कमिटीनें खाजगी विभागाला लागणाऱ्या द्रव्यविषयक गरजांचा जो अभ्यास केलेला आहे, तो सोडला तर बँकिंगच्या गरजांचा अभ्यास असा फारसा करण्यांत आलेलाच नाहीं. पण अर्थव्यवस्थेला बुद्धिपुरस्सर वळण लावण्याचे जे प्रयत्न करण्यांत येत आहेत त्यांचा बँकिंगवर चांगलाच परिणाम झालेला आहे. आगामी काळांत बँकांवरील ताण अधिकाधिक वाढत जाणार आहे ही गोष्ट अगदीं निश्चितपणें सांगतां येण्यासारखी आहे. म्हणून बँकिंगविषयीं एखादा आराखडा विचारपूर्वक तयार करण्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यांत आलें पाहिजे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें ही गोष्ट करणें अतिशय महत्त्वाचें झालें आहे.

पहिला पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यांत आला त्यावेळीं असें गृहीत धरण्यांत आलें होतें कीं, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबरोबर आर्थिक घडामोडींची गति एकदम झपाट्यानें वाढेल. प्रत्यक्ष अनुभव मात्र ह्या अपेक्षेच्या अगदीं उलट आला. १९५१-५२ सालीं वापरांत असणाऱ्या चलनी नोटा आणि शेड्यूल्ड बँकांजवळील ठेवी ह्यांच्यांत बऱ्याच प्रमाणांत घट झाली. पुढील वर्षीहि असाच अनुभव आला. फक्त घट जरा कमी प्रमाणांत झाली एवढेंच. १९५३-५४ साल उजाडेपर्यंत ह्या प्रक्रियेला उलटी गति मिळाली नाहीं. असें होण्याचें कारण काय तें आतां पाहूं. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी जो खर्च करावा लागेल त्याचें प्रतिबिंब चलनी नोटांच्या वापरांत दिसून येईल अशी अपेक्षा करण्यांत आली होती. पण ती चुकीची ठरली. पहिल्या कार्यक्रमांत दरसाल ४०० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. पण ह्यांपैकी बहुतेक खर्च शेतीविषयक योजनांवर करण्यांत आला ही गोष्ट लक्षांत घेण्यांत आली नाहीं. शेतीविषयक योजनांवर जो पैसा खर्च करण्यांत आला तो चलनी नोटांच्या रूपानें करण्यांत आला असला तरी बँकिंगच्या कक्षेंत येऊंच शकला नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, भारतांत एकापेक्षा अधिक नाणेबाजार आहेत ह्या वस्तुस्थितीकडे पुरेसें लक्ष देण्यांत आलें नाहीं. नागरी विभागांत व्यवहार करणारा असा एक नाणेबाजार आहे, त्यालाच मुख्यतः नाणेबाजार ही संज्ञा लागू करण्यांत येते. दुसरा नाणेबाजार म्हणजे पैशाचा काळा बाजार. ह्या बाजारांत सर्व व्यवहार रोखीनें होत असतात. ह्या बाजारांतील पैसा म्हणजे कर चुकवून मिळविलेलें उत्पन्न असतें. ह्याशिवाय ह्या दोन नाणेबाजारांच्या कक्षेच्या बाहेर असलेला असा तिसरा शेष नाणेबाजार असतो. नागरी विभाग सोडून जो अवाढव्य प्रदेश पसरलेला आहे त्यांत ह्या बाजाराचें कार्य चालतें. आपल्याला जो अभ्यास करावयाचा आहे त्यासाठी नाणेबाजारांतील काळ्या बाजाराचा विचार करण्याचें कारण नाहीं. पण दुसरे दोन नाणेबाजार मात्र महत्त्वाचे आहेत. दोन्ही अलीकडेच अस्तित्वांत आलेले आहेत. दोन्हींमध्यें बदल घडवून आणणें जरूरीचें झालें आहे, आणि दोन्हींच्या बाबतींत बँकांनीं कांहींतरी जोरदार क्रियाशीलत्व दाखविण्याची गरज उत्पन्न झालेली आहे. नागरी विभागांतील नाणेबाजार आणि शेतीच्या विभागांतील नाणेबाजार ह्यांच्यांत एकमेकांवर परिणाम घडवून आणणारे दुवे नाहींत, आणि ह्याच गोष्टीमुळें हिंदच्या अर्थव्यवस्थेपुढें मोठा बिकट प्रश्न उत्पन्न झालेला आहे. बँकिंगच्या सोयींचा फायदा करून घेण्याची वृत्ति हिंदमध्यें जितकी फैलावयास पाहिजे होती तितकी ती फैलावलेली नाहीं. त्यामुळें असें होतें कीं ग्रामीण विभागांत ज्या नोटा खेळविल्या जातात त्यांचे क्षेत्र अगदींच मर्यादित असतें आणि त्यामुळें नाणेबाजारावर विपरीत परिणाम होतो.

पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीवर भर देण्यांत आलेला असल्यामुळें कार्यक्रमावर झालेल्या खर्चाच्या रकमा नागरी विभागांतील नाणेबाजाराला तावडतोब उपयोगी पडल्या नाहींत. अर्थात् असें होणें अपरिहार्यच होतें. ह्याचाच अर्थ त्या बँकिंगच्या व्यवहाराच्या कक्षेंत लवकर आल्या नाहींत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत औद्योगिक विभागांतहि योजनांची एक मालिका होती. पण भांडवलाच्या बाजाराची परिस्थिति अशी होती कीं, नव्या उद्योगधंद्यांकडे भांडवलाचा प्रवाह सहजपणें जाणें अशक्यच होतें. त्यामुळें आपल्या विस्तारासाठी लागणारा पैसा जमेल त्या मार्गानीं उभा करण्याचे प्रयत्न उद्योगधंद्यांनीं सुरू केले. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मुख्य

ही दीपावलि बँकेचे समासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो!

# जनता सहकारी बँक लिमिटेड

८६६ सदाशिव पेठ, पुणें २.
फोन नं. ६६४३
शाखा:—घोले रोड, शिवाजीनगर, पुणें ५.
फोन नं. ७७९६

अध्यक्ष:—श्री. म. रा. मिठापेली

: संचालक मंडळ :

श्री. गो. प्र. भागवत, कार्याध्यक्ष.

| | |
|---|---|
| श्री. कृ. ह. दाते | श्री. ल. म. आडप |
| श्री. ना. र. ओक | श्री. पं. ग. बनवारी |
| श्री. बा. गो. ठकार | श्री. मु. रा. किराड |
| श्री. वा. ग. परांजपे | श्री. द. शं. जमदग्नि |

मॅनेजिंग डायरेक्टर

★ महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख ठिकाणीं ड्राफ्ट देण्याची सोय

★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

# दि इसलामपूर को-ऑ. पीपल्स बँक लि.

स्थापना १९१६] [रजिष्टर नं. ५४८४

मुख्य कचेरी – उरुण इसलामपूर, जि. द. सातारा.

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल शेअर | रु. ५०,००० |
| वसूल मांडवल | रु. ३६,८५० |
| रिझर्व्ह फंड | रु. २५,४६२ |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एम. डी. पवार, (चेअरमन)
श्री. ए. बी. रोटे, (व्हा. चेअरमन)
श्री. के. एम. पोटे, (समासद)
श्री. एफ. एस. वाकळे "
श्री. एस. ए. वाकळे, "
श्री. एस. बी फले "
श्री. एस. ए. इबुशे "

बँकिंगचे सर्व व्यवहार किफायतशीरपणें केले जातात.
विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

ही दीपावलि आमचे भागीदारांस व ग्राहकांस सुखावह जावो.

डी. डी. लाटकर,
मॅनेजर.

# पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन

## सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें

स्थापना १९१२] ७१ बुधवार पेठ, पुणें १. [टेलि. नं. ७१५६

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. २,००,००० |
| वसूल मांडवल | रु. १,९०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७७,२५८ |
| खेळतें मांडवल | रु. १५,७०,००० |

मा. सल्लागार मंडळ: (१) मा. रि. द. नवले, अध्यक्ष, (२) मा. रा. ता. कांबळे, उपाध्यक्ष, (३) मा. सि. घों आवनावे, (४) मा. रे. रा. कोतवाल, एल. एस. जी. डी. (५) मा बा. द. शिंदे,

मा. कार्यकारी मंडळ : (१) मा. भि. वि. पाटील, एल. एस. जी. डी., कार्याध्यक्ष, (२) मा. म. चिं. तिखे, उपकार्याध्यक्ष (३) मा. कृ. द. घारमळकर, (४) मा. ना. घों. भोकरे (५) मा दि. वि. दामले, एल. एस. जी. डी. (६) मा. पु. शं देशपांडे, (७) मा. दि. घों. कुऱ्हाडे, भारतीय हिंदी पारंगत (आगरा), (८) मा. द. ना, कुंभार (९) कु गा. कुंभार, (१०) मा. स. ग. मिसाळ, (११) मा. पुं. ना स्वार.

या बँकेंत समासद काटकसर फंडाची एकूण रकम रु. ९,४७.००० पर्यंत जमा असून हें प्रमाण खेळत्या भांडवलाबरोबर ६० टक्के असें पडतें. हें सर्व भांडवल सभासदांचेंच आहे हें या बँकेचें वैशिष्टय आहे.

बँकेंत सभासद व बिगर सभासद यांच्या सेव्हिंग्ज, चालू, हप्तेबंद ठेवी व मुदत ठेवी स्वीकारल्या जातात.

इतर बँकिंगचे व्यवहार केले जातात.

नारायण कृष्ण कुलकर्णी, मॅनेजर.

महाराष्ट्रांतील नागरी सहकारी चळवळीमध्यें कित्येक वर्षे लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली आदर्श नागरी सहकारी संस्था.

# दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

पंढरपूर (जि. सोलापूर)

| | | |
|---|---|---|
| १ शेअर भांडवल | रु. | ७१,७१० |
| २ रिझर्व्ह फंड | रु. | ७७,५६० |
| ३ इतर फंड्स | रु. | ७१,१३४ |
| ४ ठेवी | रु. | १५,५०,८३७ |
| ५ सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम | रु. | ४,९३,१११ |
| ६ खेळतें भांडवल | रु. | १८,१९,०५२ |

या बँकेंत मुदतीच्या ठेवी, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी–विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

तसेंच समासदांमध्यें बचतयोजनेचा प्रचार करणेचे दृष्टीनें या बँकेंत "समासद प्रॉव्हिडंट फंड" पद्धति सुरू केली असून, समासदांचे आजारीपणांत उपयुक्त अशीं उपकरणें पुरविणेकरितां "रुग्णसाहाय्यक शाखा" उघडली आहे.

दागदागिने, मौल्यवान् वस्तु व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी "सेफ डिपॉझिट लॉकर्सची" व्यवस्था या बँकेंत आहे.

तरी गरजूंनीं अवश्य फायदा घ्यावा.
जास्त माहितीसाठी ऑफिसकडे लिहा.

पं. रा. कुलकर्णी, जी. डी. सी. अँण्ड ए., मॅनेजर.
औ. ह. कवठेकर, चेअरमन.

भर उद्योगधंद्यावर देण्यांत आलेला आहे. त्यामुळें कार्यक्रमांत होणाऱ्या निर्योजित खर्चाचें प्रतिबिंब भावी काळांत बँकिंगच्या व्यवहारांत दिसून येईल असें धरून चालण्यास हरकत नाहीं. बँकांजवळील ठेवी वाढण्याची गति अधिक समाधानकारक राहील असें समजण्यास हरकत नाहीं. पण, बँकांजवळील ठेवींत अशी वाढ झाली तरी त्यांच्याकडून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला पुरेशी मदत होण्याचा संभव नाहीं. कारण, दुसऱ्या कार्यक्रमासाठीं लागणारा पैसा फार मोठ्या प्रमाणावर लागणारा आहे. सरकारी मालकीच्या ज्या औद्योगिक योजना आहेत, त्यांना लागणाऱ्या पैशांपैकी २५ टक्के पैसा ह्या तुटीच्या अर्थसंकल्पाच्या साह्याने उभा करण्याचा नियोजन मंडळाचा मूळचा हेतु होता.

जरूर तो पैसा उभारण्याचे दुसरे दोन मार्ग म्हणजे कर आणि कर्जे. करांचे दर वाढविण्यास आतां मर्यादित प्रमाणांतच वाव आहे ही गोष्ट सांगण्याचें कारण नाहीं. शिवाय आर्थिक विकासाच्या योजना ह्या कर्जे उभारून अंमलांत आणणेंच योग्य असतें. ह्याच अनुसंधानांत बँकिंगसाठी एकादी योजना तयार करण्याची उपयुक्तता लक्षांत येण्यासारखी आहे. बँकिंगसाठी करावयाची योजना अशी असावी की तीमुळें (१) पंचवार्षिक कार्यक्रमांतील गरजा भागविण्यासाठी सरकारला नवीं कर्जें उभारतां येणें शक्य व्हावें. ह्या गरजांसाठी पुन्हा पुन्हा करांची अगर तुटीच्या अर्थसंकल्पाची कास धरणें सरकारला आवश्यक वाटूं नये. (२) खाजगी शिलकीच्या विभागाला अधिक भांडवल उभारणें व दीर्घ, मध्यम अगर अल्प मुदतीचीं कर्जें मिळविणें शक्य व्हावें आणि (३) समाजाची अधिक चांगली सेवा करून बँकिंगच्या व्यवसायाला आपली प्रतिष्ठा वाढवितां आली पाहिजे. अशी प्रतिष्ठा वाढली तर बँकिंगचें साह्य घेण्याची प्रवृत्ति वाढेल आणि त्याचबरोबर बँकांनीं दिलेला सल्ला राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला वळण लावतांना योग्य रीतीनें मानला जाईल. ह्या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत असें देतां येईल कीं, बँकिंगच्या व्यवसायाला अधिक मजबुती, आणणें, त्याची पुनर्घटना करणें व वाढ करणें ह्यादृष्टीनें बँकिंगची योजना आंखण्यांत आली पाहिजे. मजबुती वाढविणाऱ्या व पुनर्घटना करणाऱ्या उपायांमुळें विश्वास वाढतो आणि विश्वास वाढल्यामुळें वाढीचा मार्ग खुला होतो. वाढीमुळें ठेवींत वाढ होते. ठेवी वाढल्यामुळें सरकारी कर्जें अधिक मोठ्या प्रमाणावर घेणें बँकांना शक्य होतें.

ज्या बँका किमान दर्जाच्या खालीं असतील त्यांच्या पुनर्घटनेसाठी एका रिहॅबिलिटेशन फायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत यावी. तथापि, पुनर्घटना करतांना आर्थिक जीवनाची घडी विस्कटूं नये म्हणून काळजी घेण्यांत आली पाहिजे. ज्या बँकांचा कारभार गुंडाळण्यांत येत आहे त्या बँका सोडून, किमान दर्जाच्या खालीं असणाऱ्या बँकांची पुनर्घटना हातीं घेण्यांत यावी. असें करतांना कर्जाऊ रकमा घेणाऱ्यांकडे विधायक दृष्टिकोनांतून पहाण्यांत आलें पाहिजे आणि त्याचबरोबर ठेवीदारांच्या संरक्षणाचाहि विचार करण्यांत आला पाहिजे. रिहॅबिलिटेशन फायनॅन्स कॉर्पोरेशनची मालकी रिझर्व्ह बँकेकडे अगर सरकारकडे असावी. कॉर्पोरेशननें (१) ज्या बँकांचा कारभार गुंडाळला जात आहे त्यांच्या मालमत्तेची लवकर तपासणी करावी. रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेऊन व वाजवी किंमत देऊन ती आपल्या ताब्यांत घ्यावी आणि कारभार गुंडाळल्या जाणाऱ्या बँकांच्या ठेवीदारांत वाटण्यासाठी मालमत्तेची किंमत लिक्विडेटरच्या स्वाधीन करावी. हें सर्व काम सुमारें १८ महिन्यांच्या अवधींत करणें शक्य होईल. (२) ज्या बँकांच्या ठेवींना धक्का लागलेला नाहीं त्या बँकांना भांडवलाचा पुरवठा करावा. (३) ज्या बँकांच्या ठेवींना धक्का पोचलेला असेल त्यांना मोठ्या बँकांत समाविष्ट करण्यांत यावें अगर मोठ्या बँकांच्या उपसंस्था बनविण्यांत यावें. असें करतांना त्यांच्या जवळील ठेवींबद्दलची जोखीम प्रमाणशः कमी करण्यांत यावी. (४) बँकांच्या कार्यक्षेत्राच्या व्यापाचा विचार करून त्यांच्या मूलभूत घटकांचा आकार ठरविण्यांत यावा. (५) ज्या बँकांचा कारभार गुंडाळला जात आहे त्यांच्या सर्व अगर कांहीं मालमत्तेची व्यवस्था कॉर्पोरेशनच्या वतीनें पहाण्याचें काम परवाना मिळालेल्या बँकांकडे देण्याची तरतूद करण्यांत यावी. (६) कॉर्पोरेशनच्या नांवावर असलेले कच्च्या बँकांचे शेअर्स परवाना मिळालेल्या बँकांना प्रथम देण्यांत यावेत म्हणजे ज्या कच्च्या बँकांचे शेअर्स कॉर्पोरेशननें घेतले असतील त्या कोणत्या तरी मुख्य बँकेच्या उपसंस्था म्हणून राहतील. कच्च्या बँका स्वतंत्रपणें व्यवहार करण्याच्या परिस्थितींत आल्या म्हणजे परवानेदार बँकांनीं हे शेअर्स पुन्हा लोकांना विकावे. (७) किमान दर्जाच्या खालीं असणाऱ्या बँकांतील नोकरवर्गाला योग्य तें शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

किमान दर्जाच्याहि खालीं असणाऱ्या बँकांच्या अस्तित्वामुळें बँकिंगच्या व्यवसायांत जो कच्चेपणा आलेला आहे तो नाहींसा करण्यासाठी योग्य वेळीं उपाययोजना करण्यांत आली पाहिजे. दरसाल बँकांच्या १,००० नव्या शाखा उघडण्याचा पंचवार्षिक कार्यक्रम तयार करण्यांत आला पाहिजे. बँकांना अशा प्रकारचें खर्चिक धाडस करतां येणार नाहीं अशी प्रतिक्रिया पहिल्याप्रथम होणें साहजिकच आहे. कारण नवीन शाखा चालविण्यांत नुकसान होतें व बँकांना तें परवडत नाहीं. इंपीरिअल बँक खाजगी भागीदारांची होती तेव्हां ४०० शाखा काढण्याची आर्थिक जबाबदारी अंगावर घेणें तिला शक्यच नव्हतें. इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण करण्याच्या मागें हें एक प्रमुख कारण होतें. तथापि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें बँकांच्या शाखांच्या विस्ताराचा असा कार्यक्रम हातीं घेणें इष्ट आहे. इतकेंच नव्हे, तर बँकिंगच्या व्यवसायापुरतेंच पाहिलें तरीसुद्धां असा कार्यक्रम इष्टच आहे. बँकांच्या शाखांचा विस्तार झाला म्हणजे ग्रामीण भागांतील नाणेबाजार आणि नागरी भागांतील ह्यांच्यामधील अंतर भरून निघेल. पैशाचा प्रवाह एका बाजारांतून दुसऱ्या बाजारांत जाणें सुलभ होईल व आतांपर्यंत ज्या पैशाचा बँकिंगच्या व्यवसायाला कांहीं उपयोग होत नव्हता त्याचा उपयोग करण्याची संधि हळूहळू मिळूं लागेल. असें होणें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें जरूर आहे. कारण त्यामुळें उगीच पडून राहिलेला पैसा कारणी लागेल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ मांकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

# दि इस्लामपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

इस्लामपूर ( जि. द. सातारा )

( स्थापना १९३५ )

## बँकेस "अ" वर्ग मिळाला आहे

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. २६,८७५ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १२,९४८ |
| खेळतें भांडवल | रु. २,६२,९६८ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

कृ. द. बोरकर
सेक्रेटरी.

गो. ल. फडणीस
बा. ए., एलएल. बी.,
चेअरमन.

# दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लिमिटेड

## सातारा.

स्थापना : १९०७ ] [ हेड ऑफिस : सातारा

सुवर्णमहोत्सव साजरा केलेली महाराष्ट्रांतील पहिली बँक

भांडवल

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २,४०,८८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. २,९४,००० |
| ठेवी | रु. ४५,००,००० |

शाखा :—कराड, ओगलेवाडी, कोरेगांव, मसूर व करमाळा.

अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

द. कृ. साठे,
बी. ए. ( ऑ. ), एलएल. बी.,
चेअरमन.

म. ह. जोगळेकर,
बी. ए., बी. कॉम्.
मॅनेजर.

आमचे भागदार, ठेवीदार आणि हितचिंतक यांना ही दिवाळी सुखाची जावो !

# दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

जमखंडी, [ शाखा : बनहट्टी ]

( स्थापना सन १९४० )

भाग भांडवल व कायम निधि एकूण पांच लाखावर !

—: दि. ३०–६–५९ इ. चे आंकडे :—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २,०७,१८० |
| गंगाजळी व इतर कायम निधि | रु. २,९६,०५४ |
| ठेवी | रु. २३,६२,००८ |
| खेळतें भांडवल | रु. २९,९१,२२७ |

ऑडिट वर्ग : "अ"

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

साडेपांच टक्के दरांच्या कॅश सर्टिफिकेटांची विशेष सवलत.

सेफ डिपॉझिट–लाकर्सचे माफक भाड्याचे दर.

एस. एम. अथणी
चेअरमन.

म. द. खाडिलकर
मॅनेजर.

रजिस्टर नंबर ७१९८ स्थापना १९३५

# सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँडमार्गेज बँक लि.

: शाखा :

सांगली, फलटण, इस्लामपूर, तासगांव

## शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळें होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमनिखरेदी करणेची अमूल्य संधि !

हेड ऑफिस, कराड. ब्रँच ऑफिस, सांगली.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. १,८०,००० |
| खेळतें भांडवल | रु. ३०,००,००० |
| वांटलेलें कर्ज | रु. ३६,००,००० |

सुरुवातीपासून बँकेचा ऑडिट वर्ग "अ"

व्याजाचे दर :—

| | |
|---|---|
| विहीर व विहीर दुरुस्ती | ४½% |
| शेती व यंत्रसामुग्रीकरितां | ५½% |
| जमीन–खरेदी व जुनें कर्ज भागविणें | ७½% |

म. सि. पुटाणी
मॅनेजर.

नीलकंठ आणाप्पा कल्याणी
चेअरमन.

# साखरेच्या धंद्यांतील अडचणींचें स्वरूप

## परदेशीय चलन मिळणाऱ्या पदार्थांत साखरेचें पदार्पण

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस २५ लाख टन साखरेचें उत्पादन करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. कार्यक्रमाच्या पहिल्याच वर्षांत साखरेचें उत्पादन २० लाख टन झालें. १९५१-५२ सालीं साखरेचें उत्पादन १४·८ लाख टनच झालें होतें. त्यानंतर १९५३-५४ सालीं उत्पादनाची पातळी आणखी खालीं आली व उत्पादन अवघें १० लाख टन झालें. म्हणजे १९५१ सालापासून साखरेचे उत्पादन घटत चाललें होतें. तथापि १९५४-५५ सालीं उत्पादन १५·८ लाख टन व १९५५-५६ सालीं १८·६ लाख टन झालें. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वीपणें पार पाडण्यांत आल्यामुळें साखरेच्या धंद्याला दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं अनुकूल परिस्थिति लाभली. त्याशिवाय साखरेच्या धंद्याला आणखी दोन अनुकूल घटनांचा लाभ मिळाला. उसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत वाढ झाल्यामुळें साखरेच्या कारखान्यांना अधिक प्रमाणांत उसाचा पुरवठा होऊं लागला. त्याचप्रमाणें साखरेला मागणीहि अधिक येऊं लागली. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस लोकांची खरेदीची शक्ति वाढल्याचा हा परिणाम होता. १९५१-५६ सालीं उसाच्या लागवडीखालील जमीन ४५·६ लाख एकर होती, ती १९५६-५७ सालीं ५० लाख एकरांपर्यंत वाढली. त्याचप्रमाणें उसाच्या उत्पादनांतहि वाढ झाली. १९५५-५६ सालीं ५·९३ कोटी टन उसाची निर्मिति करण्यांत आली होती. १९५६-५७ सालीं ६·६९ कोटी टन उसाची निर्मिति करण्यांत आली.

साखरेच्या उत्पादनांत उच्चांक प्रस्थापित करण्यांत आला असला तरी भारत जवळच्या देशांना साखर निर्यात करूं लागला हीच गोष्ट अधिक महत्त्वाची मानली पाहिजे. अर्थात् साखरेचें उत्पादन देशांतील गरजेपेक्षा अधिक झाल्यामुळेंच निर्यात शक्य झाली हें उघड आहे. तसें नसतें तर निर्यात करणें अव्यवहार्य झालें असतें. सुमारें १·५ लाख टन साखर निर्यात करण्यांत आली आणि तिची किंमत म्हणून भारताला १२ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळालें. चहा, तंबाखू, ताग, इत्यादि वस्तू निर्यात करून भारताला परदेशीय चलन मिळतें त्याचप्रमाणें साखरेच्या निर्यातीनेंहि मिळूं लागलें. १९५६-५७ सालच्या हंगामांत साखर निर्यात करण्यांत यश आलें. ही साखरेची निर्यात ज्या देशांतर्गत परिस्थितींत करण्यांत आली आणि ज्या अटीवर ती करण्यांत आली त्यामुळें साखरेच्या निर्यातीला अधिकच महत्त्व प्राप्त झालें. जगांतील बाजारपेठांत साखरेच्या किंमती वाढत होत्या. भारताच्या साखरेची उत्पादनाची किंमत आधींच जास्त होती. तरीसुद्धा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत भारताच्या साखरेच्या किंमतीची पातळी इतर देशांतील साखरेच्या बरोबरीनें करण्यांत आली. सुएझच्या कालव्याबाबत पेचप्रसंग उत्पन्न झाला आणि युरोपमध्यें बीटपासून तयार करण्यांत येणाऱ्या साखरेच्या उत्पादनांत घट झाली. त्यामुळेंहि भारताच्या साखरेला अनुकूल वातावरणाचा लाभ झाला.

तथापि, कायम टिकणारी भरभराट साखरेच्या धंद्याच्या आटोक्यांत कधींच आलेली नाहीं. अशा भरभराटीचा शोध मृगजळाप्रमाणें ठरला. कारण, बीटपासून करण्यांत येणाऱ्या साखरेचें उत्पादन पुन्हां पूर्वींसारखें होऊं लागलें. त्याचप्रमाणें नेहमींपेक्षा वेगळी असणारी इतर परिस्थितीहि हळूहळू मूळपदावर येऊं लागली. त्यामुळें जागतिक बाजारपेठांत साखरेच्या किंमतीची पातळी परत नेहमीसारखी होऊं लागली. अर्थातच भारतामधील साखर निर्यात करून नफा मिळविण्याची शक्यता कमी कमी होऊं लागली. भारताच्या साखरेची जागतिक बाजारपेठेंतून हकालपट्टी होऊं न देण्यासाठी साखरेची निर्यात तोटा सोसून करणें एवढाच एक मार्ग होता. असें केल्याशिवाय इतर देशांतील साखरेच्या किंमतीशीं भारताच्या साखरेला स्पर्धा करणें अशक्यच होतें. भारत सरकारला परदेशीय चलनाची अतिशय गरज असल्यानें तोटा सोसूनहि साखर निर्यात करण्याचें ठरविण्यांत आलें. आंतरराष्ट्रीय पेठांतील किंमती आणि भारताची किंमत ह्यांच्यांतील फरक लक्षांत घेतां निर्यात केलेल्या दर मण साखरेमागें ५० नये पैसे तोटा सोसावा लागतो. निर्यातीमुळें होणारा तोटा वास्तविक देशांतील ग्राहकांनीं सोसावयास पाहिजे. पण, सरकारनें देशांतील साखर-कारखानदारांशीं करार करून हा तोटा त्यांच्याच माथीं मारला. हें साध्य करण्यासाठी, साखर निर्यात करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत जी किंमत होती तीच कायम ठेवण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यांत आला. उत्तर प्रदेश आणि उत्तर बिहार ह्यांतील कारखान्यांकरिता साखरेची कारखान्याच्या जागेवरील किंमत दर मणाला ३६ रु. ठरविण्यांत आली आणि पंजाबमधील कारखान्याच्या साखरेची कारखान्यावरील किंमत दरमणाला ३६½ रु ठरविण्यांत आली. त्यानंतर ३१ ऑक्टोबर १९५९ अखेर पर्यंतच्या काळांत १ लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय घेण्यांत आला. (पण अलीकडे देशांतील साखरेचा तुटवडा व चढ्या किंमती ह्यांचा विचार करून निर्यात रद्द करण्यांत आली आहे.) १९५७-५८ सालीं ज्या परिस्थितींत व ज्या अटीवर साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्यांत आली व प्रत्यक्ष निर्यात करण्यांत आली त्यांचा विचार करता साखरेच्या निर्यातीच्या बाबतींत निश्चित व पक्कें धोरण आंखण्याची जरुरी अधिकच वाटूं लागली आहे. गेल्या दोन हंगामांत साखरेच्या निर्यातीचा जो अनुभव आला त्यावरून एक गोष्ट उघड झाली आहे. मध्यपूर्वेतील देश आणि आग्नेय आशिआंतील देश ह्यांना साखर निर्यात करण्याच्या कामीं भारताची परिस्थिति फारच अनुकूल आहे. ह्या शेजाऱ्यांना भारत साखरेची निर्यात सुलभतेनें करूं शकेल. परदेशीय चलनाची परिस्थिति अवघड असल्यामुळें साखरेच्या निर्यातीचा प्रश्न तांतडीचा व कांहींसा जरुरीचा झाला आहे. देशांतील कारखानदारांना तोटा सहन करावा लागला तरीहि निर्यात करणें आवश्यक झालें आहे. निर्यात मालाच्या प्रकारांत विविधता आणण्याचें सरकारचें धोरण आहे. साखरेच्या धंद्यानें देशाला अगदीं जरूर त्या वेळीं परदेशीय चलन मिळवून दिलें आहे आणि साखरेच्या निर्यातीला किती वाव आहे तें दाखवून दिलें आहे. साखरेच्या निर्यातीबद्दलची भारताची अनुकूल परिस्थिति लक्षांत घेतां ह्या बाबतींत साखरेला योग्य तें स्थान देण्यांत येणें योग्यच ठरेल.

पण, शेजारच्या देशांतील बाजारपेठांचा फायदा जर भारताला घ्यावयाचा असेल तर भारताच्या साखरेची स्पर्धा करण्याची शक्ति वाढविण्याचे उपाय योजणें अगत्याचें आहे. ज्या परदेशीय बाजारपेठा आधीच काबीज करण्यांत आल्या आहेत, त्या टिकविण्यासाठीं मदत व संरक्षण दिलें जाईल ह्या आशेवरच देशांतील कारखान्यांनीं निर्यातीमुळें होणारा तोटा सोसण्याचें कबूल केलें होतें. मागील हंगामांत जो नफा झाला आहे त्याच्या साह्यानें थोडाबहुत तोटा भरून निघण्यासारखा आहे.

भारतामधील साखरेची किंमत जास्त असण्याचीं कारणें अशीं आहेत. दरएकरीं उत्पादन होणाऱ्या उसाचें प्रमाण कमी असल्यामुळें आणि उसाचा दर्जाहि कमी प्रतीचा असल्यामुळें साखरेच्या उत्पादनाची किंमतहि चढी राहते. भारतांतील दर एकरीं उसाचें उत्पादन आणि उसापासून होणारा साखरेचा उतारा ह्या दोन्हींचें प्रमाण साखर उत्पादन करणाऱ्या इतर देशांतील प्रमाणापेक्षा तुलनेनें फारच कमी आहे.

| देश | दर एकरी ऊस उत्पादन (टन) | साखरेच्या उताऱ्याची टक्केवारी | दर एकरीं उत्पन्न होणारी साखर |
|---|---|---|---|
| क्यूबा | १७.१२ | १२.२५ | २.०९५ |
| पोर्टोरिको | २४.१६ | १२.२३ | २.९५६ |
| हवाई | ६२.०५ | १०.४६ | ६.४८९ |
| इजिप्त | ३०.४० | ९.९७ | ३.०३२ |
| पेरू | ४१.१४ | १२.३३ | ५.९७६ |
| मॉरिशस | १९.६३ | १२.०३ | २.३७० |
| जाव्हा | ५६.२० | ११.१९ | ६.४४० |
| भारत | १४.७० | ९.५० | १.३९४ |

उसाच्या उत्पादनाच्या बाबतींत इतर देशांची कार्यक्षमता गांठण्याच्या कामीं भारताला अजून बरीच वाटचाल करावयाची आहे, हें वरील कोष्टकावरून दिसून येईल. तथापि केवळ उत्पादनाच्या खर्चाच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पाहणें वस्तुस्थितीस सोडून होईल. भारताच्या साखरेच्या किंमतींत सरकारच्या कराचा फार मोठा भाग आहे. साखरेवरील सरकारी कराचें प्रमाण मोठें आहे. राज्य-सरकारें व मध्यवर्ती सरकार ह्यांनीं बसविलेल्या करांमुळें साखरेच्या किंमतीचा ३८ टक्के भाग व्यापतो. मध्यवर्ती सरकारचा अबकारी कर दर मणामागें सुमारें रु. १० - ७५ नये पैसे इतका घेण्यांत येतो. राज्य-सरकारांनाहि साखर ही एक उत्पन्नाची बाब वाटत आहे. त्यांनीं उसावर ३ नये पैसे ते १९ नये पैसेपर्यंत निरनिराळ्या दरानें सेसची आकारणी केलेली आहे. साखरेच्या उत्पादनाचा खर्च थोड्याशा काळांत फारशी बदलणारी बाब नसल्यानें निर्यातीला उत्तेजन देण्यासाठीं सरकारच्या करांत कपात करणें एवढाच मुख्य मार्ग राहतो. साखरेच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत निर्यातीसाठी सरकारी मदत देणें ही गोष्ट कांहीं नवी नाहीं. ही पद्धत रद्द करण्यांत आली तर साखरेचा आंतरराष्ट्रीय व्यापार बराचसा कमी होईल. साखर निर्यात करणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या देशांतून किरकोळ विक्रीच्या किंमती काय आहेत त्याचें कोष्टक पुढें दिलें आहे. त्यावरून सरकारच्या मदतीची कल्पना येण्यासारखी आहे.

| देश | पौंडाची किरकोळ किंमत अमेरिकन सेंटसमध्यें |
|---|---|
| ऑस्ट्रेलिआ | १०.२ |
| फॉर्मोसा | १२.६ |
| क्यूबा | ८.९ |
| फिलिपाइन्स | १०.० |
| भारत | ९.५ |

फोन क्र. १०३ बेलापूर रोड. तार. छत्रपती, राहुरी.

# दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.

**श्रीशिवाजीनगर**

**ता. राहुरी, जिल्हा अहमदनगर.**

नगर जिल्ह्यांत साखर कारखान्यांत अभिमानानें प्रगतिपथावर मार्गक्रमण करीत असलेला राहुरी सहकारी साखर कारखाना लि. श्रीशिवाजीनगर, साखर धंद्यांत मानाचें स्थान प्राप्त करीत आहे.

स्थापना—१९५४

सभासद संख्या

व्यक्तीगत ११९१ सहकारी संस्था १७

उसाचें क्षेत्र, ४,००० एकर

कारखान्याचें भांडवल

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें | रु. | ४६,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | २३,११,२०१ |

कारखान्याचे दोन हंगाम यशस्वी रीतीनें पार पडले असून कारखान्याची साखर बाजारांत सर्वत्र लोकप्रिय झाली आहे

| एकूण गळीत | हंगाम | एकूण साखर उत्पादन |
|---|---|---|
| १,१५,५९४.३० | १९५७-५८ | १,१७,०२९ पोतीं |
| १,२३,१५८.१३ | १९५८-५९ | १,४६,३५८ ,, |

**कारखान्याचा तृतीय हंगाम २५-१०-५९ पासून सुरू झाला आहे.**

—: कारखान्याचें सन्माननीय संचालक-मंडळ :—

(१) श्री. बा. बा. तनपुरे, चेअरमन
(२) ,, ल. का. भुजाडी,
(३) ,, ल. ब. पाटील,
(४) ,, मु. पा. इनामदार,
(५) ,, दे. भ. कर्पे,
(६) ,, पं. गं. निमसे,
(७) ,, शि. पा. राजुळे
(८) ,, वा. रा. पाटील,
(९) ,, श्री. म. पाटील,
(१०) ,, ज्यो. म. गागरे,
(११) ,, अ. शं. धावडे,
(१२) ,, पी. डी. कसबेकर, जॉइंट रजिस्ट्रार, को. सोसायटीज्, पुणें, मुंबई राज्य सरकारचे प्रतिनिधि.
(१३) मा. एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, नगर विभाग, मुंबई राज्य सरकारचे प्रतिनिधि.
(१४) मा. स्पेशल डेप्युटी रजिस्ट्रार, को. ऑ. शुगर फॅक्टरीज्, नगर, रजिस्ट्रारचे प्रतिनिधि.
(१५) ,, व्ही. पी. वर्दे, मुंबई. मुंबई राज्य सहकारी बँकेचे प्रतिनिधि.
(१६) ,, व्ही. डी. मुजुमदार, मुंबई इंडस्ट्रियल फॉयनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचे प्रतिनिधि
(१७) ,, प्रा. ध. रा. गाडगीळ, पुणें, अर्थतज्ज्ञ
(१८) ,, के. वि. कालेवार, मॅनेजिंग डायरेक्टर.

साखरेच्या धंद्याबाबतच्या अडचणी फक्त निर्यात व्यापारापुरत्याच मर्यादित आहेत असें मात्र नाहीं. १९५७–५८ सालच्या हंगामांत भारतामधील साखरेचें उत्पादन वाढलें तर नाहींच; पण उलट तें घटलें. ह्या हंगामांत १९ लाख टनांपेक्षाहि कमी उत्पादन झालें असावें. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या मानानें दुसऱ्या वर्षांत साखरेचें उत्पादन घटलें. तसाच कांहींसा प्रकार दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतहि झाला आहे. केवळ उत्पादन घटलें म्हणून चिंता करण्याचें कारण आहे असें नाहीं. गतकाळांतील अनुभवावरून असें दिसतें कीं, मोठ्यांत मोठा धक्का बसला तरीहि साखरेचें उत्पादन पुन्हा झपाट्यानें वाढतें. पण, ज्या कारणांमुळें उत्पादनांत घट झाली तीं अशा स्वरूपाचीं आहे कीं दुसऱ्या कार्यक्रमाच्या उरलेल्या कालांत साखर धंद्याच्या प्रगतिविषयींच शंका व प्रश्न उत्पन्न व्हावेत.

मोठ्या कारखान्यांच्या शेजारच्या भागांतच खंडसारी साखर तयार करणारे अनेक कारखाने निघाले. त्यामुळें जो ऊंस सामान्यतः मोठ्या कारखान्यांकडे गाळण्यासाठी गेला असता तो खंडसारी कारखान्यांकडे वळविला गेला. खंडसारी साखरेचें उत्पादन १ लाख टनाच्यावर सामान्यतः जात नसे. खंडसारी साखरेचे कारखाने वाढल्यामुळें ते ३ लाख टनापर्यंत होऊं लागलें. मोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या साखरेला खंडसारी साखरेची स्पर्धा पूर्वी फारशी जाचत नसे. पण खंडसारी साखर व मोठ्या कारखान्यांची साखर ह्यांच्यावरील कराच्या आकारणींत फरक असल्यामुळें खंडसारी साखर कारखान्यांना मोठ्या साखर कारखान्यांशीं स्पर्धा करून आपला विस्तार करून घेण्यास एकप्रकारची संधि व उत्तेजन मिळाल्यासारखें झालें. कारखान्यांच्या साखरेवर बसविण्यांत आलेले कांहीं कर खंडसारीवर नसल्यामुळें खंडसारी साखर स्वस्त देण्याला परवडते. मजूरविषयक कायदे खंडसारी कारखान्यांना लागू नाहींत. उसाला किमान किंमत देण्याचें कायदेशीर बंधनहि त्यांना नाहीं. ह्या गोष्टींचाहि फायदा त्यांना मिळतो. तथापि मोठ्या कारखान्यांच्या आसपास १० मैलांच्या परिसरांत खंडसारी साखरेचे कारखाने काढावयाचे नाहींत अशी बंदी सरकारनें नंतर घातली. त्यामुळें खंडसारी साखरेची स्पर्धा बऱ्याच अंशीं कमी होईल असा अंदाज आहे. उसाच्या उत्पादनांत जी घट होत चालली आहे ती मात्र अधिक चिंताजनक आहे. दर एकरीं होणाऱ्या उसाच्या उत्पादनांतच घट होत आहे. १९५६–५७ सालीं उसाचें उत्पादन ६.६९ कोटी टन झालें होतें. परंतु १९५७–५८ सालीं उत्पादनांत ४.५ टक्क्यांनीं घट झाली व तें ६.३९ कोटी टनापर्यंत खाली आलें. १९५६–५७ सालीं दर एकरीं १३.३ टन उत्पादन झालें होतें, तें १९५७–५८ सालीं १२.८ टन झालें. उसाचें दर एकरीं उत्पादन वाढविण्यासाठी विकासाच्या योजना आंखण्यांत आल्या होत्या. तरी सुद्धां उसाच्या दर एकरीं पिकांत झालेली घट गोंधळ उत्पन्न करणारी आहे. उत्तर प्रदेश व बिहार राज्यांत उसाच्या पिकावर प्रतिकूल हवामानाचा परिणाम झाला असें म्हणतात; व तें खरेंहि असेल. पण उसाच्या लागवडीचा विकास करण्याच्या कामीं जोराचे प्रयत्न झाले नसण्याचीहि शक्यता आहे पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आणि दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षांत साखरेचें उत्पादन वाढत गेलेलें दिसतें. पण उसाचें दर एकरीं उत्पादन मात्र १३ टनांवरच थांबलें आहे, ही गोष्ट चमत्कारिक वाटते. तेव्हां दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दर एकरीं १८ टन ऊंस-उत्पादन करण्याचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे तें वाढावयाचें असल्यास खूप जोराचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या उरलेल्या अवधींत उसाच्या दर एकरीं उत्पादनांतील तफावत जर भरून काढावयाची असेल तर पाणीपुरवठ्याच्या अधिक सोयी करण्यांत आल्या पाहिजेत आणि खताचा पुरवठाहि वाढविण्यांत आला पाहिजे. पुरेसा पाऊस पडला नाहीं तर उसाला पाणीपुरवठा होण्यासाठी कालव्यांकडे धाव घ्यावी लागते. उत्तर प्रदेश व बिहार हीं राज्यें साखरेच्या उत्पादनाच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. ह्या राज्यांतून उसाच्या पिकाला हुकमी पाणीपुरवठा मिळण्याला अर्थातच फार महत्त्व आहे. त्याचप्रमाणें नत्रयुक्त खतांचा उसाचें उत्पादन वाढविण्यास फार उपयोग होतो हें तज्ज्ञांनींच मान्य केलेलें आहे.

साखरेच्या धंद्याची वाढ होण्यास भारतामधील दरमाणशीं साखरेच्या कमी खपाचीहि मर्यादा पडते. जगांतील बहुतेक देशांपेक्षा भारतामधील दरमाणशीं साखरेच्या खपाचें प्रमाण कमी आहे. साखर उत्पन्न करणारा एक मोठा देश म्हणून ही परिस्थिति फारशी चांगली नाहीं. दरमाणशी किमान ४५ पौंड साखर लागते असा अंदाज आहे. पण भारतांत हा खप सुमारें १० पौंडांच्याहि खालीं आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतींत झालेली प्रगति व नागरी लोकसंख्या ह्यांच्या अनुरोधानें निरनिराळ्या राज्यांत दरडोई खपणाऱ्या साखरेचें प्रमाण वेगवेगळें आहे.

| राज्य | पौंड |
|---|---|
| प. बंगाल | १२.८ |
| बिहार | ४.४ |
| उत्तर प्रदेश | १६.९ |
| मुंबई | १७.२ |
| मद्रास | ५.१ |
| पंजाब | १७.७ |
| दिल्ली | २५.५ |
| आसाम | ३.५ |
| ओरिसा | २.० |
| म्हैसूर | ७.७ |
| राजस्थान | ६.० |

आसाम, बिहार व ओरिसांत दरडोई खप फार कमी आहे. कारण, तेथील लोक औद्योगिकदृष्ट्या मागासलेले आहेत. साखरेची किंमत कमी केल्यानें खपांत बरीच वाढ होईल कीं नाहीं हें सांगतां येण्यासारखें नाहीं. कारण, साखर ही खाद्यपेयाच्या इतर पदार्थांबरोबरच पुष्कळदा घेतली जाते; नुसती साखर फारशी वापरली जात नाहीं.


## दि बेळगांव मुस्लिम को-ऑप. क्रे. बँक लि., बेळगांव

सध्यांच्या सरकारनियुक्त बोर्डाच्या व्यवस्थेखालीं बँकेची परिस्थिति सुधारली आहे आणि तिच्या पुनरुज्जीवनाचें कार्य चालूं आहे.

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ६४,१०० |
| रिझर्व्ह फंड | रु. ३१,५५१ |
| इतर फंड | रु. ११,७३० |
| ठेवी | रु. १,६६,३९८ |
| नफा | रु. ४,०८९ |

शिफारस केलेलें डिव्हिडंड–३%. थकबाकी ५०% वरून ३८% वर आणली. जुन्या गोठलेल्या कर्जाच्या वसुलीचें काम अजून चालू आहे.

बी. टी. ताविलदार, मॅनेजर. | महमदगौरी महमदगौससाहेब सौदागर, चेअरमन.

परदेशीय चलन मिळवून देणाऱ्या

# भारताच्या चहाच्या धंद्याचें भवितव्य

## स्पर्धा सोसूनहि निर्यात वाढविण्याची जरुरी

भारतामधील चहाचे मळे म्हणजे एक मोठा राष्ट्रीय ठेवा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेंत चहाच्या धंद्यानें मोठें कार्य केलेलें आहे. आपल्या आर्थिक जीवनांत ह्या धंद्याला प्रमुख स्थान असल्यानें त्याचें भवितव्यहि फार महत्त्वाचें ठरणार आहे. ह्या धंद्याला 'धंदा' हें नांव प्राप्त झालें असलें तरी मळे म्हणजे शेतीचाच व्यवसाय होय. मळ्यांची संघटना एका दृष्टीनें इतर प्रकारच्या शेतीच्या व्यवसायाला मार्गदर्शक ठरण्यासारखी आहे. चहाच्या मळ्यांवर काम करणाऱ्या कामगारांची संख्या जवळजवळ १० लाख आहे. भारतामधील कापडाचा धंदा एक मोठ्यापैकी व चांगला जम बसलेला धंदा आहे. पण, ह्या धंद्यांत गुंतलेल्या कामगारांची संख्या फक्त ७ लाखांच्या आसपास आहे. खाण धंदा, तागाचा धंदा अगर इतर कोठलाहि मोठा धंदा चहाच्या मळ्यांतील कामगारांपेक्षा अधिक कामगारांना रोजगार देत नाहीं. मळ्यासाठीं असणाऱ्या जमिनीचें क्षेत्र अंदाजें २२,२१,२५८ एकर आहे. त्यांपैकीं ७,९२,५३२ एकरांत चहाची लागवड करण्यांत येते. ह्या धंद्यामुळें सरकारच्या उत्पन्नांत मोठी भर पडते. मध्यवर्ती सरकार, राज्य सरकारें व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्या उत्पन्नापैकीं २७½ टक्के उत्पन्न त्यांना केवळ चहाच्या मळ्यांकडूनच मिळतें. शिवाय देशाला दुर्मिळ परदेशीय चलन मिळवून देण्याच्या कामींहि चहाचे मळे अधिकाधिक कार्य करीत आहेत. १९५७ सालीं भारताला जितक्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली त्यांपैकीं ३० टक्के प्राप्ति मळ्यांच्याकडून झालेली आहे. गेल्या कांहीं वर्षांत चहाच्या मळ्यापासून भारताला दरसाल सरासरी १२५ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळत आहे. तेव्हां अनेक दृष्टींनीं पाहतां चहाच्या मळ्यांना आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत महत्त्वाचें स्थान आहे, हें उघड आहे.

चहाचें उत्पादन मुख्यत: उत्तर भारतांत होतें. पण दक्षिण भारतामधील चहाचें उत्पादनहि बरेंच आहे. १९५७ सालीं भारतांत ६७·५ कोटी पौंड चहाचें उत्पादन झालें. त्यापैकीं १४·५ कोटी पौंड चहा दक्षिण भारतामधील मळ्यांतून तयार झालेला होता. उत्पादनाच्या आंकड्यांची सरासरी लक्षांत घेतली तर असें दिसून येतें कीं, भारताच्या चहाच्या उत्पादनाच्या ¼ उत्पादन दक्षिणेंत होतें. दक्षिणेकडील चहानें जगांतील बाजारपेठेंत चांगलें नांवहि मिळविलेलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत चहाच्या उत्पादनाचें लक्ष्य ७० कोटी पौंड ठरविण्यांत आलें होतें, व त्यापैकीं ४७ ते ५० कोटी पौंड चहा निर्यात करण्याचें ठरलें होतें. १९५८ सालीं भारतांत ७१·१ कोटी पौंड चहाचें उत्पादन करण्यांत आलें व त्यांपैकीं ५०·६ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला. चहाच्या उत्पादनाचें व निर्यातीचा पुढील तक्ता पहा.

उत्पादनांतील प्रगति

(आंकडे १००० पौंडाचे)

| वर्ष | उ. भारत | द. भारत | एकूण | निर्यात |
|---|---|---|---|---|
| १९५० | ५,१५,८४१ | ९७,५१३ | ६,१३,३५४ | ४,०३,२२६ |
| १९५१ | ५,१४,८३३ | १,१४,३६४ | ६,२९,१९७ | ४,५४,१०८ |
| १९५२ | ५,०३६९१ | १,१०,६७४ | ६,१४,३६५ | ४,१४,८३६ |
| १९५३ | ४,९१,६७९ | १,२२,९१९ | ६ १४,५९८ | ५,००,६५५ |
| १९५४ | ५,२३,४८१ | १,२७,९९७ | ६ ५१,४७८ | ४,४७,९६० |
| १९५५ | ५,४२,९२७ | १,३५,४४४ | ६,७८,३७१ | ३,६०,५२३ |
| १९५६ | ५,४७,६३८ | १,३२,९७२ | ६,८०,६१० | ५,२३,५५७ |
| १९५७ | ५,३०,९६९ | १,५४,१६८ | ३,८५,१३७ | ४,४२,६५१ |
| १९५८ | ५,५३,४९३ | १,५७,७३२ | ७,११,२२५ | ५,०५,९६१ |

भारताच्या चहाच्या धंद्याचा विस्तार होण्याच्या मार्गांतील कांहीं प्रमुख अडथळे पुढीलप्रमाणें आहेत. (१) उत्पादनाचा वाढता खर्च : चहाच्या मळ्यावरील कामगारविषयक कायद्यांच्या अंमलबजावणीमुळें खर्च वाढला आहे. कामगारांच्या वेतनांत झालेली वाढ. निर्यातीवरील जबर कर आणि मध्यवर्ती व राज्य-सरकारें ह्यांनी बसविलेले दोईजड कर. (२) चहा उत्पादन करणाऱ्या सर्वच देशांना मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ


पूर्व खानदेश सेंट्रल

को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जळगांव

स्थापना १९१६

मुख्य कचेरी : जळगांव, पूर्व खानदेश

शाखा : जिल्ह्यांत या बँकेच्या एकूण २९ शाखा आहेत. जिल्ह्यांतील कोणतेंहि महत्त्वाचें बाजारपेठेचें गांव शाखेविना नाहीं.

३० जून १९५९ अखेरचे आंकडे

| | | |
|---|---|---|
| १. अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| २. खपलेलें भांडवल | रु. | ३७,४५,००० |
| ३. गंगाजळी व इतर फंड | रु. | ३१,८८,८१८ |
| ४. एकूण ठेवी | रु. | ३,१८,३७,३४८ |
| ५. एकूण खेळतें भांडवल | रु. | ४,८७,३३,७७४ |

१. या बँकेच्या पैशाचा उपयोग प्रामुख्येंकरून जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना शेतकी सहकारी संस्थांमार्फत शेतीच्या चालू लागवडीकरितां कर्जाऊ देण्याकरितां केला जातो व साल अखेरीस ही रक्कम रु. १,९८,४७,६०३ इतकी आहे.

२. बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात. १ ते १० वर्षें लांब मुदतींच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. अल्प मुदतीच्या ठेवींचाहि व्यवहार केला जातो.

३. जळगांव येथील मुख्य कचेरींत, आणि चोपडें, चाळिसगांव, जामनेर व पारोळें येथील शाखांतून माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळण्याची सोय आहे.

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

व्ही. आर. शिंदे — शासनाधिकारी व कार्यसंचालक.

जे. एस. पाटील — चेअरमन.

कसा घालावा हा प्रश्न पडलेला आहे. (३) ह्या धंद्यांतील चढाओढ वाढत चाललेली आहे.

गेल्या कांहीं वर्षांत भारताच्या चहाची किंमत बरीच वाढली आहे. कामगारांचें किमान वेतन, मळा–कामगार कायद्याची अंमलबजावणी, यंत्रसामग्री, सिमेंट व इतर वस्तु ह्यांच्या किंमतींत झालेली वाढ ह्यामुळें चहाच्या किंमतीहि वाढल्या आहेत. वर पुन्हा जबर करांचें ओझें आहेच. चहाच्या धंद्याला दर पौंडामागें ६०.७५ नये पैसे इतका कर द्यावा लागतो. भारताच्या चहाची किंमत वाढल्यामुळें त्याला परदेशी बाजारपेठेंत नव्यानें उतरलेल्या देशांची तीव्र स्पर्धा होऊं लागली आहे. ती तशीच होत राहिली तर भारताच्या चहाला असणारा धोका वाढत जाणार आहे. भारत व सीलोन ह्यांनीं चहाच्या निर्यातीवर जबर जकात बसविली व नंतर त्यांत आणखी वाढ केली. त्याचप्रमाणें दुसऱ्या महायुद्धानंतर शेतीच्या उत्पन्नावर ६० टक्क्यांपर्यंत प्रतिकर बसविण्यांत आला. ह्या कारणांमुळें परदेशी बाजारपेठांत भारताचा चहा महागला. त्यामुळें पूर्व आफ्रिकेसारख्या उष्ण कटिबंधांतील देशांना चहाची लागवड नव्यानें करण्यास एक प्रकारचें अप्रत्यक्ष प्रोत्साहनच मिळालें आहे. जबर करांशिवाय, ह्या धंद्याला उत्पादनासाठीं ज्या वस्तु लागतात त्यांच्या किंमती वाढल्यानेंहि धंद्याला जोराचा धक्का बसला आहे. आयातीवरील नियंत्रणें व सरकारचें आयात–विषयक धोरण ह्यामुळें वरील वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत. सरकारनें चहाच्या धंद्यापुढील प्रश्नांची काळजीपूर्वक व वस्तुस्थिति समजावून घेण्याच्या दृष्टीनें अभ्यास करावा असा आग्रह धरण्यांत येत आहे. सरकारलाहि चहाच्या धंद्यावरील ताण कमी करण्याची जरुरी पटलेली आहे. चहाच्या निरनिराळ्या जातींवर वेगवेगळ्या दरानें अबकारी कर घेण्याची व निर्यात कर कमी करण्याची आवश्यकता सरकारला पटलेली आहे. तथापि ह्या उपायामुळेंहि चहाचा धंदा सुरक्षित पायावर उभारला जाईल असें म्हणतां येत नाहीं. चहावरील निर्यात कर रद्द करण्यांत यावा म्हणजे भारताच्या चहाची किंमत परदेशी बाजारपेठांत उतरेल आणि इतर देशांशीं स्पर्धा करण्याची ताकद वाढेल असें चहाच्या धंदेवाल्यांचें म्हणणें आहे. चहाची मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ कसा घालावा हा प्रश्न ह्या धंद्यापुढें नेहमींच उभा असतो. १९३१–३२ सालीं हा प्रश्न प्रथम उद्भवला. ह्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठीं इंटरनॅशनल टी मार्केट एक्सपान्शन बोर्ड व इंटरनॅशनल टी रेग्युलेशन मशिनरी ह्या संस्था स्थापन करण्यांत आल्या होत्या. इंटरनॅशनल टी कमिटीनें जमविलेल्या ताज्या आंकड्यांवरून चहाची मागणी व पुरवठ्याबाबतची गेल्या कांहीं वर्षांतील परिस्थिति लक्षांत येते. १९५४ सालीं जगांतील चहाच्या मागणीपेक्षा चहाचा पुरवठा ७.५ कोटी पौंडांनीं अधिक होता. हा आंकडा १९५५ सालीं २.६ कोटी पौंड होता व १९५६ सालीं ६.३ कोटी पौंड होता. मागणी व पुरवठ्यामधील ह्या तफावतीमुळें चहाच्या किंमतींत घट होणें अपरिहार्यच आहे. भारतांत ज्या तऱ्हेचा सामान्य चहा मुख्यतः तयार होतो त्याच्या किंमतीवरहि असाच परिणाम झाला आहे. शिवाय शिल्लकी सांठा वाढत चाललेला आहे. त्यामुळें चहाचे खरेदीदार अधिक चोखंदळपणा दाखविण्याच्या परिस्थितींत आहेत. आफ्रिका व इंडोनेशिआ ह्या देशांत भारतांतील सामान्य प्रतीच्या चहासारखाच चहा उत्पादन करण्यांत येतो. त्याच्या किंमतीहि भारताच्या चहापेक्षा बऱ्याच कमी असतात. अर्थात् भारताच्या चहाची परिस्थिति अडचणीची होते. भारताला आपला चहा बरेंच नुकसान सोसून विकावा लागतो. १९५२ पासून एका आड एक प्रत्येक वर्षी किंमती उतरलेल्या आहेत. १९५७ सालीं मात्र चहाच्या एकूण मागणीपेक्षा जगांतील चहाचा पुरवठा २.२ कोटी पौंडांनीं कमी पडला. उलट, १९५४ ते १९५६ ह्या तीन लागोपाठच्या वर्षांत पुरवठा मागणीपेक्षा अधिक होता. १९५८ सालीं जागतिक पुरवठा व मागणी ह्यांत फक्त १० लाख पौंडांचा फरक होता. ह्यावरून भावी काळ आशादायक आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

### बाजारपेठेंतील नवीन स्पर्धक

चहाच्या बाजारपेठेंत नवीन स्पर्धक उतरत आहेत. मोठ्या प्रमाणावर नाहीं तरी आफ्रिका आजच स्पर्धा करूं लागली आहे. चीनमधील चहाचें उत्पादन सध्या २५ कोटी पौंडांच्या आसपास आहे. पण १९६० च्या सुमारास चहाचें उत्पादन ८६ कोटी पौंडांपर्यंत वाढविण्याच्या योजना चीन आंखीत आहे. भारताच्या चहाच्या धंद्याला हा मोठा धोका आहे ह्यांत शंका नाहीं. चहाचें उत्पादन करणाऱ्या निरनिराळ्या देशांत होणारी उत्पादनाची वाढ आणि ग्राहक देशांतून होणाऱ्या खपाची १९६५ पर्यंतची वाढ ह्यांचा साकल्यानें विचार करतां चहाच्या धंद्याचें भवितव्य निराशाजनक नाहीं. जगांतील चहाच्या उत्पादनांत, निर्यातींत आणि खपांत एकंदरीनें वाढ झालेली आहे. चहा उत्पादन


फोन नंबर ३० तारेचा पत्ता 'रयतबँक'
पोस्ट बॉक्स नं. १३] स्थापना १९१७ [रजिस्टर नं. १९१६१

**दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सांगली**

(सन १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

शेअर भांडवल रु. ११,१४,११०
फंड्स रु. २,११,७७०
खेळतें भांडवल रु. १,१०,००,००० चे वर

शाखा :—(१) जत (२) मिरज (३) तासगांव (४) शिराळें (५) विटें (६) आटपाडी (७) इस्लामपूर (८) मार्केट यार्ड, सांगली (९) कडेगांव.

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

१ श्री. गुलाबराव आर. पाटील, B. A., LL. B., सांगली, चेअरमन. २ श्री. र. च. देशमुख, आटपाटी, व्हा. चेअरमन. ३ श्री. ज्ञानू बळवंत पाटील, कांदे. ४ श्री. ए. जी. शिंदे, म्हैसाळ. ५ श्री. गुलाबराव आनंदराव पाटील, मांजर्डे. ६ श्री. डी. पी. पाटील, सावर्डे. ७ श्री. रा. बा. पाटील, उपाळे मायणी. ८ श्री. एन. एस. पाटील, बसरगी. ९. श्री. ए. टी. आवटी, अर्ष्टे. १० एस. डी. पाटील, येलूर. ११ श्री. भगवंत अंबाजी दप्तरदार, B. A., सांगली. १२ श्री. म. ह. गोडबोले, B. A., LL. B., सांगली. १३ श्री. सु. आ. पाटील, सांगली. १४ श्री. आर. बी. आरवाडे, B. A., LL. B., सांगली. १५ श्री. जी. एम्. लाड, मुंबई राज्य सह. बँक प्रतिनिधि. १६ श्री. असिस्टंट रजिस्ट्रार, को-ऑप. सोसायटीज, सांगली.

लीगल अॅड्व्हाइजर :–श्री. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.

बँकर्स :—दि बॉंबे स्टेट को-ऑप. बँक लि., मुंबई.

पी. बी. टाकवेकर, B. A., H. D. C.,
मॅनेजर.

करणाऱ्या देशांतहि चहाचा खप वाढला आहे. युद्धापूर्वी उत्पादक देशांच्या एकूण उत्पादनापैकी ३० टक्के चहा त्या त्या देशांतच खपत असे. आतां घरच्या बाजारपेठेंत खपणाऱ्या चहाचें प्रमाण ३५ टक्क्यांपर्यंत वाढलें आहे. भारतांत चहाच्या एकूण उत्पादनापैकी एक तृतियांश चहा घरच्या बाजारांतच खपतो. १९५८ सालीं सुमारें ५०.६ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला व सुमारें २०.५ कोटी पौंड घरच्या बाजारपेठेसाठी शिल्लक राहिला. गेल्या कांहीं वर्षांत भारतांतील चहाचा अंतर्गत खप दरसाल १.५ कोटी पौंडांनीं वाढला आहे. १९५७–५८ सालीं भारतांत सुमारें २१.२ कोटी पौंड चहा खपला असावा. ह्यावरून दरसाल १ कोटी पौंड ह्या वेगानें भारतामधील चहाचा खप वाढेल असें मानण्यास हरकत नाहीं. म्हणजे १९६५ च्या सुमारास देशांतील चहाचा खप ३१.५ कोटी पौंडांच्या आसपास येईल. १९६५ सालअखेर संपणाऱ्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारतांत ८१.६ कोटी पौंड चहाचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. उत्पादन ८१.६ कोटी पौंड व अंतर्गत खप ३१.५ कोटी पौंड असा हिशोब झाला. म्हणजे १९६५ सालअखेर ५०.१ कोटी पौंड चहा निर्यातीसाठी मिळूं शकेल.

१९५६–५८ ह्या कालांत भारतानें दरसाल सरासरी ४९.०७ कोटी पौंड चहा निर्यात केलेला आहे. खालील तक्त्यांत जगांतील चहाच्या उत्पादनाचे आंकडे दिले आहेत.

जगांतील चहाचें उत्पादन

( आंकडे कोटी पौंडांचे )

| | १९५८ | १९५७ | १९५६ |
|---|---|---|---|
| भारत | ७०.९ | ६७.९ | ६७.० |
| सीलोन | ४१.३ | ३९.७ | ३७.५ |
| इंडोनेशिआ | १०.२ | १०.१ | १०.२ |
| पाकिस्तान | ५.४ | ४.६ | ५.४ |
| आफ्रिका | ६.२ | ५.४ | ५.४ |

चहाचें उत्पादन करणाऱ्या देशांकडून चहा वापरणाऱ्या देशांकडे सध्या १२० कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत येतो. १९६५च्या सुमारास हा निर्यातीचा आंकडा १५० कोटी पौंडांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. ह्या निर्यातींत आज भारताचा वांटा ४२.५ टक्के आहे. १९६५ सालीं जगाच्या एकूण निर्यातींत भारताचा वांटा ५४ कोटी पौंड असेल असें मानलें तर तें वस्तुस्थितीला धरूनच होईल. ह्याचा अर्थ असा होतो कीं, भारताला आपली निर्यात दरसाल ५० लाख पौंडांनीं वाढवावी लागणार आहे. हा अंदाज अगदीं बेताचा आहे. सध्याच्या निर्यातींत भारताचा वांटा ४२.५ टक्के आहे हें लक्षांत घेतलें तर ह्याच हिशोबानें १९६५ च्या सुमारास भारताला ६३.७५ कोटी पौंड चहा निर्यात करतां येण्यास हरकत येऊं नये. तथापि भारतांत वाढणारा चहाचा खप आणि जागतिक बाजारपेठेंत उतरणारे नवीन देश ह्यांचा विचार करतां ५४.०० कोटी पौंडांचें लक्ष्य फारसें अशक्य वाटण्याचें कारण नाहीं. १९६५ च्या सुमारास म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचे अखेरीस भारताची निर्यात ५४ कोटी पौंड असेल व अंतर्गत खप ३१.५ कोटी पौंड असेल. म्हणजे भारताला १९६५ सालअखेर ८५.५ कोटी पौंड चहा निर्माण करावा लागेल. आतांच्या अंदाजाप्रमाणें ८१.६ कोटी पौंड चहा १९६५ अखेर उत्पादन होऊं शकेल. भारताच्या चहाच्या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल असून देशाच्या भविष्यकालीन आर्थिक कार्यक्रमांत त्याला महत्त्वाचें स्थान आहे हें ह्यावरून उघड दिसतें.


# दि बँक ऑफ कराड लि.

हेड ऑफिस : कराड

शाखा :—सातारा, इस्लामपूर व तासगांव

चेअरमन : श्री. नारायण बाळाजी बुधकर, B. A., LL. B.

व्हा. चेअरमन :—श्री. महादेव रामचंद्र देशपांडे

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | २,३०,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | १,००,००० |
| ठेवी | रु. | ३६,००,००० |

बँक खालील दरानें ठेवी स्वीकारते. चालू ठेव १%, सेव्हिंग्ज ठेव २½% आणि मुदत ठेव ३½% ते ४½%.

बँकेनें कराड येथें आपले मालकीची इमारत बांधलेली असून त्यामध्यें अद्यावत् पद्धतीची सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे. त्याचप्रमाणें इस्लामपूर व तासगांव शाखांमध्येंहि सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे. चेक, हुंड्या, रेल्वे रशिदी वगैरे बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार सर्व ठिकाणीं केले जातात. या सर्वांचा फायदा ग्राहकांनीं अवश्य घ्यावा.

म. वि. खंडकर
मॅनेजर.



# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें

[स्थापना १९०६] [फोन नं. ६२८२]

कॉसमॉस बँक बिल्डिंग, कुंटे चौक, लक्ष्मी रोड

कामाची वेळ:—सकाळीं ९–१५ ते ११–४५
सायंकाळीं ५–१५ ते ६–४५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,६५,५४० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १,८२,३९७ |
| ठेवी | रु. | १७,००,८०२ |
| खेळतें भांडवल | रु. | २१,२६,५८१ |

मा. सल्लागार मंडळ :–(१) मा. य. बा. देहाडराय, अध्यक्ष (२) मा. वि. त्रिं. टिळक, उपाध्यक्ष (३) मा. चिं. वा. भट (४) मा. गो. शं. देशमुख (५) मा. श्री. अ. कानगो.

मा. कार्यकारी मंडळ :–(१) मा. वि. ल. हर्डीकर, कार्याध्यक्ष (२) मा. डॉ. न. का. घारपुरे, उपकार्याध्यक्ष (३) मा. गं. मो. भणगे (४) मा. वा. ब. गोगटे (५) मा. र. पां. भोंडे (६) मा. अ. दा. मोघे (७) मा. ग. वि. गोखले (८) मा. द. ग. देव (९) मा. वा. कृ. परांजपे (१०) मा. मो. वि. कुलकर्णी (११) मा. शं. वि. दिवाकर.

स्थानिक आयव्यय निरीक्षक :–(१) मा. रा. कृ. देशपांडे (२) मा. व. का. साठे.

कर्जरूपानें आर्थिक सहाय्यतेच्या अनेक व्यवस्था व कर्जफेडीच्या व व्याजाचीबेटच्या सवलती.

मुंबई, सांगली व अहमदनगर येथील बँकांवर ड्राफ्टस् दिले जातात.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह.

# कामगारांची उद्योगधंद्यांतील भागीदारी

## यशासाठी कोणती परिस्थिति पाहिजे

दुसरें महायुद्ध संपल्यावर सुरू झालेल्या कालाच्या प्रारंभीं, औद्योगिक कारखान्यांची मालकी सार्वजनिक करण्यांत आली तर आर्थिक क्षेत्रांत लोकशाहीचा श्रीगणेशा चालू करण्याची तीव्र इच्छा पुरी होण्यास मदत होईल असें आत्मविश्वासपूर्वक सांगण्यांत येत होतें. ह्या बाबतींत असा युक्तिवाद करण्यांत येत होता कीं, एकदा मक्तेदार भांडवलदाराचें उच्चाटन करण्यांत आलें कीं, उद्योगधंद्यांत होणारा नफा राज्यसंस्थेच्या नियमनाच्या व कारभाराच्या द्वारां फक्त सार्वजनिक हिताकरतां वापरणें शक्य होईल. असें झालें म्हणजे कामगारांनाहि असें वाटूं लागलें कीं, ते काम करीत असलेल्या उद्योगधंद्यांत त्यांची भागीदारी आहे, आणि उद्योगधंद्यांच्या चालकांना जे अधिकार व खास सवलती आहेत त्याच त्यांनाहि आहेत.

भांडवलदारी व समाजवादी अशा दोन्ही प्रकारच्या देशांतून गेल्या दोन अगर तीन दशकांत राष्ट्रीयीकरणाचे प्रयोग करण्यांत येत आहेत. तथापि, ह्या प्रयोगांत आलेल्या अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, कारखान्यांची मालकी व नियमन खाजगी व्यक्तींच्याकडून काढून घेऊन राज्यसंस्थेच्या हवालीं केली म्हणजेच केवळ आर्थिक अगर औद्योगिक लोकशाहीचा हेतु साध्य होतो असें नाहीं. समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रमुख आधार म्हणून राष्ट्रीयीकरणाचें तत्त्व ज्या देशांत मान्य करण्यांत आलें होतें, त्याहि देशांत कामगाराला आपल्या श्रमाचा पूर्ण वाटा मिळूं शकलेला नाहीं. त्याला रहाणीचें योग्य मान मिळालेलें आहे किंवा खऱ्या अर्थानें आर्थिक स्वातंत्र्य मिळालेलें आहे असेंहि दिसून येत नाहीं. राष्ट्रीयीकरणामुळें निवर्गीय समाज अस्तित्वांत येईल अशी अपेक्षा करण्यांत येत होती. पण तसें झालें नाहीं. उलट असें कां झालें नाहीं म्हणून प्रश्न विचारण्यांत येत आहे. त्यामुळें राष्ट्रीयीकरणाच्या तत्त्वाबद्दल पुष्कळशा देशांत बऱ्याच प्रमाणावर पुन्हा विचार करण्यांत येऊं लागलेला आहे. ब्रिटनमध्यें तर आज कांहींशी विचित्र परिस्थिति पहाण्यास मिळते. त्या देशांत मजूरपक्ष हा युद्धोत्तर काळांत पांच वर्षे सर्व सत्ताधारी होता. त्या काळांत मजूरपक्षानें ब्रिटनमधील जवळजवळ एकतृतीयांश बडी कारखानदारी राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेंत आणली. पण आज हाच पक्ष राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाबद्दल सावधगिरीनें पावलें टाकावयास पाहिजेत असें म्हणत आहे.

त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, आधुनिक समाजवाद्याला हें कळून चुकलें आहे कीं, राष्ट्रीयीकरण हें कांहीं साध्य नव्हे. तें फक्त एक साधन आहे. हीच गोष्ट फोरिअर, फिश्ट, प्रुधाँ, रॉबर्ट ओवेन, जी. डी. एच्. कोल, सिडेन वेब ह्यासारख्या बुद्धिमतांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी ओळखली होती. प्रगतीची मुख्य कसोटी म्हणून समाजवाद्याला जडवादावर आधारलेल्या सुखाच्या कल्पनांचा स्वीकार करावाच लागतो. पण त्याची खरी धडपड व शोध मानवी जीवनांतील समानता, स्वातंत्र्य व बंधुभाव ह्या जगमान्य ध्येयासाठी चाललेली असते. केवळ आर्थिक निकषावर एखाद्या अर्थव्यवस्थेचें यशापयश ठरविणें त्याला आवडणार नाहीं. (उदा. उत्पादन, व्यापार, खर्च, उत्पन्न, इत्यादि). एखादी अर्थव्यवस्था माणसाची मानसिक उंची वाढविण्यासाठी अगर त्याच्या जीवनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी काय करूं शकली ह्यावर तो यशापयशाची मोजणी करूं पाहतो. म्हणजे समाजवाद्यांची अखेरची कसोटी तत्त्वज्ञानिक आहे. एखाद्या समाजांत कमी बेकारी, उच्च वेतनें, कामाचे कमी तास, अधिक पेन्शनें व सामाजिक सुखसोईसाठी अधिक पैसा असेल तर त्याला तें इष्टच वाटतें. पण ह्या मोजता येण्यासारख्या सुधारणा म्हणजे सर्वस्व नव्हे अशी त्याची धारणा असते. ज्या समाजाचा गाभा सध्यांच्या समाजापेक्षा वेगळा आहे, ज्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीला अधिक पूर्ण जीवन जगण्याची संधि मिळत आहे, ज्या समाजांत अधिक सहकार्यमय जीवनाची घाटणी आहे अशा प्रकारच्या समाजाचा पाया म्हणूनच तो वरील संख्यात्मक सुधारणांना महत्त्व देतो. त्याला खरा बदल पाहिजे असतो तो समाजाच्या गुणवत्तेंत. कारखान्यांच्या कारभारांत कामगारांनीं अधिक प्रमाणांत भाग घेतला तर आर्थिक व औद्योगिक लोकशाही परिणामकारक रीत्या स्थापन करतां येईल असें वाटल्यामुळें कामगारांच्या भागीदारीच्या कल्पनेवर, अधिकाधिक जोर देण्यांत येत असतो.

ब्रिटनमध्यें जी. डी. एच. कोल ह्यांनीं व फ्रान्स आणि जर्मनींतील सिंडिकॉलिस्ट कामगारपंथानें ह्याच मुद्यावर विशेष भर दिलेला होता. त्यांचें मत असें होतें कीं, 'स्वार्थी' अशा खाजगी भांडवलदाराच्या गादीवर सर्वशक्तिमान् व सामूहिक अशा राज्यसंस्थेची स्थापना केल्यामुळेंच केवळ कामगारांच्या जीवनांत खरा बदल घडून येईल असें नाहीं. ह्या दृष्टिकोनांत महत्त्वाचा मुद्दा आहे, तो असा: कामगारांच्या भागीदारीमुळें उद्योगधंद्यांची व त्यांच्या उत्पादनाची वाढ होण्यास मदत होईल असें सांगण्यांत येत होतें. सध्यांच्या पद्धतींत कामगारांना उत्पादनप्रक्रियेंत आपण कोणी परके आहों असें वाटत असतें. आपण फक्त पगाराचे व कधीं कधीं बोनसचे धनी आहोंत; कारखान्याच्या मालकीशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें त्याला वाटत असतें. कारखान्याच्या कारभारांत जर तो सहभागी होऊं लागला तर आपल्या कामांत तो अधिक मन घालेल आणि पुष्कळदा मालकाशीं वैरत्वाच्या भावनेनें जें तो वागतो तसें त्याला करावें लागणार नाहीं. उद्योगधंद्यांतील कामगारांच्या स्थानाची जर त्यांना अधिक चांगली कल्पना दिली गेली, आणि स्वतःच्या व्यक्तित्वाच्या आविष्कारासाठी तर त्यांना अधिक संधि देण्यांत आली तर मालक व कामगार ह्यांच्यांतील संबंध अधिक चांगले होतील आणि त्यांचें सहकार्यहि वाढीस लागेल असें सांगण्यांत येत असे. त्यामुळें उद्योगधंद्यांत शांतता राहील, उत्पादनांत वाढ होईल, आणि परिणामी कारखाना, कामगार व समाज ह्यांचें हितसंवर्धन होईल असा हा युक्तिवाद आहे.

कामगारांना उद्योगधंद्यांच्या कारभारांत सहभागी करून घेण्याच्या युक्तिवादांतील खरें कारण अधिक खोलवर रुजलेलें आहे. आपल्या रोजगारींतील नजीकच्या हितसंबंधांची राखण करण्यासाठींच फक्त कामगार प्रयत्न करीत असतो असें नाहीं. त्याला स्वतःच्या स्थानाच्या पलीकडे जाऊन म्हणजे

कामगारांच्या दर्जापलीकडे जाऊन उत्पादनाच्या प्रक्रियेंतच भागीदार होण्याची तीव्र इच्छा असते. ह्या उत्पादन प्रक्रियेवर आज मालकांचें नियंत्रण आहे. केवळ कामगार म्हणून जगण्याची व कामगार म्हणूनच मरण्याची, जिवंत असेपर्यंत ठराविक काम करण्याचीच फक्त त्याला इच्छा असते असें नाहीं. आपल्या कामाच्या पलीकडील आर्थिक जीवनाकडे साकल्यानें पाहण्याची, आपल्या व्यावहारिक ज्ञानाच्या व अनुभवाच्या साह्यानें त्यांत भर घालण्याचीहि त्याला इच्छा असते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे उद्योगधंदे व आर्थिक जीवन ह्यांचा आपण एक भाग आहोंत हें अनुभवण्याची त्याची इच्छा असते.

तेव्हां औद्योगिक लोकशाहीचा नवा मंत्र म्हणून कामगारांची उद्योगधंद्यांतील भागीदारी आतां मान्यता पावली आहे. राजकीय लोकशाहींत सामान्य लोक स्वतः निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत नियंत्रण करतात. ज्या औद्योगिक लोकशाहीचा सध्यां विचार करण्यांत येत आहे तींत कामगारांच्या व तंत्रज्ञांच्या प्रतिनिधींच्या मार्फत हें नियंत्रण अमलांत आणण्याचा विचार होत आहे. ह्या बाबतींत मालकांच्या प्रतिनिधींच्या बरोबरीचा दर्जा त्यांना देण्यांत येणार आहे. आपल्यां देशांतहि ह्या कल्पनेनें सरकारचें लक्ष वेधून घेतलेलें आहे. सामूहिक समाजजीवनाच्या साठलेल्या पाण्यांत समाजवादाची दिशा चुकण्याचा धोका आहे. ही गोष्ट नियोजन समितीच्या तीक्ष्ण नजरेंतून सुटलेली नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत असें आवर्जून सांगण्यांत आलें आहे कीं, कार्यक्रमाची यशस्वी पूर्तता करण्यासाठी उद्योगधंद्यांच्या चालकांचें व कामगारांचें अधिक सहकार्य होणें जरूर आहे. १९५६ मध्यें मंजूर करण्यांत आलेल्या औद्योगिक धोरणविषयक ठरावांतहि असें नमूद करण्यांत आलें आहे कीं, समाजवादी लोकशाहींत आर्थिक विकासाच्या कामांत कामगार हा एक भागीदार आहे आणि त्यानें ह्या कामांत उत्साहानें भाग घेतला पाहिजे. निरनिराळ्या पातळींवर संयुक्त-चर्चा करण्यांत आली पाहिजे. ज्या ज्या ठिकाणीं शक्य असेल त्या त्या ठिकाणीं कामगार व तंत्रज्ञ ह्यांना कारभाराच्या क्षेत्रांत हळूहळू योग्य तें स्थान देण्यांत आलें पाहिजे. आतां ह्या कल्पनेच्या यशापयशाचें भवितव्य आपल्या देशांत काय आहे असा प्रश्न उद्भवतो.

कामगारांच्या उद्योगधंद्यांतील भागीदारीच्या कल्पना युरोपमधील सहा देशांतून प्रत्यक्षच अमलांत आणण्यांत येत आहेत. ह्या प्रयोगांचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारनें १९५६ सालीं एक अभ्यासगट तिकडे पाठविला. या अभ्यासगटानें जो अहवाल सादर केला त्यांत कांहीं निवडक उद्योगधंद्यांतून ह्या बाबतींत पहिलीं पावलें सावधगिरीनें टाकण्याची सूचना केली आहे. १९५७ सालीं राज्य सरकारांच्या मजूरमंत्र्यांची एक परिषद भरविण्यांत आली आणि तींत वरील सूचनेचा विचार करण्यांत आला. परिषदेंत असें ठरविण्यांत आलें कीं, खाजगी व सार्वजनिक मालकीच्या अशा दोन्ही विभागांत ह्या कल्पनेच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यांत यावी. खाजगी मालकीच्या तीन कंपन्यांतून कामगारांच्या भागीदारीचा प्रारंभ मर्यादित प्रमाणांत आधींच करण्यांत आलेला होता. ह्या तीन कंपन्या म्हणजे दि इंडिअन अल्युमिनम कंपनी लि., टाटा आयर्न अँड स्टील कं. लि., आणि इंदूरची राजकुमार टेक्स्टाइल मिल्स ह्या होत. १९५८ च्या प्रारंभीं ह्या कल्पनेची अंमलबजावणी बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांतहि सुरू करण्यांत आली आहे; ज्या देशांतून असा प्रयत्न करण्यांत येत आहे, त्या देशांतील अनुभवावरून असें दिसून येतें कीं, कामगारांची भागीदारी यशस्वी होणें तीन गोष्टींवर अवलंबून असतें. ज्या उद्योगधंद्यांच्या चालकवर्गाशीं कामगारांचें सक्रिय साहचर्य घडवून आणावयाचें असतें त्या उद्योगधंद्यांतील कामकाजांत डोळसपणें लक्ष घालण्याइतकें कामगारांचें शिक्षण झालेलें असलें पाहिजे, ही पहिली गोष्ट. पुष्कळदां असें असतें कीं, कामगारांना उद्योगधंद्यांच्या भावी उत्कर्षापेक्षा त्यांच्या नजीकच्या हितसंबंधांविषयी अगर सवलतींविषयी अधिक आस्था वाटत असते. उदाहरणार्थ, नफ्यांतील वाटा अगर सुखसंवर्धक सोयी-सवलती. दुसरी गोष्ट अशी कीं, चालक-कामगार सहकार्य घडवून आणण्याच्या योजना आखण्याच्या कामीं कामगार संघटनांनीं संपूर्ण सहकार्य केलें पाहिजे. ब्रिटनमध्यें व्हिटले कौन्सिलला ह्या बाबतींत अपयश आलें. कारण कामगारांच्या संघटनांनीं विरोध केला. त्यांना असें वाटलें कीं, कामगारांच्या प्रतिनिधींचीच एक नवी नोकरशाही निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. हाच अनुभव समाजवादी नसलेल्या देशांतहि आला. तिसरी गोष्ट अशी कीं, मालकवर्गानें कामगारांना अगर त्यांच्या प्रतिनिधींना खऱ्या अर्थानें जबाबदारींत अंशभागी केलें पाहिजे. पुष्कळदां असें होतें कीं, मालकवर्गाकडून कारखान्याच्या संयुक्त-सल्लागार मंडळाकडे जे अहवाल पाठविले जातात ते संदिग्ध आणि सर्वसामान्य स्वरूपाचे असतात. त्यामुळें कारखान्यापुढील खऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीला चालनाच मिळत नाहीं.

मालकवर्ग आणि कामगार ह्या दोघांनींहि इष्ट त्या प्रकारची मनोवृत्ति निर्माण करण्यावर भारत-सरकारच्या अभ्यासगटानें सादर केलेल्या अहवालांत जोर देण्यांत आलेला आहे. कारभार पहाणाऱ्या मधल्या व खालच्या श्रेणींतील नोकरवर्गासंबंधीं ही सूचना विशेष आग्रहानें करण्यांत आलेली आहे. त्याचबरोबर हेंहि स्पष्ट करण्यांत आलेलें आहे कीं, कारभारविषयक संयुक्त मंडळें आणि कामगार-संघटना ह्यांचीं कार्यें भिन्न आहेत; तीं तशींच असलीं पाहिजेत. कामगार-संघटनांकडे सामुदायिक करारमदार, बोनस, कामगारांचीं वैयक्तिक गाऱ्हाणीं, इत्यादि बाबी सोंपविण्यांत याव्या; संयुक्त-सल्लागार मंडळांनीं कारखाना अगर उद्योगधंदा ह्यांच्या प्रत्यक्ष व्यवहारांकडे लक्ष द्यावें, असें अभ्यासगटानें सुचविलें आहे. उदाहरणार्थ, कामगारांच्या संख्येंत कपात, आधुनिकीकरण, टाळेबंदी, कामाचा व्याप कमी करणें, बाजारपेठेची दखल घेणें, उत्पादनाची योजना ठरविणें, इत्यादि. मालक व कामगार ह्यांचें सहकार्य कांहीं निवडक क्षेत्रांत भारतांत गेलीं कांहीं वर्षें चालूंच आहे. पण, उद्योगधंद्याच्या कारभारांत प्रत्यक्ष सहभागी होण्याची कल्पना मात्र कांहींशी नवीच आहे. ह्या क्षेत्रांत जे प्रयोग सुरू करण्यांत आलेले आहेत ते शंभर टक्के यशस्वी झालेले आहेत असें म्हणण्यास अद्याप पुरेसा काळ लोटलेला नाहीं.

ह्या बाबतींत महात्मा गांधींनीं २१ वर्षांपूर्वी जे विचार व्यक्त केले आहेत तें लक्षांत घेणें योग्य होईल. "एखादा कारखाना चांगला चालावयाचा असेल तर कामगारांना भागीदारांप्रमाणें सारख्याच हक्काचे मालक म्हणून मानण्यांत आलें पाहिजे; आणि सर्व व्यवहारांची अचूक माहिती करून घेण्याचा हक्कहि त्यांना असला पाहिजे." अहमदाबाद येथील कापडगिरण्यांच्या व्यवहारांसंबंधीं महात्मा गांधींनीं त्या वेळीं जे विचार व्यक्त केले आहेत तेच विचार आज इतर उद्योगधंद्यांविषयींहि तितक्याच सार्थपणानें लागू केले पाहिजेत.

# कॉफीच्या धंद्यापुढील कांहीं प्रश्न

## जागतिक किंमतींचे परिणाम


भारताच्या उद्योगधंद्यांपैकी कॉफीचा धंदा हा गेल्या कांहीं वर्षांत जोरानें वाढीस लागलेला आहे. गेल्या पांच वर्षांच्या अवधींत हिंदमधील कॉफीचें उत्पादन जवळ जवळ दुप्पट झालें आहे. १९५८ सालीं भारतांत ४३,२०० टन कॉफीचें उत्पादन झालें. १९४० सालीं देशांतील कॉफीचा खप ८,००० टन होता. तेव्हांपासून खपांत एकसारखी वाढ होत गेली आणि आतां वार्षिक खप २६,२०० टनांपर्यंत आला आहे. सुमारें १५ वर्षांच्या कालांत कॉफीचा खप तिपटीपेक्षांहि अधिक वाढलेला असतांना सुद्धां भारत आज १५,००० टन कॉफी निर्यात करतो. १९२९ सालच्या जागतिक मंदीच्या काळांत कॉफीच्या धंद्याला मोठ्या अडचणींना तोंड द्यावें लागलें. त्या अडचणींतून मार्ग काढून कॉफीच्या धंद्यानें आज प्रगतीच्या वेगाच्या बाबतींत सर्व प्रकारच्या उत्पादनांत पहिला अनुक्रम पटकविला आहे. तथापि ह्याचा अर्थ धंद्यापुढें कोणतेच अवघड प्रश्न नाहींत असा नाहीं. इतर मळ्यांप्रमाणेंच कॉफीच्या मळ्यावरील मजुरांचें वेतन उत्पादनाच्या मानानें अधिक त्वरेनें वाढलें आहे, व कॉफीच्या छोट्या मळेमालकांना बिकट आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे. भारताची कॉफीची निर्यात वाढली आहे. पण, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या पार्श्वभूमीवर कॉफीच्या धंद्याची परिस्थिति विशेष चांगली नाहीं. कारण, जगांतील कॉफीच्या एकूण निर्यातीपैकी भारताचें उत्पादन कमी कमी होत चाललें आहे.

उत्पादन व निर्यात ह्या दोन्ही बाबतींत परिस्थिति नव्यानें अजमावली जाणें जरूर आहे. कॉफीला भारतामधील अंतर्गत मागणी अतिशय वेगानें वाढत आहे. गेल्या १७ वर्षांत कॉफीची मागणी दरसाल १५ टक्क्यांनीं वाढत आहे. ह्या मागणीला तोंड देण्यासाठी उत्पादनाचा नवा कार्यक्रम आंखण्यात आला पाहिजे. त्याचबरोबर परदेशीय बाजारपेठेंतील तीव्र स्पर्धेला तोंड देऊन त्यांत बस्तान बसवून परदेशीय चलन मिळविण्याचेहि प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. जलद वाढणाऱ्या बाजारपेठेंतील अधिकाधिक भाग भारताच्या कॉफीनें काबीज केला पाहिजे. ह्यासाठी उत्पादनाच्या खर्चावर नियंत्रण घातलें पाहिजे. गेलीं तीन वर्षे नियंत्रणाचा अभाव आहे. मळ्यांबद्दल केलेल्या अनेक कायद्यांचा कॉफीच्या धंद्यावर परिणाम झालेला आहे. कॉफीचा धंदा चहासारखाच आहे असें पुष्कळदां मानण्यांत येतें. पण दोन्ही धंद्यांचा साकल्यानें विचार करतां चहाच्या धंद्यापेक्षां निराळें असें कॉफीच्या धंद्याचें धोरण असावयास पाहिजे. इतकेंच काय, पण असेंहि म्हणतां येईल कीं, देशांतील कॉफीच्या खपाचा अंतर्गत वेग कमी करून चहाचा खप अधिक वाढविण्यास वाव दिला पाहिजे; आणि अशा रीतीनें कॉफीची निर्यात वाढवून अधिक परदेशीय चलन मिळविलें पाहिजे. चहा व कॉफी ह्या धंद्यांबद्दल सुसंगत धोरण अद्याप आंखण्यांत आलेलें नाहीं. असें धोरण आंखणें ही आजची तातडीची गरज आहे. मध्यवर्ती सरकार आणि कॉफीच्या धंद्याशीं संबंध असणारे खाजगी व सार्वजनिक स्वरूपाचे हितसंबंध ह्यांनीं कॉफीची निर्यात व अंतर्गत खप ह्या बाबतींत अधिक लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. कॉफीचा तुटवडा व चढ्या किंमती ह्या बाबतींत जनतेचीहि कांहीं जबाबदारी आहे. ह्या धंद्याला उत्तेजन देण्याच्या कामीं लोकांनींहि कांहीं हातभार लावला पाहिजे. कारण, इतर प्रकारच्या मळ्यांप्रमाणें कॉफीच्या मळ्यांवरील कामगारांनींहि अनेक मागण्या मिळविल्या आहेत. कधीं कधीं ह्या मागण्या ग्राहकांच्या हिताशीं संपूर्णपणें विरोधी असतात.

कॉफी ही एकच वस्तु अशी आहे कीं, जी कायद्यानें प्रस्थापित करण्यांत आलेल्या बोर्डामार्फत बाजारांत विकण्यांत येतें. सरकारशीं विचारविनिमय करून धंदा चालविण्याचा इतका दीर्घ अनुभव दुसऱ्या कोटल्याहि धंद्याला असण्याचा संभव नाहीं. शिवाय सरकारच्या धोरणामुळें कॉफीच्या उत्पादकांवर कित्येक बाबतींत परिणाम होत असतात. आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या बाबतींत ज्या चौकशा करण्यांत आल्या त्यामुळें कायद्यानें स्थापन करण्यांत आलेल्या व्यापारी संघटना आणि सरकार ह्यांच्या संबंधावर लोकांचें लक्ष प्रामुख्यानें वेधलें गेलें आहे. तथापि ह्यासंबंधींची सर्वसामान्य तपासणी अद्याप झालेली नाहीं. हे संबंध कसे असावेत हें कॉफी बोर्डाच्या उदाहरणावरून व इतिहासावरून समजण्यासारखें आहे. कॉफी बोर्डाची स्थापना कॉफीची लोकप्रियता वाढविण्याच्या हेतूनें करण्यांत आली. आणखी कांहीं उद्दिष्टें बोर्डापुढें नव्हतीं. १९३५ सालीं इंडिअन कॉफी सेस ॲक्ट मंजूर झाला व तेव्हांच बोर्डाची स्थापना झाली. १९४१ सालपर्यंत बोर्ड फक्त बाजारपेठ वाढविण्याचीच खटपट करीत असे. त्या वर्षी अधिक अधिकार व कार्ये असणाऱ्या बोर्डाची संघटना करण्यांत आली. कारण, दोन युद्धांनंतर कॉफीसंबंधीं बरेच प्रश्न उपस्थित झाले होते. एक-दोन वर्षांतच केवळ बाजारपेठेची वाढ करण्याच्या प्रयत्नापुरतेंच त्याचें कार्य न रहातां कॉफीच्या प्रत्यक्ष विक्रीची व्यवस्था करण्याचें कार्यहि त्याला करावें लागलें. १९४४ सालीं देशांत उत्पन्न होणारी सर्व कॉफी गोळा करणें व तिच्या बाजारपेठेची व्यवस्था करणें हीं कामें बोर्डाकडे आलीं. फक्त दूरवर असणारे मळे व मळेवाल्यांना स्वतःसाठी लागणारी कॉफी एवढ्याच बाबी बोर्डाच्या कक्षेच्या बाहेर राहिली. १९४७ सालीं कॉफीविषयक संशोधन करणें बोर्डाच्या कक्षेंत आलें.

भारतीय संघराज्यांत गेल्या वीस वर्षांत कॉफीचें वार्षिक उत्पादन १५० टक्क्यांनीं वाढलें आहे. टक्केवारींत हिशोब केला तर दरसाल सरासरी ७॥ टक्क्यांपेक्षा अधिक असा हा वेग आहे. ह्याचा अर्थ असा नाहीं, कीं वाढीचा वेग दरसाल सारखाच होता. तसें पाहिलें तर झालेल्या वाढीपैकी बरीच वाढ गेल्या ५ वर्षांतच झालेली आहे. पुढें दिलेल्या उत्पादनाच्या कोष्टकावरून ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे. १९३८-३९ आणि १९४८-४९ ह्या कालखंडांत कॉफीचें उत्पादन १७,९०६ टनांपासून २२,३०० टनांपर्यंत वाढलें. म्हणजे दहा वर्षांत उत्पादन २५ टक्के अगर दरसाल २·५ टक्के इतकें वाढलें. उलटपक्षी १९४८-४९ आणि १९५८-५९ ह्या कालखंडांत उत्पादन २२,३०० टनांपासून ४५,४३० टनांपर्यंत वाढलें ह्या दहा वर्षांत उत्पादन जवळ जवळ १०४ टक्क्यांनीं अगर दरसाल १०

# "भिडे" पॉवर लूम्स



६०" व ५६" पॉवर लूम्स ८ व १६ शॅफ्टच्या डॉबीज व जॅक क्रीलसचे उत्पादक

## भिडे ॲण्ड सन्स

प्रायव्हेट लि.

शिवाजीनगर, सांगली ( S. Rly ).





[ स्थापना १९२१ ]

# गरगट्टी ॲंड सन्स

शहापूर-बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो !



आमच्या ग्राहकांस व हितचिंतकांस नूतन वर्ष सुखाचें जावो !

गेल्या ३० वर्षांपेक्षां जास्त वर्षें सतत 'अ' वर्गातील कराडांतील सर्वांत जुनी बँक

# दि कराड अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

जि. उ. सातारा] स्थापना १४ जानेवारी १९१७ [ फो. नं. ४१

अध्यक्षः—श्री. विश्वनाथ कृष्णराव तांबवेकर, बी. ए., एलएल. बी., वकील.

| | | |
|---|---|---|
| भाग मांडवल | रु. | १,४५,०८० |
| रिझर्व फंड | रु. | १,४६,६०० |
| इतर फंड | रु. | २,८६,९०० |
| ठेवी | रु. | ३६,७८,६०० |

चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात. रेल्वे रिसिट्स, हुंड्या, चेक्स, वगैरे बिले माफक दरांत वसूल करून दिलीं जातात. अल्प उत्पन्नाच्या लोकांच्या करितां 'स्वल्पसंचय' ठेवीची योजना चालू असून ती यशस्वी होत आहे. तसेंच मौल्यवान् वस्तु ठेवण्याची सेफ डिपॉझिट व्हॉल्टची अद्ययावत् सोय.

विशेष माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

कराड, १४-१०-१९५९ } शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कचेरी : १५०, मांदूर गल्ली, बेळगांव.

शाखा ११



| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर मांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल शेअर मांडवल | रु. | १५,९१,५०० |
| गंगाजळी व इतर फंड | रु. | ९,२७,४७४ |
| ठेवी | रु. | १,८६,०२,७९७ |
| खेळतें मांडवल | रु. | २,३१,२१,७७० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचें व्यवहार केले जातात.

बैलहोंगल व बेळगांव बझार शाखेंत मौल्यवान् वस्तूंच्या सुरक्षिततेसाठी लॉकर्सची व्यवस्था आहे.

व्ही. सी. मेडलेरी, बी. कॉम. मॅनेजर.



एम्. एस्. होसमनी चेअरमन.

टक्क्यांपेक्षा अधिक ह्या वेगानें वाढलें. भारतामधील कॉफीच्या खपाचे साळोसालचे नक्की आंकडे मिळण्यासारखे नाहींत. खपाचा अप्रत्यक्ष अंदाज बांधण्याचा एक मार्ग असा आहे. एकूण उत्पादनामधून निर्यात वजा करावयाची, म्हणजे घरच्या बाजारपेठेसाठी उपलब्ध होऊं शकलेल्या कॉफीचा अंदाज येतो. पुढील कोष्टकांत कॉफिच्या खपाचे अंदाजी आकडे ४ थ्या उभ्या ओळींत दिलेले आहेत. वार्षिक निर्यातीचे आंकडे उत्पादनाच्या आकड्यांच्या वेगानेंच वाढलेले नसल्यामुळें घरच्या बाजारपेठेंतील खपाचा वेग वार्षिक उत्पादनाच्या वेगापेक्षा अधिक झालेला आहे. १९३८–३९ ते १९४८-४९ ह्या दशकांत देशांत खपलेल्या कॉफीचें प्रमाण १२१ टक्क्यांनीं वाढलें. खप ८,६६६ टनांपासून १९,१८३ टनापर्यंत वाढला. हा खपाचा वेग १२ टक्क्यांपेक्षा अधिक होतो. १९४८ ते १९५९ ह्या दुसऱ्या दशकांत कॉफीच्या खपाचा सरासरी वार्षिक वेग ९ टक्क्यांपर्यंत खालीं आलेला दिसतो. पण गेल्या पांच वर्षांत कॉफीच्या खपांत झालेली वाढ पूर्वीच्या कोणत्याहि कालांतील वाढीपेक्षा अधिक आहे. १९५३–५४ सालीं कॉफीचा वार्षिक खप २०,२६२ टन होता. तो १९५८–५९ सालीं ३७२८० टनापर्यंत आला. म्हणजे कॉफीचा खप गेल्या पांच वर्षांत ८४ टक्क्यांनीं अथवा दरसाल १६ टक्क्यांपेक्षा अधिक वाढला. हा वेग भीतिप्रद आहे. निर्यातीला अधिक उत्तेजन देऊन खपाच्या वाढीचा वेग कमी करण्यांत आला पाहिजे. कॉफीच्या खपाची वाढ दरसाल सरासरी ६ टक्क्यांपेक्षा अधिक होणें युक्त नाहीं. पुढील दोन दशकांत कॉफीच्या उत्पादनाचा वेग दरसाल ८ टक्क्यांनीं वाढेल असें दिसत आहे. हा अंदाज खरा ठरला तर १९६० सालीं कॉफीचें एकूण उत्पादन १,२०,००० टनांच्या आसपास जाईल. वर म्हटल्याप्रमाणें देशांतर्गत खपाचा वेग ६ टक्क्यांच्या जवळपास राहिल्यास देशांतील एकूण मागणी ८०,००० टनांपेक्षा अधिक असणार नाहीं. असें झालें तर ४०,००० टन कॉफी निर्यातीसाठी मिळूं शकेल भारताच्या पुढील पंचवार्षिक कार्यक्रमासाठी परदेशी चलनाची एकसारखी वाढती गरज लागेल. ती पुरविण्यासाठी कॉफीच्या निर्यातीचें वरील अल्पसें उद्दिष्ट गांठणें फारच आवश्यक आहे.

जगांतील कॉफी पिकविणारे देश अधिकाधिक एकत्र येत आहेत. त्यामुळें कोणत्याहि भागांतील कॉफी पिकविणाऱ्या देशांत होणाऱ्या घडामोडींचा इतर उत्पादक देशांवर परिणाम झ ल्याशिवाय रहात नाहीं. सर्व जगभर कॉफीच्या उत्पादनांत वाढ होत आहे आणि कॉफीच्या किंमती झपाट्यानें उतरत आहेत. ह्या दोन अर्थपूर्ण घटनांमुळें कॉफीचें प्रत्यक्ष उत्पादन करणारे लोक आणि देश ह्यांच्यांत अस्वस्थता पसरल्यास नवल नाहीं. दुसऱ्या महायुद्धापूर्वी भारतामधील कॉफीचें उत्पादन सुमारें १८,००० ते २०,००० टन होतें. आतां तें ४४,००० टनांपर्यंत वाढलेलें आहे. अर्थातच गेल्या कांहीं वर्षांत कॉफीच्या निर्यातीचा व्यापारहि हळूहळू वाढत चालला आहे. १९५५ आणि १९५८ ह्या कालांत कॉफीच्या निर्यातीची किंमत २·४ कोटी रुपयांवरून ७·२ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. १९४८ पासून १९५२ पर्यंत भारत सरकार कॉफीच्या निर्यातीला उत्तेजन देण्यास उत्सुक होतें; इतकेंच नव्हे तर निर्यात करण्याचा आग्रहच सरकारनें धरला होता. पण १९५३ मध्यें ह्या धोरणांत बदल करण्यांत आला आणि देशांतील बाजारपेठेवर अधिक लक्ष केंद्रित करण्यांत आलें. त्यानंतर अलीकडे पुन्हा धोरणांत बदल करण्यांत आला व तें पुन्हा दुसऱ्या टोंकाला

**कॉफीच्या धंद्याची प्रगति दर्शविणारें कोष्टक**
**(सर्व आकडे टनांचे)**

| हंगाम | एकूण उत्पादन | निर्यात | अंतर्गत खपासाठीं राहिलेली |
|---|---|---|---|
| १९३८–३९ | १७,९०० | ९,२४० | ८,६६६ |
| १९३९–४० | १५,५४६ | ८,४०० | ७,१४६ |
| १९४०–४१ | १४,२२६ | २,६१६ | ११,६१० |
| १९४१–४२ | १७,८८६ | ६,००४ | ११,८८२ |
| १९४२–४३ | १६,२५७ | ३,३१३ | १२,९४४ |
| १९४३–४४ | १७,२४० | १,६९२ | १५,५४८ |
| १९४४–४५ | १७,३०० | १,२६० | १६,०४० |
| १९४५–४६ | २५,५०० | ५,३७७ | २०,१२३ |
| १४४६–४७ | १५,३५० | २,२३५ | १३,११५ |
| १९४७–४८ | १५,८०० | ३ | १५,७९७ |
| १९४८–४९ | २२,३०० | ३,११७ | १९,१८३ |
| १९४९–५० | २०,५२० | ३,८९४ | १६,६२६ |
| १९५०–५१ | १८,८९३ | ३०५ | १०,५८८ |
| १९५१–५२ | २१,५७६ | २,२३५ | १९,३४१ |
| १९५२–५३ | २३,९४३ | ३,०४८ | २०,८९५ |
| १९५३–५४ | ३०,०२९ | ९,७६७ | २०,२६२ |
| १९५४–५५ | २५,४२७ | ३,५९२ | २१,८३५ |
| १९५५–५६ | ३५,०२८ | ८,०८२ | २६,९४६ |
| १९५६–५७ | ४२,६७४ | १५,४७२ | २७,२०२ |
| १९५७–५८ | ४४,४०० | १४,२८१ | ३०,११९ |
| १९५८–५९ | ४५,४३० | ८,१५० | ३७,२८० |

नेण्यांत आलें. आतां सरकारला पुन्हा कॉफीची निर्यात वाढवावयाची आहे. पण सध्या निर्यातीच्या बाजारपेठांत कॉफीच्या किंमती घसरल्या आहेत. गेल्या दोन दशकांत कधींहि झालेला नव्हता एवढ्या मोठ्या प्रमाणांत कॉफीचा पुरवठा मागणीपेक्षा अधिक झालेला आहे. त्यामुळें मोठा धोका उत्पन्न झाला आहे. जागतिक बाजारपेठेंतील परिस्थिति भारताला प्रतिकूल आहे हें उघड होत आहे. त्यामुळें सरकारनें ह्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी व तीवर उपाय सुचविण्यासाठी एका तज्ज्ञांच्या कमिटीची नुकतीच नेमणूक केली. कमिटीनें आपला अहवाल सादर केल्याचें समजतें. कॉफीची विक्री, कारभार आणि सामान्य धोरण ह्या बाजूंवर अहवालांत बराच प्रकाश टाकलेला असण्याचा संभव आहे. खरी परिस्थिति अशी आहे कीं, निर्यात करण्यासारखा कॉफीचा साठा जितका अधिक असेल तितक्या प्रमाणांत कॉफीच्या उत्पादकाला अधिक तोटा सहन करावा लागेल अगर उत्पादकाचें नुकसान होऊं न देण्यासाठी भारतीय ग्राहकाला अधिक किंमत तरी द्यावी लागेल. गेल्या दहा वर्षांत देशांतील कॉफीच्या किंमती जागतिक किंमतीच्या पातळीखाली ठेवणें बऱ्याच प्रमाणांत शक्य झालें होतें. शिल्लक कॉफीची निर्यात करून जें जादा उत्पन्न मिळालें त्यामुळें असें करणें शक्य झालें. पण आतां जागतिक किंमती खूप घसरल्यामुळें दोन्ही पातळींमधील फरक नाहींसा होऊं लागला आहे. कॉफीचा शिल्लक पुरवठा वाढलेला असल्यामुळें निर्यातीच्या बाजारपेठांतून भारताच्या कॉफीला आपलें बस्तान बसवावयाचें असेल तर कॉफीचा दर्जा, पुरवठ्याचा नियमितपणा व चढाओढीच्या किंमती ह्यांकडे लक्ष देण्यांत आलें पाहिजे. सध्या भारताची कॉफी २५ ते ३० बाजारपेठांतून विकली जाते. त्यांपैकी १५ बाजारपेठा महत्त्वाच्या आहेत. १९३८ सालीं भारताच्या कॉफीचें

पश्चिम जर्मनी हें सर्वांत मोठें गिऱ्हाइक होतें. त्या सालीं पश्चिम जर्मनीनें भारताच्या एकूण निर्यातीच्या ३० टक्के कॉफी घेतली. १७ कॉफीची किंमत २.२ कोटी रु. झाली. अलीकडे जपानमध्यें कॉफीचा खप व वापर खूपच वाढूं लागलेला आहे. पण वाजवी किंमतीच्या अभावीं जपानच्या बाजारपेठेंत भारताला फारसा पाय रोवतां आलेला नाहीं. कॉफीच्या निर्यातीमुळें भारताच्या परदेशीय चलनाच्या साठ्यांत बरीच भर पडेल हें मुद्दाम सांगण्याचें कारणाच नाहीं.

---

## बँकांतील गमती—जमती

◆ एक तरुणी बँकेंत गेली. तिथें तिला एक फॉर्म भरावयाचा होता. त्या फॉर्ममध्यें 'वय' असा उल्लेख होता. या ठिकाणीं ती तरुणी अडखळली. यावर बँकेचा कारकून पटदिशी म्हणाला, "बाईसाहेब, उगीच थांबण्यांत अर्थ नाहीं. जितकं थांबाल तितकं तें वाढतच जाणार, नाहीं का ?"

◆ एका मारवाड्यानें बँकेच्या मॅनेजरची भेट घेऊन त्याला म्हटलें, "मला एक रुपया कर्ज म्हणून पाहिजे आहे. त्याचें व्याज किती भरावें लागेल ?"

"वर्षास सहा पैसे" बँकेच्या मॅनेजरनें सांगितलें. "पण तारण म्हणून आपल्याला कांहीं वस्तु ठेवावी लागेल."

"माझ्याजवळ वीस हजार रुपयांचीं सेव्हिंग सर्टिफिकिटें आहेत, तीं चालतील का ?" मारवाड्यानें विचारलें.

"हो चालतील की !" मॅनेजर म्हणाले.

आवश्यक त्या कागदपत्रांवर सह्या झाल्या. मारवाड्यानें वीस हजार रु. चीं सेव्हिंग सर्टिफिकिटें तारण म्हणून ठेवलीं आणि एक रुपया कर्ज घेतलें.

एक वर्षानंतर तो बँकेंत गेला आणि कर्ज म्हणून घेतलेला रुपया त्यानें परत केला. सहा नवे पैसे व्याजादाखलहि त्यानें दिले आणि आपलीं सेव्हिंग सर्टिफिकिटें परत घेतलीं.

बँक मॅनेजर म्हणाले, "मला तुमच्या खाजगी व्यवहाराशीं कांहीं कर्तव्य नाहीं. पण तुमच्याजवळ इतक्या रकमेचीं सेव्हिंग सर्टिफिकिटें असतांना तुम्हीं एक रुपाया कर्जाऊ का घेतला ?"

"असें पहा साहेब, सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील एका खणाचें वर्षास भाडें दहा रुपये आहे. म्हणून मीं सहा नवे पैसे देऊन ही सर्टिफिकिटें सुरक्षित ठेवण्याची युक्ति काढली."

◆ अमेरिकेंतील आयोनिया नॅशनल बँकेंत एक ट्रॅव्हलिंग एजंट चेक वटवण्यासाठी आला. काउंटरवरच्या कारकुनानें त्याला, "आपल्याला ओळख द्यावी लागेल" असें सांगितलें. त्या एजंटानें आपलें तोंड उघडलें आणि तोंडाच्या आंतल्या बाजूस गोंदलेलें आपलें नांव दाखविलें. झालें ! ओळख पटली आणि त्या एजंटाला चेकचे पैसे मिळाले.

◆ लॉस एंजेलिसच्या पोलिसांनीं सिटिझन्स नॅशनल बँकेमध्यें घुसलेल्या रिचर्ड सेऊर नांवाच्या एका इसमास अटक केली. या इसमानें पोलिसाच्या कंबरेला असतो तसला पट्टा आपल्या कंबरेला बांधला होता आणि हातांत पिस्तुलहि घेतलें होतें. पिस्तुल रोखून त्यानें बँकेच्या कारकूनाकडून चलनी नोटा घेतल्या आणि तो पळूं लागला. इतक्यांत पोलिसांनीं त्याला पकडून त्याची झडती घेतली. त्या वेळीं, त्याच्या कंबरेला असलेला पट्टा मुलांच्या खेळण्यांतला होता आणि पिस्तुलहि प्लास्टिकचें होतें, असें आढळून आलें —अ. दा. भांबुरे


ही दीपावलि आमच्या सभासदांस, ठेवीदारांस आणि आश्रयदात्यांस सुखाची व समृद्धीची जावो।

गेलीं १७ वर्षे सतत प्रगतिपथावरील, ठेवीदार बंधूंच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बेळगांव तालुक्यांतील एकमेव सहकारी बँक

**दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव**

स्थापना ] तालुका : बेळगांव [ ७-११-१९४१

(१) अधिकृत शेअर भांडवल रु. १,००,०००
(२) वसूल शेअर भांडवल रु. ८७,४४५
(३) रिझर्व्ह फंडस् रु. ८८,०५७
(४) ठेवी रु. ९,८५,२००
(५) इन्व्हेस्टमेंटस् रु. ३,८१,०१९
(६) एकूण खेळतें भांडवल रु. १२,००,०००चे वर

★ आमच्या बँकेंतील सर्व ठेवीदारांस योग्य मोबदला मिळावा म्हणून ठेवींवरील व्याजाचे दर वाढविले आहेत.

★ याशिवाय दररोज नियमित बचत करण्याची संवय वाढावी म्हणून "संजीवनी दैनिक ठेव" या नांवाची एक अभिनव बचत योजना चालू केली आहे. या ठेव योजनेंत दररोज रु. ०.२५ नये पैशापासून कितीहि मोठी रक्कम भरतां येते. बँकेच्या विविध आणि वैशिष्ट्यपूर्ण सेवेंत ही बँक नेहमी अग्रेसर आहे.

★ भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था केली आहे.
★ या बँकेंत सर्व प्रकारचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात.

अधिक माहितीसाठी बँकेच्या कार्यालयांत सेक्रेटरीकडे समक्ष चौकशी करावी.

जी. एम्. दळवी, चेअरमन.



आमच्या असंख्य ग्राहकांना व हितचिंतकांना यंदाची दीपावलि सुख-समृद्धीची जावो !

**श्री वीरशैव को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर**

हेड ऑफिस : कोल्हापूर] स्थापना ४।२।१९४२ [शाखा : गडहिंग्लज

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. १,२५,००० |
| खपलेलें भांडवल | रु. १,२५,००० |
| रोख भरलेलें भांडवल | रु ६१,५०० |
| खेळतें भांडवल | रु. ८,३५,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) मे. एम्. बी. चौगुले (प्रेसिडेंट), (२) मे एस. व्ही. नष्टे (व्हा. प्रेसिडेंट), (३) मे. के. एस. कांबळी, (४) मे. डी. बी. खोत, (५) मे. डॉ. एस. एस. घाळी, (६) मे. व्ही. एस. डोईजड, (७) मे. एस. एन्. मिश्रकोटी, (८) मे. सी. जी. हंशेटी, (९) मे. एस. के. पट्टणशेट्टी, (१०) मे. एस. ए. देसाई, (११) मे. सी. एन्. आजरी, (चेअरमन सल्लागार मंडळ) (१२) मे. बी. के. डोईजड (चेअरमन सु. बोर्ड).

आकर्षक व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारून समाजांतील सर्व गरजू व पतवान व्यक्तींना माफक व्याजाच्या दरानें कर्जें दिलीं जातात.

भारतांतील सर्व व्यापारी पेढ्यांवरील चेक्स व ड्राफ्ट्स दिले जातात व वसुलीस घेतले जातात.

सर्व प्रकारचे अद्यावत बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी लिहा.

श्री. एम्. जी. जोटकर B. A. (HONS.), मॅनेजर.

# परदेशांकडून घेतलेल्या कर्जांची फेड

## मार्गांतील बहुविध अडचणी

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपुढील अनेक प्रश्नांपैकी, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी काढलेल्या कर्जांपैकी बऱ्याच मोठ्या कर्जांची करावी लागणारी फेड हा एक प्रमुख प्रश्न असल्याचें आतां सर्वमान्य झालेलें आहे. दुसऱ्या कार्यक्रमाच्या कालावधींत ८०० कोटी रुपयांची परदेशीय मदत लागेल असा अंदाज करण्यांत आला होता. प्रत्यक्ष मात्र दुसऱ्या कार्यक्रमाच्या पहिल्या तीनच वर्षांत परदेशांकडून १,०२६ कोटी रुपयांची मदत घ्यावी लागली आणि उरलेल्या दोन वर्षांसाठी आणखी ३०० कोटी रुपयांची मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी मिळालेल्या परदेशी मदतींपैकी १९३ कोटी रुपयांची रक्कम वापरली न गेल्यामुळें ती दुसऱ्या कार्यक्रमासाठी कारणी लावतां येईल. ही रक्कम जमेस धरून दुसऱ्या कार्यक्रमाचा गाभा अमलांत आणण्यासाठींसुद्धां १,५०० कोटी रुपयांची परदेशी मदत लागेल. मिळालेल्या कर्जांचा उपयोग करून घेण्याच्या कामीं बरीच दिरंगाई झाली ही गोष्ट खरी आहे. परंतु आतां कर्जांचा उपयोग करण्याची गति चांगलीच वाढेल असा अंदाज आहे. एकंदरींत दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस सुमारें १,३०० ते १,४०० कोटी रुपयांची परदेशीय मदत देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी वापरली जाईल असें दिसतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत बहुतेक सर्व कर्जें फेडावयाची मुदत भरत असल्यानें, कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या आयातीची तरतुद तिसऱ्या कार्यक्रमाला परदेशी चलन मिळवून करावी लागेलच. पण, त्याशिवाय मुदत भरणाऱ्या कर्जांच्या फेडीचीहि व्यवस्था करावी लागेल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी सुमारें २,१०० कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल असा तात्पुरता अंदाज करण्यांत आला आहे. त्यांपैकी ६०० कोटी रुपयांचें चलन पूर्वीच्या कार्यक्रमासाठी घेतलेलीं कर्जें व त्यावरील व्याज ह्यांची फेड करण्यासाठी लागणार आहे. भारताला पहिल्या दोन कार्यक्रमासाठी मिळालेल्या मदतींपैकी बराच मोठा भाग सरळ देणग्यांच्या अगर रुपयांत फेडण्याच्या कर्जांच्या स्वरूपाचा आहे. त्यामुळें आपल्यावर परतफेडीचा बोजा थोडासा कमी झालेला आहे. आणखी एक अनुकूलता अशी कीं रुपयांत फेडावयाच्या कर्जांची मुदत बरीच दीर्घ आहे. पब्लिक लॉ ४८० प्रमाणें मिळालेल्या कर्जांच्या मुद्दलाची रक्कम ४० वर्षांत परत करावयाची आहे. यू. एस. डेव्हलपमेंट लोन फंडांतून मिळालेल्या कर्जांची मुदत १५ पासून २० वर्षांची आहे. ह्या पृष्ठाखालील कोष्टकावरून कर्जफेडीबाबतच्या परिस्थितीची थोडक्यांत कल्पना येईल.

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी काढलेल्या कर्जांपैकी ३९ टक्के कर्जें आपणांस रुपयाच्या चलनांत फेडावयाचीं आहेत ही गोष्ट अनुकूल आहे हें खरें. पण म्हणून ही कर्जफेड सहज होण्यासारखी आहे असें मात्र नाहीं. परदेशीय चलन उभारण्याचा प्रश्न येथें उभा राहत नसला तरी देशांतर्गत पैसा कर्जफेडीसाठी मोकळा करण्याचा प्रश्न उत्पन्न होतोच. दुसऱ्या योजनेंतील पहिल्या कांहीं वर्षांचा अनुभव जमेस धरल्यास विकासकार्यासाठी देशांतील पैसा गोळा करणें ही गोष्ट तितकीशी सोपी नाहीं. चलनवृद्धीच्या परिस्थितींत तर ही गोष्ट विशेषच अवघड आहे. अर्थात् प्रश्नाच्या सोडवणुकीच्या दृष्टीनें हा प्रश्न परदेशीय चलन उभें करण्याच्या प्रश्नापेक्षा बराच सोपा आहे. कारण देशांतील घडामोडींवर नियंत्रण ठेवण्याचाच हा मुख्य प्रश्न आहे. तरीसुद्धां रुपयांत फेडावयाचीं कर्जें हा एक अवघड व जाचक प्रश्न आहे.

एखादी आर्थिक समस्या सोडविण्याच्या कामीं अगर ती अधिक बिकट करण्याच्या कामीं कांहीं अज्ञात घटना प्रभाव गाजवूं शकतात. कर्जफेडीसारख्या विविध अंगें असलेल्या प्रश्नांबाबत ही गोष्ट अधिकच खरी आहे. एखादा पावसाळा चांगला गेला तर त्यामुळें कर्जफेडीचा प्रश्न इतर कोणत्याहि कारणापेक्षा अधिक सुलभ होणें अगदीं शक्य आहे. व्यापाराची अनुकूल परिस्थिति, अगर मोठ्या तेलखाणीचा आढळ, अथवा सोप्या अटीवर दीर्घ मुदतीचीं कर्जें देणाऱ्या आंतरराष्ट्रीय विकास-संस्थेची स्थापना अशा कारणांनीहि कर्जफेड सोपी होणें शक्य आहे. त्यामुळें भारताच्या कर्जफेडीचें स्वरूप व बोजा ह्या दोन्ही बाबतींत मूलभूत फरक पडण्याचा संभव आहे. पण सध्या तरी अशा घटना 'अज्ञात' आहेत, आणि त्यांपैकी कांहींच्या बाबतींत तरी त्या आपल्याला अनुकूल अशाच ठरतील अशी हमी आज तरी देतां येणार नाहीं. ह्या 'अज्ञात' घटना सोडल्या तर भारताची कर्जफेडीबाबतची परिस्थिति विशेष उत्साहजनक

### मंजूर झालेली मदत


| | पहिली योजना | | दुसरी योजना* | |
|---|---|---|---|---|
| | एकूण मदत (कोटी रु.) | टक्केवारी | एकूण मदत (कोटी रु.) | टक्केवारी |
| (अ) परदेशीय चलनांत फेडावयाचीं कर्जें | १८४·०७ | ४८·७४ | ५३१·५५ | ५२·२० |
| (१) आय बी. आर. डी. | ३०·६९ | ८·१३ | १८३·७५ | १८·०५ |
| (२) परदेशीय सरकारें | १५३·३८ | ४०·६१ | २५५·७० | २५·११ |
| (३) इतर कर्जें | — | — | ९२·०९ | ९·०४ |
| (ब) रुपयांत फेडावयाचीं कर्जें | ३९·२८ | १०·४० | ३८६·१५ | ३७·९२ |
| (१) यू. एस. डेव्हलपमेंट लोन फंड | — | — | ८३·३३ | ८·१८ |
| (२) पी. एल. ४८० | — | — | २७०·६७ | २६·५८ |
| (३) इतर कर्जें | ३९·२८ | १०·४० | ३२·१५ | ३·१६ |
| (क) देणग्या | १५४·३४ | ४०·८६ | १००·२९ | ९·८८ |
| बेरीज | ३७७·६९ | १००·०० | १,०१८·२९ | १००·०० |

* ३१ जानेवारी १९५९ अखेर. ह्या कोष्टकांत भारतानें आंतरराष्ट्रीय नाणेनिधींतून घेतलेली ९६ कोटींची रक्कम धरलेली नाहीं.

आहे असें म्हणतां येत नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या तीन वर्षांत आपण ५५० कोटी रुपयांचें परदेशीय चलन वापरलें. अर्थात् कर्जफेडीशीं त्याचा संबंध नसला तरी ही शिल्लक आतां नाहींशी झालेली आहे. त्यामुळें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत कर्जफेडीचा प्रश्न अधिक बिकट झाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण आपद्प्रसंगीं वापरता येण्यासारखा एक अमोल आधार वरील वापरामुळें नाहींसा होणार आहे. दुसरें असें कीं, आयातीवरील निर्बंध आणि परदेशीय चलनावरील नियंत्रणें आजच अतिशय कडक आहेत. आपल्या औद्योगिक उत्पादनाची गति मंदावण्याचें प्रमुख कारण आयातीवरील कडक निर्बंध आहे, हें आतां मान्य करण्यांत आलें आहे. ह्याचा अर्थ असा कीं, आपल्या शस्त्रागारांतील आणीबाणीच्या वेळीं वापरतां येण्यासारखें आणखी एक अस्त्र आपण गमावून बसलों आहों. कर्जाच्या स्वरूपांत अगर भांडवल–गुंतवणुकीच्या स्वरूपांत परदेशी भांडवल मिळवून कर्जफेड करण्याचा तिसरा मार्ग आपणांस स्वीकारावा लागण्याचा चांगलाच संभव आहे. कर्जाच्या बाबतींत बोलावयाचें झालें तर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या गरजा परदेशी सरकारांच्या अगर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या द्वारां भागविल्या जातीलच अशी खात्री अजून देतां येत नाहीं. भांडवल–गुंतवणुकीबाबतहि परिस्थिति फारशी उत्तेजक नाहीं. कारण, विकासकार्यांत गुंतलेल्या इतर देशांपेक्षा अगर औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशांपेक्षा भारतांतच भांडवल गुंतविणें अधिक सुरक्षित व फायदेशीर आहे ह्यासंबंधीं भारतानें कांहीं फारसा चांगला पुरावा दिलेला नाहीं. तें कसेंहि असलें तरी परदेशी मदत परिणामकारक ठरावयाची असल्यास ती फार मोठ्या प्रमाणावर असली पाहिजे. शिवाय कर्जफेडीसाठी अशी मदत घेतल्यानें तिसऱ्या कार्यक्रमांतील कर्जफेड सोपी झाली तरी चौथ्या कार्यक्रमांत हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

कर्जफेडीसाठी लागणारें परदेशीय चलन मिळविण्याचा एक मार्ग म्हणजे निर्यात वाढविणें. तथापि निर्यात वाढविण्याच्या कुवतीलाहि मर्यादा आहेत. भारताच्या एकूण परदेशीय चलनाच्या उत्पन्नापैकीं अर्ध्यापेक्षा अधिक उत्पन्न चहा, ताग व सुती कापड ह्यांच्या निर्यातीमुळें मिळतें. पण गेलीं कांहीं वर्षें ह्या मालाची निर्यात फारशी वाढलेली नाहीं. जागतिक अर्थव्यवस्थेंत आज जे प्रवाह दिसून येत आहेत त्यांचा विचार करतां असें दिसतें कीं, निर्यात वाढविण्याच्या प्रश्नापेक्षा आहे तीच निर्यात टिकवून धरण्यासाठीच प्रयत्न करावे लागतील. निर्यातीचे वरील परंपरागत पदार्थ सोडल्यास एंजिनिअरिंगचा माल नव्यानें निर्यात होऊं लागलेला आहे. पण, एकूण निर्यातींत त्याचें प्रमाण इतकें अल्प आहे कीं, त्या मालाची निर्यात चौपटीनें वाढवूनहि आपल्या परदेशी चलनाच्या गरजेच्या मानानें फारशी प्राप्ति होणार नाहीं. त्यानंतर कॉफी, कातड्याच्या वस्तु, मँगेनीज आणि लोखंडाची माती हा निर्यातीचा माल उरतो. एकंदरीनें ह्या वस्तूंनीं गेल्या कांहीं कालांत निर्यातीच्या बाबतींत प्रगति केलेली आहे. पण ह्याचा अर्थ ह्या गटांतील सर्वच वस्तूंनीं अशी प्रगति केलेली आहे असें नाहीं. आपल्या निर्यात करण्याच्या कुवतीवर मर्यादा पडतात हें खरें असलें तरी निर्यातीबाबतचीं उद्दिष्टें गांठण्याचे सर्व प्रयत्न करण्यांत येत आहेत, असें मात्र नाहीं. ह्या अडचणींखेरीज तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांतील किंमतीचा प्रश्नहि महत्त्वाचा आहे. आयातीवर बसविण्यांत आलेलीं कडक नियंत्रणें, कामगारांच्या हितासाठी करण्यांत येत असलेले विविध प्रकारचे कायदे आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे तुटीच्या अर्थकारणाचा करण्यांत येत असलेला अवलंब ह्या सर्वांमुळें आपल्यापुढें चलनवृद्धीची हुकमत वाढून ठेवलेली आहे आणि चलनवृद्धीचें वातावरण हें निर्यात धाढविण्याला अगर खाजगी मालकीचें परदेशीय भांडवल देशांत आकर्षित होण्याला अतिशय अनुपकारक आहे. आपल्याला असलेल्या कर्जाची फेड करण्यासाठी वरील दोन गोष्टींवर आपण फार अवलंबून आहोंत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा एक मोठा दोष असा आहे कीं, त्यापुढील कार्यक्रमांच्या डोक्यावर त्यानें मोठ्या प्रमाणावर कर्जाचें ओझें टाकलेलें आहे. दुसऱ्या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाच्या गरजांचा अंदाज वाजवीपेक्षा कमी धरल्यानें हा दोष सहजच उत्पन्न झाला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ही चूक सुधारण्यांत येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

सांडू ब्रदर्स
सहर्ष जाहीर करीत आहेत
हीरक महोत्सव
१८९९ - १९५०
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
चेंबूर – मुंबई ३८

फिलिप्स फिलेटा
(बॅटरी रेडिओ)
मोठे आकर्षक कॅबिनेट, ४ कमी व्ययशक्तियुक्त व्हॉल्व्ह, शॉर्ट आणि मिडियम वेव्ह मिळतात, बॅटरीवर कमी ताण. अधिक संवेदनशील व उत्तम आवाज, उष्णकटिबंध हवामानाने रक्षित.

बीरसीए७७बी
किंमत रु. १९५/-
(कर वेगळे)
फिलिप्स
नॉवोसोनिक
रेडियो
आवाजाचें नवीन जग
अधिकृत फिलिप्स रेडिओ पोट विक्रेता
पूना म्युझिक सेन्टर
PSPO 71

# सहकारी शेतीचा अभिनव प्रयोग

## विचारवंतांचीं साधक–बाधक मतें

"सहकारी चळवळीचीं जीं ध्येयें व उद्दिष्टें आहेत, तींच सहकारी शेतीच्या द्वारांहि साध्य झालीं पाहिजेत. मुख्य म्हणजे सहकारी शेतीची कल्पना नवी नाहीं. सहकारी चळवळीइतकीच ती जुनी आहे. सहकारी चळवळीला लोकशाही वृत्तीचा आधार आवश्यक आहे व लोकशाही पद्धतीनेंच सहकारी शेतीचाहि प्रयोग आपल्या देशांत झाला पाहिजे. आर्थिक दृष्ट्या न परवडणाऱ्या जमिनीच्या तुकड्यांवरील शेती करणारे शेतकरी स्वयंस्फूर्तीनें एकत्र आले पाहिजेत आणि आपल्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनीं प्रयत्नशील झालें पाहिजे.

"शेतीसाठी नवीन उपलब्ध होणारी जमीन व्यक्तिगत शेतकऱ्याकडे गेल्यास तिची मशागत व उत्पादन यांना मर्यादा पडतील. जमिनीवर कमाल मर्यादा घातल्यानें जी जमीन उरेल तिचें काय करणार ? या विचारांतून मुख्यत: सहकारी शेतीच्या कल्पनेला चालना मिळाली आहे. जमीन, जमिनीवर राबणारे व साधनसंपत्ति यांना एकत्र आणून मोठ्या सलग जमिनी आधुनिक पद्धतीनें कसल्या, तर उत्पादनवाढ होईल. काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनानें सहकारी शेती हेंच भारतांतील कृषिव्यवस्थेचें अंतिम स्वरूप असल्याचें म्हटलें आहे. सहकारी शेती ही सहकारी चळवळींतील अत्यंत प्रगत अवस्था मानली गेली आहे. सहकारी शेतीचे योग्य प्रयोग आणि या प्रयोगांचा अभ्यास होण्याची गरज आहे." —श्री. वैकुंठभाई मेहता

* * * *

"भारतीय शेतीच्या पद्धतींत संपूर्ण बदल घडवून आणणाऱ्या सहकारी शेतीची घोषणा करण्याचें एखाद्या राजकीय पक्षाचें व्यासपीठ हें स्थळ नव्हे. विषय समजावून घेऊन, त्याचा अभ्यास करून आणि वस्तुस्थिति व अनुभव यांच्याशीं त्यांची सांगड घालून मगच धोरणें ठरविलीं पाहिजेत. सहकारी शेतीचें समर्थक सांगतात कीं, कुटुंबाद्वारें केलेली शेती वाईट नाहीं; पण सहकारी शेती अधिक चांगली! उत्साहाच्या भरांत सार्वत्रिक शेती म्हणून त्यांनीं सहकारी शेतीचा पुरस्कार चालविला आहे. वास्तविक आपल्या राज्यघटनेनें खाजगी मालमत्तेचा व व्यापार–व्यवसायाचा मूलभूत अधिकार मान्य केलेला आहे. मालमत्तेचें विकेंद्रीकरण त्यांत अंतर्भूत आहे. तेव्हां जमीन-सुधारणेची दिशा जास्तींत जास्त लोकांना जमीन मिळण्याचीच असावयास पाहिजे. जमीनसुधारणा घटनेंतील तत्त्वाशीं विसंगत असावयास नको. सहकारी शेतीच्या प्रचारांत हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, असें मला वाटतें. इतर व्यवसाय जसे लोकांना स्वतंत्रपणें करतां येतात, तसा कृषिव्यवसाय देखील करतां आला पाहिजे. प्रत्यक्ष जमीन एकत्रित न करतांहि सहकाराचे फायदे शेतकऱ्यांना मिळूं शकतील.

"ही गोष्ट मात्र खरी कीं, राष्ट्रीय साधनसामग्रीचा अधिकांत अधिक उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें जेथें आवश्यकता पडेल, तेथे एकाच प्रकारची शेती जमिनीच्या मोठ्या तुकड्यांत करावी लागेल. इजिप्तमध्यें असा प्रयोग झालेला आहे. सरकारी खर्चानें करण्यांत आलेल्या पाणीपुरवठ्याचा अपव्यय होऊं नये, म्हणून ही पद्धत स्वीकारण्यांत आली. पण ही आवश्यकता संपली कीं पुन्हा कौटुंबिक शेतीची परवानगीहि पाहिजे. विशिष्ट परिस्थितींत उत्पादनवाढ आणि शेतकऱ्यांचें कल्याण यासाठी संयुक्त सहकारी शेती हिताची ठरते असें दिसत असेल तेथें तो प्रयोग शेतकऱ्यांचें मन वळवून जरूर करावा. जर आपल्या शेतकऱ्याला एखादी गोष्ट पटवून दिली तर तो ती स्वीकारतो, हें गेल्या ६–७ वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालेलें आहे." —प्रा. द. गो. कर्वे

* * * *

"सहकारी शेती ही केवळ एक घोषणा आहे, असें मला वाटत नाहीं. आपल्याकडे छोट्या छोट्या गैरफायदेशीर जमिनींच्या तुकड्यांवर होणाऱ्या शेतीचें प्रमाण फार असल्यामुळें मनुष्यबळ व साधनसंपत्ति या दोन्हींचाहि अपव्यय होतो व उत्पादन वाढविण्याचा प्रश्न अत्यंत बिकट ठरतो. अशा स्थितींत जमिनींचे तुकडे एकत्र आणून सहकारी शेतीद्वारां त्यावर उत्पादन करणें ही नैसर्गिक गरज आहे. शेतकऱ्याच्याच कल्याणासाठी हें आवश्यक आहे. पण सहकारी शेतीची अंमलबजावणीच कठीच आहे. कांहीं प्रमाणांत तरी त्यासाठी दडपण आणावेंच लागेल. सहकारी शेतीचें आकर्षण निर्माण करावें लागेल आणि पुरेसें उत्पादन न देणाऱ्या शेतीवर बंधनें घालावीं लागतील. तसेंच प्रत्यक्ष व्यवहारांत हें सिद्ध करावें लागेल कीं, सहकारी शेती एकूण उत्पादनाच्या व दर एकरीं उत्पादनाच्याहि दृष्टीनें श्रेष्ठ आहे. हे दोन्ही उपाय स्वीकारले तरच सहकारी शेतीला पक्षविशिष्ट स्वरूप न येतां राष्ट्रीय चळवळीचें इष्ट स्वरूप प्राप्त होऊं शकेल. इंग्लंडमध्यें तर असा नियम आहे कीं, शेतीमध्यें जर किमान उत्पादनक्षमता दिसून आली नाहीं तर शेतकऱ्याला जमीन सरकारच्या ताब्यांत द्यावी लागते व सरकार दुसऱ्या कोणालाहि ती देतें.

"सहकारी शेतीचें केवळ शेतीचेंच अंग लक्षांत घेऊन चालणार नाहीं. अधिक उत्पादन हें जसें तिचें लक्ष्य हवें, त्याचप्रमाणें जें मनुष्यबळ वांचेल त्याला उद्योग देण्याची योजना हवी. म्हणून, केवळ सहकारी शेतीची योजना न करतां कृषि-औद्योगिक सहकारी पद्धतीची योजना करावी लागेल. भूमिहीनांचा प्रश्न केवळ भावनात्मक आवाहनानें सोडविण्याचा जो प्रयत्न आज करण्यांत येतो, त्यालाहि अशा रीतीनें तोंड देतां येईल." —प्रा. धनंजयराव गाडगीळ

* * * *

"जमिनींच्या लहान तुकड्यांमुळें उत्पादनवाढीच्या मार्गांत जी अडचण उपस्थित होत आहे, तिचा गंभीरपणें विचार व निरास जर आजच केला नाहीं, तर पुढें कदाचित् आपल्याला उत्पादनवाढीच्या प्रश्नाला तोंड देणें कठीण जाईल. कृषि-अर्थशास्त्राचा एक अनुभव लक्षांत घेतला पाहिजे कीं, साधारणत: २५ एकरांखालील शेती ही फिफायतशीर ठरत नाहीं. महाराष्ट्रांत पेशव्यांच्या काळीं शेतीचें सर्वसाधारण क्षेत्र ४१ एकर होतें. आज शेतांचे तुकडे पडून हातरुमालासारखे त्यांचे आकार झाले आहेत. ही गोष्ट आर्थिक व उत्पादनाच्या दृष्टीनें पथ्यकर नाहीं. इच्छा असो कीं नसो, छोट्या जमीनधारकांनीं संयुक्त शेती करणें अपरिहार्य झालें आहे. अमेरिकेंत जमीन भरपूर असल्यामुळें सहकारी शेतीची आवश्यकता भासत नाहीं. आजपर्यंत

आपल्याकडे उत्पादनवाढीचा प्रयत्न मुख्यत: जमीनधारकांना शेतीसाठी पैसा पुरवून करण्यांत आला. उत्पादनवाढीला पोषक अशी जमीनधारणा पद्धति अंमलांत आणण्याचा प्रयत्न आपण केला नाहीं. आतां मात्र काळाविरुद्ध शर्यत आपणांला खेळावी लागणार आहे व त्यासाठी शेतीची पद्धति बदलविणें भाग आहे.

"तेव्हां, सहकारी शेती हा केवळ घोषणेचा अथवा इच्छेचा प्रश्न राहिलेला नाहीं, हें आपल्या शेतकऱ्यांना समजावून सांगून त्यांच्या मनांतील गोंधळ दूर केला पाहिजे. लहान तुकड्यांतील उत्पादनावर जेथें एका कुटुंबाचें भागूं शकत नाहीं, तेथें औद्योगीकरणाबरोबर वाढणाऱ्या शहरी लोकसंख्येला अन्न पुरविण्याचा प्रश्न कसा सुटणार ? सहकारी शेती हा पुस्तकी पांडित्याचा विषय नाहीं. आजवर जो अनुभव आलेला आहे, तो सहकारी शेतीला पोषकच आहे. अवास्तव घाई करण्याचें कारण नसलें तरी सहकारी शेतीच्या व्यवस्थेला आवश्यक असें नेतृत्व (कार्यक्षम मॅनेजरच्या रूपानें) निर्माण करून जर आपण उत्पादनवाढीला पायबंद घालणारी जुनी पद्धति सोडून दिली नाहीं, तर भवितव्य कठीण आहे." —प्रा. पी. एन्. द्रायव्हर

* * * *

"सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी झाला नाहीं, असें सांगण्यांत येतें. पण हे प्रयोग योग्य रीतीनें संघटित करण्यांत आले नसावेत. म्हणून त्यावरून काढलेले निष्कर्ष निर्णायक समजतां येणार नाहींत. जमीन एकत्र करून व कसून शेतकऱ्यांनीं जीवनमान उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचीं उदाहरणेंहि या मुंबई राज्यांत पाहावयास सांपडतात. जमिन एकत्र करून उत्तम व्यवस्थेखालीं तिची मशागत केली आणि उत्पादन घेतलें तर शेतकऱ्यांचें व्यक्तिगत कल्याणच होईल."

"अविकसित राष्ट्रानें अशा योजना अंमलांत आणतांना अनेक प्रश्नांची सरमिसळ होते व त्यामुळें गोंधळ होण्याचा संभव असतो. भूमिहीनांचा, बेकारीचा, साधनसामग्रीचा, असे अनेक प्रश्न दृष्टीपुढें येतात. पण सहकारी शेतीचा मूळ उद्देश दृष्टीपुढें ठेवला, तर ही योजना पूर्ण व्यावहारिक आणि दूरदर्शीपणाची असल्याचें दिसून येईल. यामुळें अन्नोत्पादनाची राष्ट्रीय समस्या तर सुटेलच, पण पिळवणूकदेखील थांबेल."

"शेतीसाठी उपलब्ध होणाऱ्या नव्या जमिनीची व्यवस्था व लहान प्रमाणावरील जमीनधारणा या प्रश्नांकडे लक्ष देऊन आजच्या कृषिव्यवस्थेतील अनेकविध दोष दूर केले पाहिजेत. भारतीय शेतकऱ्याला हव्या असलेल्या कर्जापैकीं फक्त १० टक्के कर्जच त्याला मिळूं शकतें. बाकी ९० टक्के कर्जासाठी त्याला सावकाराचे उंबरठे झिजवून अवाच्या सवा व्याज भरावें लागतें आणि जमिनीपासून मिळणारा फायदा सावकारांच्या घशांत ओतावा लागतो. अशीं माणसें सहकारी शेतींत एकत्र आलीं तर सरकारी मदत त्यांना जास्त मिळेल व पिळवणुकीपासून तीं स्वत:चें संरक्षण करूं शकतील. शेती करणाऱ्या ७० टक्के कुटुंबाची ही गरज आहे. शेतकऱ्यांना हें सारें पटवून दिलें तर स्वयंप्रेरणेनें ते सहकारासाठी पुढें येतील. मुंबई राज्यांत ३ लक्ष एकर जमिनीवर आज नव्या पद्धतीनें भातशेती होत आहे. याचें कारण हेंच कीं, एरवी नुकसानींत येणारी शेती या पद्धतीनें फायद्यांत येऊं लागली, हें शेतकऱ्यांना कळून आलें. सहकारी शेती ही राष्ट्रीय गरज समजून तिचा अवलंब व्हावयाला पाहिजे." —डॉ. ए. यू. शेख

("तरुण भारता"नें दिलेला सारांश)


प्रगति-पथावरील

पुढचें पाऊल—

—बेळगांवच्या—

# दि मोटार ओनर्स

## म्यूच्युअल इन्शुअरन्स कंपनी लि० चें

दीपावलि सुमुहूर्तावर

भारताच्या राजधानींत

नवीन शाखेनें पदार्पण

आमचे असंख्य विमेदार, प्रतिनिधी आणि हितचिंतक यांना दीपावलि शुभेच्छा !!!

शाखा : मुंबई, कलकत्ता, मद्रास, बेंगळूर, हैद्राबाद, पुणें, अहमदाबाद, नागपूर, कोल्हापूर, नासीक, औरंगाबाद, राजकोट, लुधियाना, तिरुचिरापल्ली, विजयवाडा, मदुराई, कोईमतूर आणि दिल्ली.

क्रियाशील, उत्साही प्रतिनिधींना उत्कृष्ट संधि !



फोन नं. ३४२

# कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

हेड ऑफिस : शिवाजी रोड, कोल्हापूर

(ही दिवाळी आमच्या असंख्य चाहत्यांना व ग्राहकांना सुखाची व भरभराटीची जावो !)

★या बँकेंत गुंतविलेला पैसा सुरक्षित आहे; व शेतीस व सहकारी संस्थांना साह्यकारी आहे.

खपलेलें शेअर भांडवल :

| | |
|---|---|
| शेअर होल्डर्सनीं घेतलेलें | रु. १५,००,००० |
| मुंबई सरकारनें घेतलेलें | रु. १२,००,००० |
| एकूण | रु. २७,००,००० |
| एकूण ठेवी | रु. ८६,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. २ कोटी |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १ लाखावर |

जिल्ह्यांत ११ शाखा आहेत. शाहुपुरी शाखेंत लॉकर्सची सोय आहे. शाहु मार्केट यार्डांत शाखा काढल्यामुळें त्या भागांतील लोकांची बँकेची सोय झाली आहे. आकर्षक व्याजाच्या दरानें निरनिराळ्या स्वरूपाच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. उद्योग-व्यवसायाच्या वाढीकरितां नवीन शेअर्स काढलेले आहेत.

के. जी. आंबेकर,
मॅनेजर.

# रबराच्या उत्पादनांत वाढ झाली पाहिजे

## भारताच्या गरजा भागविण्यासाठी अजूनहि आयात करावी लागते

भारतांत रबराची लागवड मोठ्याल्या मळ्यांतून होण्यास च लू शतकाच्या प्रारंभीं सुरवात झाली. तेव्हांपासून रबराची लागवड हळुहळु वाढत जाता-जाता आज मळ्याच्या धंद्यापैकीं रबराचे मळे हा एक मोठा धंदा झाला आहे. देशाच्या नैऋत्य कोपऱ्यांत मुख्यत: केरळ राज्यांत हा धंदा केंद्रीभूत झाला आहे. केरळ राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेंत त्याला महत्त्वाचें स्थान आहे. कारण, प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या मळ्यांतून सुमारें एक लाख कामगार रोजंदारी करीत असावे असा अंदाज आहे. रबराच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने असणारे व शिवाय स्वत:चे रबराचे मळे असणारे जे थोडे देश आहेत त्यांत भारत हा एक देश आहे. गेल्या महायुद्धापर्यंत भारतांत तयार होणाऱ्या बहुतेक रबराची निर्यात करण्यांत येत असे. देशांत रबराच्या वस्तू तयार करणारे जे कारखाने होते ते कच्च्या रबराच्या एकूण उत्पादनाचा फारच थोडा भाग स्वत: वापरीत असत. युद्धकाळांत पूर्वीच्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत आला व कांहीं नवीन कारखाने उभारण्यांत आले. त्यामुळें रबराच्या कारखान्यांना देशांत तयार होणारे जवळजवळ सर्व कच्चें रबर स्वत:च्या उत्पादनासाठीं लागूं लागलें. युद्धानंतर रबराच्या वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांचा विस्तार चालूच राहिला आणि त्यांना अधिकाधिक प्रमाणांत कच्च्या रबराच्या पुरवठ्याची गरज भासू लागली पण, कच्च्या रबराचें उत्पादन वाढत्या मागणीस तोंड देण्याइतकें न वाढल्यानें वर्षानुवर्षे रबराचा तुटवडा वाढतच गेला. त्यामुळें कमी पडणारा रबराचा पुरवठा कृत्रिम अगर नैसर्गिक रबराची आयात करूनच दरवर्षी करावा लागत आहे. देशाच्या औद्योगिक विस्तारांत रबर ह्या वस्तुला महत्त्वाचें स्थान आहे ही गोष्ट सर्वांना माहीतच आहे. आणि औद्योगीकरणाचा वेग लक्षांत घेतां, येतीं कित्येक वर्षे रबराचा पुरवठा अपुरा राहणार आहे हें उघड दिसत आहे. रबराचें उत्पादन वाढविण्याचे तांतडीचे उपाय योजण्यांत आले तरच पुरवठा वाढण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ रस्त्यावर मोटारीच्या साह्यानें करण्यांत येणाऱ्या वाहतुकींत झपाट्यानें वाढ होत आहे. विशेषत: मोटारीच्या साह्यानें होणारी लांब पल्ल्यावरील मालाची वाहतूक वाढत चालली आहे. रस्त्यावरील वहातूक हा एक महत्त्वाचा धंदा असल्यानें रबराच्या कारखानदारांनीं त्या धंद्याच्या जरूर त्या गरजा भागविण्यासाठीं विस्ताराच्या मोठमोठ्या योजना हातीं घेतल्या आहेत. गेल्या सहा वर्षांत मोटारींना लागणाऱ्या ट्यूबसचें व टायर्सचें उत्पादन १३·८ लाखांवरून १८·६ पर्यंत वाढलें आहे. सायकलींचा धंदाहि वेगानें वाढत चालला आहे. त्यामुळें सायकलींना लागणाऱ्या टायर्सची व ट्यूब्सची मागणी वेगानें वाढत आहे. ही मागणी पुरविण्यासाठीं सायकलींच्या ट्यूबसचें व टायर्सचें उत्पादन वाढविण्यांत आलें आहे. १९५२ सालीं ८३·५ लाखांवर ट्यूब्सचें व टायर्सचें उत्पादन करण्यांत आलें होतें. तें आतां सुमारें १ कोटी ४० लाखांपर्यंत होऊं लागलें आहे. तरीसुद्धां पुरवठ्याच्या मानानें मागणी जास्तच आहे. ट्रॅक्टर्सना लागणाऱ्या ट्यूबसच्या व टायर्सच्या उत्पादनांत ९ पटीनें वाढ झालेली आहे. ९,३३६ पासून हा आकडा आता दरसाल ८९,१५० पर्यंत आला आहे. भारतांत ट्रॅक्टर्स व माती ढकलणारीं यंत्रें अधिकाधिक वापरण्यांत येऊं लागलीं आहेत. अर्थातच रबराच्या कारखान्यांना विस्तार करण्याचें एक मोठें क्षेत्र नव्यानें उपलब्ध झालेलें आहे. ह्या मोठमोठ्या वस्तूंशिवाय रबराच्या अनेक प्रकारच्या वस्तू लोकांना व उद्योगधंद्यांना लागत असतात. त्यांची मागणीहि एकसारखी वाढतच आहे. म्हणून ह्याहि बाबतींत रबराच्या कारखान्यांना विस्तार करण्यास वाव आहे.

तेव्हां मुख्य प्रश्न असा आहे कीं, रबराच्या कारखानदारांना लागणाऱ्या कच्च्या रबराचा पुरवठा कसा करावयाचा ? पुरवठा अपुरा असल्यामुळें कारखानदारांना रबराच्या आयातीवर अवलंबून राहणें भागच पडतें. रबराची आयात अधिक करा-



वयाची म्हटलें तर भारताला त्यासाठी अधिक परदेशीय चलनाची गरज लागेल. सध्यांच्या परिस्थितीत तर परदेशीय चलनाची टंचाई बरीच भासत आहे. गेल्या वर्षी, म्हणजे १९५७ सालीं, भारताला आपल्या रबराच्या आयातींत ५० टक्क्यांनीं वाढ करावी लागली. अंतर्गत उत्पादन अपुरें पडल्यामुळें रबराची आयात ६,४६३ टनांवरून ९,६७१ टनांपर्यंत वाढवावी लागली. १९५८ सालींहि रबराच्या आयातींत आणखी वाढ करण्यांत आली. कारण देशांतील उत्पादनाचा वेग खपाच्या वेगापेक्षा कमी आहे. तसाच कांहीं प्रसंग उद्भवल्यास भारताला ह्यापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर रबराची आयात करावी लागेल आणि तीहि गेल्या कांहीं महिन्यांत दिलेल्या किंमतींपेक्षा अधिक किंमती देऊन. मलायांतील रबराच्या बाजारपेठेंत सर्व प्रकारच्या रबराला वाढती मागणी येत असून अमेरिका, ब्रिटन, रशिआ, चीन व कांहीं युरोपीय देश मोठ्या प्रमाणावर रबराची खरेदी करीत असतात. त्यामुळें साहजिकच रबराच्या किंमती बऱ्याच वाढलेल्या आहेत. भारतामधील वाढत्या मागणीस तोंड देण्यासाठी डनलॉप कंपनीच्या कलकत्ता येथील व मद्रास येथील कारखान्यांचा विस्तार करण्यांत येत आहे. मुंबईच्या फायरस्टोन कंपनीनें आपली विस्ताराची योजना पार पाडून उत्पादनाला प्रारंभहि केला आहे. १९५९ च्या दुसऱ्या सहामाहीपासून ह्या तीन कारखान्यांनाच पूर्वीपेक्षा ८,००० टन अधिक कच्च्या रबराची गरज लागू लागली आहे. त्याशिवाय इतर कारखान्यांकडून येणारी वाढती मागणी वेगळीच. १९५६ पासून भारतांत रबराचा खप एकसारखा वाढत चाललेला आहे. १९५६ सालीं २८,९९६ टन रबराचा खप झाला होता, १९५७ सालीं ३०,८८५ टन रबराचा खप झाला आणि १९५८ सालीं पहिल्या आठ महिन्यांतच २२,८७१ टन रबराचा खप झाला. ह्यावरून टायर्स तयार करणाऱ्या कारखान्यांचा विस्तार कसा होत चालला आहे, तें कळून येण्यासारखें आहे. पण देशांतील कच्च्या रबराचें उत्पादन मात्र त्या मानानें वाढलेलें नाहीं. १९५६ सालीं २३,४४७ टन रबराचें उत्पादन करण्यांत आलें, १९५७ सालीं २३,७९७ टन रबर निर्माण करण्यांत आलें, आणि १९५८ च्या पहिल्या आठ महिन्यांत अवघें १३,६७१ टन रबराचें उत्पादन झालें. केरळमधील रबराच्या मळ्यांत झालेले संप आणि मलायामधून अधिक रबर देणाऱ्या रबराच्या बियाणांची आयात करण्याच्या कामीं झालेला विलंब लक्षांत घेतां, रबराच्या उत्पादनावर वाईट परिणाम होण्याचा संभव दिसत आहे. येत्या तीन-चार वर्षांत रबराचा पुरवठा व मागणी ह्यांच्यामधील तफावत आणखी बरीच वाढण्याचा संभव आहे. १९६१ सालीं सुमारें ६०,००० टन रबर लागेल असा अंदाज आहे. उत्पादन मात्र २६,००० टनांच्या जवळपास होईल. इतकी मोठी तफावत भरून काढण्यास आयातीशिवाय दुसरा मार्गच नाहीं. पण आयात केलेल्या प्रत्येक टन रबरासाठीं भारताला ३,००० रुपयांचें परदेशीय चलन द्यावें लागतें.

१९५८ च्या पहिल्या नऊ महिन्यांत मलायामध्यें रशिआनें २०,९१८ टन रबर खरेदी केलें. १९५७ च्या ह्याच नऊ महिन्यांच्या काळांत रशियानें अवघें ७,४२६ टन रबर खरेदी केलें होतें. चीननेंहि ह्याच कालखंडांत १९५७ मध्यें ४,६२१ टनांची खरेदी केली होती, ती १९५८ मध्यें ६४,३०६ टनाची केली. ह्या मोठ्या खरेदीमुळें जगांतील इतर


" शुभचिंतन "

चालू दीपावलि व नवीन वर्ष सर्व भारतीयांना सुखाचें व भरभराटीचें जावो.

**वामन गणेश हरचेकर, प्रायव्हेट लिमिटेड**

चांदी, सोनें व जवाहिराचे व्यापारी.

आमच्या नांवाच्या चोख ९७ नं. सोन्याच्या "अंजलि" छाप ।, ॥ व १ तोळा वजनाच्या लगडी नेहमीं तयार मिळतात.

केळकर रोड, दादर, मुंबई नं १८. [ टेलिफोन नं. ६०४२८

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो।

# दी बँक ऑफ औंध लि.

(सरकारी कंपनी) (स्थापना : १९१८)

हेड ऑफिस :—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा शहर.

शाखा :—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... ... | रु. १,४१,००० |
| वसूल भांडवल | ... ... | रु. १,३०,५०० |
| रिझर्व्हस् | ... ... | रु. १,०६,००० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. १४,००,००० |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल्. बी. वकील, सातारा.

श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल्. बी. वकील, सातारा.

डॉ. माधव दत्तात्रय बोकील, एल्. सी. पी. अँड एस्. डी. ओ. एम्. एस्. (मुंबई).

श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

श्री. रंगराव पांडुरंग शालगर, बी. एस्सी., व्यापारी, सातारा.

मे. कलेक्टर, उत्तर सातारा, मुंबई सरकार प्रतिनिधि.

मे. डेप्युटी रजिस्ट्रार, को-ऑप. सोसायटीज्, पुणें. मुंबई सरकार प्रतिनिधि.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

खालील वाढलेल्या दरानें मुदतठेवी स्वीकारण्यांत येतात

१ वर्ष—३॥ टक्के, ३ वर्षें—४ टक्के, ५ वर्षें—४॥ टक्के, ७ वर्षें—४॥ टक्के, १० वर्षें—५ टक्के.

मुंबई, पुणें, अहमदाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, बंगलोर, भिवंडी, नागपूर, हुबळी, कोपरगांव, वगैरे प्रमुख ठिकाणांवर माफक दरांत ड्राफ्ट दिले जातात.

**शेअर्स व गव्हर्मेंट सिक्युरिटीजची खरेदी-विक्री केली जाते.**

विशेष माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

बा. वा. घमंडे C. A. I. I. B. मॅनेजर. न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.

भागांत खप कमी झाला तरी त्याचा फारसा परिणाम झाला नाहीं. इतर भागांतील कमी खपामुळें रबराचा खप अवघा १७,५०० टनांनीं कमी झाला. रशिया सोडून जगांतील इतर खप १२,५७,००० टनांपर्यंत खालीं आला. अमेरिकेंतील खप ३,६४,५६१ टनांवरून ३०,१,४०७ टनापर्यंत घसरला वे ब्रिटनमधील खप १,१५,४१६ टनांवरून १,१३,८१६ टनांपर्यंत आला. पूर्व युरोपांत कृत्रिम रबराचे नवे कारखाने उभारण्यांत आले असतांनासुद्धां रशिआनें रबराची एवढी मोठी खरेदी केली. ह्यावरून कम्युनिस्ट राष्ट्रगटांतर्गत देशांत रबराच्या बाबतींत स्वयंपूर्णता आलेली नाहीं असा अंदाज करण्यांत येत आहे. कृत्रिम रबराच्या वापरांत व खपांत गेल्या चार–पांच वर्षांत लक्षांत भरण्यासारखी वाढ झालेली दिसून येते. १९५५ सालीं कृत्रिम रबराचा खप दरसाल अवघा १०० टन होता. आतां तो दरसाल ३,००० टनांच्या आसपास गेला आहे. भारताला लागणारें सर्व कृत्रिम रबर अमेरिकेकडून आयात करण्यांत येतें. नैसर्गिक रबराच्या खपांत झालेली घट अंशतः मुख्यतः अमेरिकेंतील औद्योगिक मंदीमुळें झालेली असणें शक्य आहे. तथापि नैसर्गिक रबराऐवजीं कृत्रिम रबर वापरण्याच्या पद्धतीमुळेंहि बऱ्याच प्रमाणांत अशी घट झालेली आहे ह्यांत शंका नाहीं. अमेरिकेंत करण्यांत आलेल्या अंदाजाप्रमाणें १९५८ सालीं नैसर्गिक व कृत्रिम अशा दोन्ही प्रकारच्या रबरांचा खप ३० लाख टन झाला असावा. १९५७ सालीं रबराचा खप सरासरी इतकाच झाला होता. जगांतील रबराचें एकूण उत्पादन ३५ लाख टनांच्या जवळपास असावें. १९६२ च्या सुमारास उत्पादन ३० टक्क्यांनीं वाढून ४४ लाख टनांपर्यंत जाईल असें दिसतें. पण ह्या वाढींतील बहुतेक सर्व वाढ कृत्रिम रबराची असण्याचाच संभव अधिक आहे. मलाया व रबराचे इतर उत्पादक देश ह्यांनीं नैसर्गिक रबराच्या अधिक उत्पादनाच्या बाबतींत प्रगति केलेली आहे, पण ती लक्षांत घेण्यासारखी नाहीं. इंडोनेशिआंतील रबराचें उत्पादन घटत आहे. त्यामुळें नैसर्गिक रबराच्या उत्पादनाच्या बाबतींत इतर देशांनीं केलेली प्रगति लंगडी पडण्याची शक्यता आहे.

१९५७ सालीं रबराच्या किंमतींत घट होऊं लागली व ती १९५८ सालींहि चालूच राहिली. त्यामुळें नैसर्गिक रबराला कृत्रिम रबराशीं स्पर्धा करण्याच्या बाबतींत अधिक अनुकूल परिस्थितीचा लाभ झाला. मोठ्या, जड टायर्स तयार करण्याच्या कामीं कृत्रिम रबरापेक्षा नैसर्गिक रबर अधिक उपयुक्त ठरतें असें म्हणतात. रबराच्या एकूण किंमतींत टायर्सला लागणाऱ्या रबराचा भागच सर्वांत अधिक असतो. पण कृत्रिम रबराच्या उत्पादनाच्या बाबतींत आतां कितीतरी तांत्रिक सुधारणा झाल्या आहेत. कृत्रिम रबराचें उत्पादन कांहीं खास उपयोगासाठा करण्यांत येतें. त्यामुळें केवळ लष्करी दृष्टि सोडून दिली तरीहि कृत्रिम रबराच्या उत्पादनाचे कारखाने असणे आवश्यकच ठरतें. नैसर्गिक रबराच्या किंमती इतक्या खाली आल्या पाहिजेत कीं, रबराचा वापर करणाऱ्याला नैसर्गिक रबर वापरण्यांत चांगलाच फायदा आहे हें पटलें पाहिजे. त्या तशा खालीं आल्या नाहींत तर कृत्रिम रबर वापरण्याच्या सध्यांच्या प्रवृत्तीला उलटी दिशा लागणें फारसें शक्यतेच्या कोटींत नाहीं. नैसर्गिक रबराची मागणी वाढण्याची शक्यता त्या रबराच्या वापरांत किती वाढ होते त्यावरच सामान्यतः अवलंबून राहील. कृत्रिम रबराऐवजीं नैसर्गिक रबर वापरण्याच्या प्रवृत्तीवर ही गोष्ट फारशी अवलंबून नाहीं. भारताची अर्थव्यवस्था विकास पावत आहे. अर्थातच रबराची मागणी एकसारखी वाढतच जाणार आहे. ह्या दृष्टीनें रबराच्या धंद्याला चांगलें भवितव्य आहे. पण उत्पादनाच्या वाढत्या किंमतीमुळें नफ्यावर परिणाम झालेला आहे. सरकारनें १०० पौंड रबराची किंमत अवघी रु. १५५·७५ ठरवून दिलेली आहे. गेलीं कांहीं वर्षें हीच किंमत बाजारांत आहे. रबराच्या मळ्यांना स्वतःच्या पायावर उभें करण्यासाठी रबराच्या वरील किंमतीचा फेरविचार होणें अगत्याचें आहे. देशांत कृत्रिम रबराचा संकल्पित कारखाना उभारण्यांत आला तरीसुद्धां नैसर्गिक रबराचा वापर करून तयार करण्यांत आलेल्या वस्तूंचा पुरवठा गरजेपेक्षा कमीच राहील. रबराच्या मळेवाल्यांचें असें ठासून सांगणें आहे कीं, रबराच्या उत्पादनाच्या किंमतीची टॅरिफ कमिशनकडून फेरतपपासणी होणें आणि त्याच्या किंमतींत वाढ करणें फार काळ लांबणीवर टाकता येण्यासारखें नाहीं. रबरासाठी वाजवी किंमत ठरविण्यांत आली नाहीं तर रबराच्या मळेवाल्यांना उत्पादन वाढविण्यास उत्साह वाटणार नाहीं. म्हणून नैसर्गिक रबराच्या उत्पादनांत वाढ होण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. रबराची किंमत वाजवी पातळीवर आणली पाहिजे. म्हणजे उत्पादकांना उत्पादन वाढविण्यास व नवीन लागवड करण्यास उत्तेजन मिळेल व रबराच्या कारखानदारांना लागणारें रबर मोठ्या प्रमाणावर पुरविणें त्यामुळें शक्य होईल.


## शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर, पुणे ४.

फोन नं. ७९८६

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.
[२] सर्वांनीं वाखाणलेलें.
[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली
[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच.
[५] स्वच्छता, टापटीप, कटाक्षानें ठेवली जाते.
[६] हवेशीर खोल्या, व प्रत्येक खोलींत पंखा.

शिवाजीराव शिरोळे
व्यवस्थापक

पत्रानें आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.

# परदेशी भांडवलदारांना वाटणारी भीति

## हमीच्या योजनेची मागणी

सद्‌गुण आणि मातृत्व, ह्याप्रमाणें परराष्ट्रांतील भांडवलाच्या गुंतवणुकीला सर्वचजण पाठिंबा देतात. पण, परदेशांत पैसे गुंतविण्याचें धाडस करणारांना उद्याची सुद्धां खात्री वाटत नाहीं! परदेशांतील गुंतवणुकीचे पोवाडे आतां सर्व देशांतून गाण्यांत येत आहेत. "आपल्या प्रजासत्ताक राष्ट्रानें परराष्ट्रीय भांडवलदाराला तात्काळ आवाहन केलें पाहिजे," असें अर्जेंटिनाचा उपाध्यक्ष म्हणाला होता, आणि अध्यक्ष हें आवाहन आकर्षक करण्याच्या प्रयत्नाला लागला आहे. मलायाच्या पंतप्रधानाचें आवाहनहि असेंच आवर्जून केलेलें आहे. "परदेशांतून येणाऱ्या भांडवलामुळें स्थानिक राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला धक्का पोंचण्याची भीति आशियांतील लोकांनीं टाकून दिली पाहिजे". असें तो म्हणतो. भारताच्या उद्योगमंत्र्यांनीं स्पष्टच सांगितलें आहे कीं, भारताच्या औद्योगिक प्रगतीस मित्रराष्ट्रांच्या सरकारांची व त्यांच्या नागरिकांची खासगी मदत फार मोठ्या प्रमाणावर साहाय्यकारक झाली आहे. "उद्योन्मुख औद्योगिक राष्ट्राला परदेशी मदत दीर्घ काळ चालू राहला हवी. भारतांत भांडवल गुंतविणाऱ्या देशांना आणि भारताला, दोघांनाहि विदेशी भांडवलाची मदत फायदेशीर होत रहावी, असेंच आमचें धोरण आहे."

हीं सर्व प्रोत्साहनात्मक आश्वासनें झालीं; पण प्रत्यक्ष घडून काय आलें? इजिप्तमधील राष्ट्रीयीकरणाचा अर्थ विदेशी उद्योगधंद्यावरील दरोडा ठरला! सुएझचा कालवा इजिप्तनें बळकावला! सिरिया आणि शेजारचे इतर देश ह्यांतून तेल वाहणारे नळ फोडून टाकण्याच्या धमक्या अधूनमधून चालूच आहेत. सिलोनमध्यें विदेशी उद्योगांवर डाव्या गटाच्या सरकारी दडपणाची संक्रांत आहे. इंडोनेशियांत सरकारनें डच उद्योगधंदे बळकावले, इतकेंच नव्हे तर जकार्ता सरकार कम्युनिस्ट नियंत्रणाखालीं जात चाललें आहे.

परदेशांत भांडवल गुंतविणाराला दीर्घकालीन सुरक्षिततेची हमी हवी; कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनीं साखर पेरून केलेलीं वक्तव्यें पुरीं पडणें अशक्य आहे. कायद्याचें पालन करण्याची जबाबदारी कशाशीं खातात, हें ह्या सरकारांना समजलें पाहिजे. "परदेशी हितसंबंधांना विदेशी भांडवलाची आयात करणारे देश योग्य प्रकारें, भेदाभेद न करतां वागवतील, अशी आंतरराष्ट्रीय योजना हवी; त्यांत बेकायदा हस्तक्षेप केला जाणार नाहीं, अशी हमी हवी", हरमान जे. ॲब्स ह्या सुप्रसिद्ध जर्मन बँकरनें असें स्पष्ट सांगितलें आहे. परदेशीयांना शिव्या देऊन राजसत्ता काबीज करणाऱ्यांचा आणि टिकविणाऱ्यांचा, परदेशी सरकार व नागरिक ह्यांचेशीं केलेले करार बेदरकारपणें मोडणाऱ्यांचा, स्टँडर्ड ऑइल कंपनीचे डायरेक्टर हॉवर्ड डब्ल्यू. पेज ह्यांनीं निषेध केला आहे. युनायटेड स्टेट्सनें खालील अर्थाचा जाहीरनामा काढावा, असें त्यांनीं सुचविलें आहे:—"जर एखाद्या सरकारनें स्वतः केलेला करार एकतर्फी रद्द केला, तर युनायटेड स्टेट्सचें सरकार एकटें, इतर देशांच्या सहकार्यानें किंवा संयुक्त राष्ट्र संघाच्याद्वारां, प्राप्त परिस्थितींत युनायटेड स्टेट्सला योग्य वाटतील ते आर्थिक उपाय योजायला आणि कुरापत काढणाऱ्या देशांशीं असलेले कुठलेहि करार रद्द करायला मोकळें असेल."

## भारतीय व इतर भाषांचे सोविएत शब्दकोश

### रशियाच्या सांस्कृतिक आघाडीची पूर्वतयारी

मराठी–रशियन शब्दकोशरचनेचें काम सोविएत युनियनमध्यें त्याचप्रमाणें आसामी व तेलगू या भारतीय भाषांच्या रशियन भाषेंतील शब्दकोशरचनेचें काम हातीं घेण्यांत आलेलें आहे. ३० हजार शब्द असलेला पंजाबी–रशियन शब्दकोश मॉस्कोंत प्रसिद्ध झाला आहे हा पहिलाच पंजाबी शब्दकोश रशियनमध्यें प्रसिद्ध होत आहे. या शब्दकोशरचनेच्या कामांत पंजाबी लेखक श्री. बलवंत गार्गी यांनींहि भाग घेतलेला आहे. लवकरच रशियन्–उर्दू शब्दकोश प्रसिद्ध होईल आणि तामीळ-रशियन शब्दकोशाचें कामहि हातीं घेण्यांत आलेलें आहे.

आग्नेय आशियांतील फिलिपाइन देशाची भाषा 'तागालोग' या भाषेचा शब्दकोशहि तयार करण्यांत येत आहे. ब्रह्मी व सिंहली भाषांचे शब्दकोशहि प्रसिद्ध करण्यांत येतील. येत्या कांहीं वर्षांत नेपाळी, थाई, काम्बोडियन व लाओ भाषांचे शब्दकोश रशियनमध्यें प्रसिद्ध होतील.

## सहकारी पत-पेढ्यांचें भाग-भांडवल

### सरकारचा वांटा ११ लाख रुपयांहून अधिक

सहकारी पत-पेढ्यांच्या भाग–भांडवलांत कांहीं हिस्सा देण्याच्या आपल्या धोरणास अनुसरून मुंबई सरकारनें, राज्याच्या निरनिराळ्या भागांतील २०४ सहकारी पत-पेढ्यांच्या भाग भांडवलांतील आपला वांटा म्हणून ११,७१,६०० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

जुनें मुंबईराज्य व मराठवाडा विभागांतील सहकारी पतपेढ्यांच्या भाग–भांडवलांतील सरकारी वांटा, मुंबईराज्य सहकारी बँक व पैसे पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्था यांच्यामार्फत देण्यांत येईल, तर विदर्भ विभागांतील सहकारी पत-पेढ्यांच्या बाबतींत तो वांटा विदर्भ सहकारी बँक, नागपूर आणि संबंधित पैसे पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्थांमार्फत देण्यांत येईल सौराष्ट्र आणि कच्छ विभागांतील सहकारी पतपेढ्यांच्या बाबतींत तो अनुक्रमें सौराष्ट्र राज्य सहकारी बँक आणि पैसे पुरविणारी मध्यवर्ती संस्था यांच्यामार्फत मिळेल.

## १९६० सालांतील सार्वजनिक सुट्या

मुंबई सरकारनें १९६० सालीं सार्वजनिक सुट्या पुढील दिवशीं जाहीर केल्या आहेत :—

न्यू ईअर्स डे (जानेवारी १); भारतीय गणराज्य दिन (जानेवारी २६); महाशिवरात्री (फेब्रुवारी २५); जमशेटजी नवरोझ (मार्च २१); गुढीपाडवा (मार्च २८); रमझान ईद (मार्च २९; रामनवमी (एप्रिल ५); महावीर जयंति (एप्रिल ९); गुडफ्रायडे (एप्रिल १५); शिवाजी–जयंति (एप्रिल २७); बकरी–ईद (जून ६); मोहरम (जुलै ५) लोकमान्य पुण्यतिथि (ऑगस्ट १); नारळी पौर्णिमा (ऑगस्ट ६); स्वातंत्र्यदिन (ऑगस्ट १५); गणेश चतुर्थी (ऑगस्ट २५); संवत्सरी (ऑगस्ट २६); पारसी न्यू ईयर (ऑगस्ट ३१); खोरदाद साल (सप्टेंबर ५); दसरा (सप्टेंबर ३०) व दिवाळी (दोन दिवस, दिवाळी व नवी वर्षादिन ऑक्टोबर २० व २१).

होळीचा दुसरा दिवस (मार्च १३); गोकुळ अष्टमी (ऑगस्ट १४); ईद–इ–मिलाद (सप्टेंबर ४); महात्मा गांधी जयंती (ऑक्टोबर २) व खिसमस (डिसेंबर २५) या सुट्या रविवारी आल्यामुळें त्या दिवशीं त्या जाहीर करण्यांत आल्या नाहींत.

# बँकेंतील नौकरी कां आवडते ?

बँकेमधील नौकरी तुम्हांला कां आवडते ? म्हणून बँकांमधील अधिकाऱ्यांना विचारल्यास ते नाना प्रकारचीं कारणें सांगतील. पण, त्यांच्या उत्तरापेक्षा बँकांमधील खालच्या जागांवरून वर चढत जाणाऱ्या नौकरांचीं ह्या बाबतींतील मतें कदाचित् अधिक उद्बोधक ठरतील. अशा बऱ्याच नौकरांना वरील प्रश्न विचारला असतां त्यांनीं पुढीलप्रमाणें उत्तरें दिलीं. (१) बँकिंगचा धंदा हा सर्वांत स्थिर आहे. (२) बँकांमधील काम मनोरंजक असतें. (३) कामाच्या वेळा सोयीच्या असतात. (४) काम करण्याची जागा व इतर परिस्थिति सुखदायक असते. (५) बँकांतील रोजगारा किफायतशीर असते. (६) बढती निश्चित मिळणारी असते. (७) दुसऱ्याची सेवा करण्याची संधि ह्या व्यवसायांत पुष्कळ महत्त्वाच्या मार्गानें मिळते. (८) दिवसाचें काम रोजच्या रोज संपतें; त्यामुळें रात्रीं डोक्याला चिंतेचा भुंगा लागत नाहीं. (९) लोकांच्या गांठीभेटी होण्यांत एक प्रकारचा आनंद असतो व तो बँकेच्या धंद्यांत मिळण्याचा अधिक संभव असतो. (१०) बँकेंतील नौकराला आपल्या महत्त्वाची जाणीव असते. तशी ती इतर व्यवसायांत नसते. (११) बँकेंतील कामाची ज्याला आवड आहे त्याला आपली भरभराट होईल असा विश्वास असतो. (१२) बँकेमधील नौकरींत सर्वांत जास्त सातत्य असतें व शाश्वतीहि अधिक असते. (१३) बँक म्हणजे प्रगतीच होय. (१४) मंदींतहि बँकिंग स्थिरच राहातें. (१५) उमद्या स्वभावाच्या लोकांबरोबर काम करण्याची संधि बँकांतून मिळते. (१६) अभ्यासाला व बढतीला बँकांतून नेहमींच संधि मिळत राहते.

त्याशिवाय नऊ तरुणांनीं सहकार्य करून जीं पत्रें पाठविलीं तीहि मोठी मनोरंजक आहेत. (१) मला माहीत असलेल्या कोठल्याहि व्यापारी संघटनेपेक्षा बँकिंगला सर्वांत अधिक स्थैर्य आहे. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या कार्यांतील आपला वांटा उचलूनहि समाजांत स्वतःचा असा एक आर्थिक दर्जा बँक उत्पन्न करते व तो टिकविते. बँकेच्या परिसरांत जीवन कसें फुलतें तें पहाणें मोठें सुखाचें आहे. बँक ही किती महत्त्वाची असूं शकते ह्याची फारच थोड्या लोकांना कल्पना आहे. बँकांमुळें कितीतरी लोकांच्या जीवनावर अनेक तऱ्हांनीं परिणाम होत असतो. उदाहरणार्थ, कापडाच्या गिरण्यांना बँका करतात ती मदत. बँकेमधील नौकरींत एकप्रकारचें वैशिष्ट्य आहे. मीं तर आतां कोठें नौकरीला सुरुवात केली आहे. तरीसुद्धां मला ती मनोरंजक आणि किफायशीर ठरली आहे. केवळ पैशाच्या दृष्टीनें नव्हे; तर धंद्यांतील कां व कसें ह्याबद्दल मिळणाऱ्या अनुभवाच्या दृष्टीनेंहि. (२) बँकेमधील नौकरी पत्करण्याचीं बरींच कारणें आहेत. माझे वडील ४७ वर्षे बँकेमध्येंच काम करीत असत; त्यांना स्वतःचें काम फार आवडत असे. कामाची वेळ बहुधा सुखाची असते. काम करण्याची परिस्थितीहि चांगली असते. आणि योग्य ती शैक्षणिक लायकी असेल तर बढतीची पुष्कळच संधि असते. काम करण्याची इच्छा असेल आणि कामसूपणा असेल तर कोणत्याहि होतकरू तरुणाला बँकिंगच्या व्यवसायांत आपली योग्य जागा मिळूं शकेल. (३) मला बँकेंतील काम फार आवडतें; कारण तें मनोरंजक असतें. आपण लोकांची सेवा करीत आहों असें वाटणें मला आवडतें. शिवाय मला आंकडे-


नवीन जरीचीं लुगडीं, साड्या,
सुंदर बनारसी पातळें
व
सर्व मिलचा माल
या करितां
शाहाडे आठवले
प्रा. लि., दादर
मुंबई २८.
टे. नं. ६०५५४



धांवपळीच्या जीवनांत
वेळेची बचत करा !
अनारशांसाठी तयार पीठ, चकली कडबोळ्यांची
खमंग भाजणी, शेव, अळुवडी व भज्यांसाठी
तयार पीठ आणि




सुगंधी उटणें
तयार आहे !
आमचे मसाले, लोणचीं, पापड, करी पावडर व मँगोचटणी
आपल्या देशाला दुर्मिळ असे परकीय चलन मिळवून
देत आहेत. जुलै १९५९ चे अखिल भारतीय
'आंबा' प्रदर्शनांत आमचे आंब्याच्या
लोणच्याला पहिलें बक्षिस मिळालें !
व्ही. पी. बेडेकर आणि सन्स् प्रा. लि.,
मुंबई ४.
शाखा :—ठाकूरद्वार, दादर, कोट व परळ.

अहमदनगर जिल्ह्यांत व विशेषतः नगर शहराचे नागरी सहकारी जीवनांत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेली व महाराष्ट्रांत एक अग्रगण्य सहकारी बँक म्हणून प्रसिद्ध असलेली नगरची

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**अहमदनगर**

[ ही ५१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. ]

नागरी बँक असूनहि ही बँक बिगर–शेतकी सहकारी पतपेढ्या, कंझ्यूमर्स सहकारी पतपेढ्या पगारदार नोकरांच्या पतपेढ्या, विणकरांच्या पतपेढ्या, वगैरे संस्थांना कर्जाचा पुरवठा करून सहकारी जीवन प्रगतिपथावर नेत आहे.

★

मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जे दिली जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदीविक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात व चेक्स, ड्राफ्टस् दिले जातात.

★

अहमदनगर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय करण्यांत आली आहे व बँकेचे श्रीरामपूर व संगमनेर यथील शाखेंतहि सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय लवकरच करण्यांत येणार आहे.

पां. का. मुळे — मॅनेजर
त्र्यं. वि. निसळ — जनरल मॅनेजर
श्री. वि. निसळ — चेअरमन

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर.

## दि मिरज स्टेट बँक, लि.

**हेड ऑफिस : मिरज**

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९.

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख
खेळतें भांडवल : रुपये पंचाणव लाख
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर : ( १ ) तीन वर्षे मुदत ठेवींकरितां व्याज दर ४ टक्के. ( २ ) पांच वर्षे मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

**हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.**

बँकेच्या शाखाः सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन. पी. कानिटकर, ॲडव्होकेट, चेअरमन.
के. डी. शिराळकर, मॅनेजर.

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई–१.

स्थापना : १९११. ★ टेलिफोन २५५४७४–५

तारेचा पत्ता : FARMERBANK ★ पो. बॉ. नं. ४७२

**मुंबई राज्यांतील शाखा व संलग्न बँका ३०४**

या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | कोटी |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १·३० |
| गंगाजळींत फंड | रु. | ०·५९ |
| ठेवी | रु. | १७·२० |
| खेळतें भांडवल | रु. | २९·६७ |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरेंची वसुली केली जाते.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

गो. मं. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लिमिटेड

१७९ ब, बुधवार पेठ, पुणें २.

फोन नं. ६७०१ — स्थापना : १९४५

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१ श्री. गंगाधर शिवराम आडकर, वकील, चेअरमन
२ श्री. शंकर नारायण वैद्य, बी. ए., एलएल. बी., वकील.
३ श्री. महादेव बाळकृष्ण साळवेकर, व्यापारी
४ श्री. हरकचंद मोतीचंद बाफना, व्यापारी
५ श्री. काशिनाथ बाळकृष्ण साळवेकर, मॅ. डायरेक्टर

**भांडवल**

अधिकृत : १ लक्ष रु. वसूल : ६५ हजार रु.
फंडस : १६ हजार रु. खेळतें भांडवल : ११॥ लाख रु. (चे वर)

**ठेवींवरील दर**

स्पेशल सेव्हिंग्ज ३%

कायम ठेव
रक्कम रु. १०,००० ६ वर्षें रु. ११,७००
रक्कम रु. १०,००० १० वर्षें रु. १५,०००

के. बी. साळवेकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.

विषयक काम करणें नेहमींच आवडतें. हेंच काम मी सध्यां करीत आहे. हें काम कंटाळवाणें कधींच होत नाहीं. कारण माझ्या कामाला अनेक अंगोपांगें आहेत. काम करतां करतां मला रोज कांहीं तरी नवें शिकतां येतें. त्यामुळें माझ्या ज्ञानांत वाढ होते आणि माझें मन ताजें राहतें. थोडक्यांत म्हणजे बँकेंतील काम मला आवडतें. आपलें दिवसाचें काम आपण यशस्वीपणें पार पाडलें आहे अशा भावनेनें बँकेंतून रोज परततांना मला फार समाधान होतें. (४) बँकेंतील काम मला फार आवडतें व त्यांतच नांव कमावण्याची माझी इच्छा आहे. मला ज्या प्रकारचें काम आवडतें तेंच काम मिळाल्यामुळें बँकेंतील कामांत मी रमून जातों. मी माझ्यापुढें जें ध्येय ठेवलें आहे तें गांठण्यासाठी बँकिंगच्या व्यवसायांत किती तरी संधि मिळतात म्हणून. मला बँकिंग आवडतें. मनुष्याला उपयोगी पडणारें अशा प्रकारचें काम केल्याचें समाधान मिळविण्याची माझी इच्छा होती व ती बँकिंगच्या व्यवसायांत यशस्वी झाली आहे. कदाचित् माझें म्हणणें थोडेंसें अहंमन्यतेचें वाटेल, पण मला तसें वाटतें खरें. दुसऱ्यांना मदत करण्यांत मला एक प्रकारची धुंदी प्राप्त होते. ह्या बाबतींत बँकिंगच्या धंद्यांत वाटेल तेवढी संधि मिळते. बँकिंगच्या धंद्यांत लोकांशीं नेहमींच संबंध येतो. जबाबदाऱ्या अंगावर घेऊन त्या पार पाडण्याबद्दल मला नेहमींच आकर्षण वाटत आलें आहे. असल्या कामांत स्वतःच्या महत्त्वाची एक प्रकारची सुखद जाणीव प्राप्त होते. ती इतर किती तरी व्यवसायांत मिळत नाहीं. बँकेच्या यशासाठी संघवृत्तीनें काम करण्याची फार आवश्यकता असते. बँकिंगच्या व्यवसायांत स्थैर्य, उज्ज्वल भवितव्य ह्यांचा मिलाफ झालेला असतो, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अशाश्वतीमुळें किती तरी कुटुंबांची धुळदाण झाल्याचीं उदाहरणें मला माहीत आहेत. असा प्रसंग माझ्यावर येणार नाहीं ह्याची हमी मला पाहिजे आहे. (५) बँकिंगच्या व्यवसायांत खूप व मनोरंजक संधि मिळतात म्हणून ह्या व्यवसायांत मी पदार्पण केलें. बँकेंतील बहुतेक नोकऱ्या कायमच्या असतात. त्यामुळें ह्या क्षेत्रांत काम करणाऱ्याला स्वतःच्या कुटुंबाला व स्वतःला शाश्वति मिळविण्याची चांगलीच अपेक्षा असते. कांहीं थोडे अपवाद सोडून बँकेंतील नोकऱ्या मंदीच्या काळांतहि कायम असलेल्या आढळून येतात. बहुतेक बँकांमधील कामाची परिस्थिति चांगली असते. बँकेंत काम करणारांची दानत संशयातीत असते. व्यापार धंद्याच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या शिपायांपासून तें अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाला एक प्रकारचें महत्त्वाचें स्थान असतें. प्रत्येकाला आपल्या अंगची हुषारी दाखवून बढती मिळविण्याची संधि रोजच्या कामांत मिळूं शकते. नुसता दबदबा अगर पैसा ह्यामुळें चांगला अधिकारी होऊं शकत नाहीं. त्यासाठी अनुभव व अंगमोडून काम करण्याची सवय ह्यांचीच जरूर असते. बँकेंत आस्थापूर्वक व नेकीनें काम केल्यास बढतीचीं बक्षिसें एकामागून एक पदरांत पडल्याशिवाय राहाणार नाहींत (६) लायक माणसांना आजकाल बँकिंगच्या व्यवसायांत खूपच संधि आहे. म्हणून मला बँकिंगचा व्यवसाय आवडतो. एखादा मनुष्य लायक असेल तर बँकिंगमध्यें त्याला स्थैर्य लाभेल आणि इतर व्यवसायांच्या मानानें पगाराची प्राप्तीहि अधिक होईल. ज्यांची कष्ट करण्याची तयारी आहे त्यांना अधिक जबाबदारी घेऊन अधिक संधि मिळण्याची शक्यता ह्या व्यवसायांत नेहमींच असते. बँकिंगचें शिक्षण देणारी संस्था असेल तर थोड्याशा खर्चांत बँकेंत काम करणाऱ्यांना कायदा, अर्थशास्त्र व हिशोब ह्या विषयांबरोबरच बँकिंगच्या मूलभूत ज्ञानाचीहि प्राप्ति होऊं शकते. बँकिंगसंबंधी भरविण्यांत येणाऱ्या परिसंवादांतून कार्यपद्धति, व्यापार, आर्थिक उलाढाली व परदेशी घडामोडी ह्यांचीहि माहिती मिळते. शिवाय बँकिंगच्या क्षेत्रांत चालू असलेल्या घडामोडींशींहि परिचय होतो. बँकेंतील नोकराशी व बँकेच्या गिऱ्हाइकांशीं हाणारी सुखद ओळखहि फार महत्त्वाची असते. (७) शाळेंत असतांना कोठलें काम मला आवडेल ह्यासंबंधीं मला कांहीं कल्पना नव्हती. मी इतर अनेक तरुणांप्रमाणें नानाप्रकारचीं कामें केलीं. नंतर दुसऱ्या महायुद्धांत निरनिराळ्या आघाडीवर लढलों. युद्धानंतर कोणतें काम करावें ह्यासंबंधीं मी गोंधळून गेलों होतों. वाढत्या वयामुळें शारीरिक मेहनतीचीं कामें जमण्यासारखीं नव्हतीं. मला बायको व दोन मुले होतीं. अशा स्थितींत ज्या नोकरींत स्थैर्य असेल व उत्कर्षाला जागा असेल अशी नोकरी मला पाहिजे होती. एखाद्या नवीन निघालेल्या पण वाढत जाणाऱ्या बँकेंत नोकरी मिळाली तर बरें असें मला वाटूं लागलें. बँकेच्या वाढीबरोबरच मलाहि जबाबदारीची व विश्वासाची जागा मिळेल अशी आशा मला वाटे. अखेर मला अशी नोकरी मिळाली. सुरवातीला पगार थोडा होता. पण मी मनापासून व नीट काम केलें तर मला बढतीची संधि दिली जाईल असें आश्वासन देण्यांत आलें. मला काम मनोरंजक वाटलें. मोठमोठ्या कंपन्यांचे पैशाचे व्यवहार पहाण्याचें व हाताळण्याचें काम मी व माझे सहकारी कार्यक्षमतेनें व समाधानकारक रीतीनें करीत होतों. त्यामुळें आम्हांला एक प्रकारचें समाधान होत होतें. व्यापारी बँकेंत पुष्कळ निरनिराळीं खातीं असतात. मला असें वाटतें कीं ह्या क्षेत्रांत तरुण लोकांना अनेक प्रकारच्या संधि खुणावत असतात. तरुणपणींच एखाद्या जबाबदारीच्या जागेवर काम करण्याइतपत प्रगति ते करूं शकतात. आतापर्यंत माझी जशी प्रगति होत गेली तशीच पुढें होत गेल्यास मी सेवानिवृत्त होईपर्यंत ह्याच बँकेंत काम करणार आहे. (८) बँकिंगच्या व्यवसायांत कामाची परिस्थिति तर चांगली असतेच; पण नोकरीची शाश्वतीहि असते. कारण, इतर उद्योगधंद्यांप्रमाणें बँका हंगामी नसतात आणि आर्थिक मंदीचा त्यांच्यावर फारच थोडा परिणाम होतो. (९) मी बँकेंत नोकरी धरली त्यावेळीं मला नोकरीची गरज होती. देऊं केलेली नोकरीहि बरी होती. तेव्हांपासून मी बँकिंगविषयीं बरेंच शिकलों मी जर आतां नोकरी बदललीच तर ती दुसऱ्या बँकेंतीलच असेल. भिन्न प्रकृतीच्या माणसांना योग्य अशा अनेक प्रकारच्या जागा बँकेंत असतात. शिवाय बँकांमधून अधिक पगारी सुट्या असतात व बोनसहि मिळतो. बँकांत काम करणारे लोक चांगले असतात. अशा लोकांच्या गांठी पडणें बँकेंतच शक्य असतें. बँकांचा व्यवसाय हा इतर धंद्यांशीं निगडित असतो. कोणतेंहि धंद्याचें क्षेत्र चांगल्या बँकिंगशिवाय मजबुती पावणार नाहीं. दुसऱ्याला ह्या बाबतींत मदत करण्याच्या कामीं तुम्हींहि थोडासा हातभार लावूं शकता ही जाणीव सुखाची असते.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

# सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.



## मंगलकार्यें व मेजवान्या

यांसाठी

## सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

★ हीरकोत्सवानिमित्त अद्यावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

★ टिळक जन्म शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

# सा र स्व त

## को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

सारस्वत बँक बिल्डिंग,
गिरगांव, मुंबई-४.

स्थापना : १९१८ ] [ टेलि. २७०१४

## बचत करा आणि राष्ट्राच्या विकास कार्यास हातभार लावा.

| | | लाख |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ८·३० |
| रिझर्व्ह | रु. | ९·०२ |
| ठेवी | रु. | २०९·३४ |
| तरतें भांडवल | रु. | १६०·३८ |
| कर्जे येणें | रु. | ६७·५६ |
| खेळतें भांडवल | रु. | २३१·०० |

तरतें भांडवलाचें ठेवीशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें, बेळगांव.



महिला शाखा : गिरगांव, मुंबई ४.

॥ विना सहकार नहि उद्धार ॥

# रत्नागिरी अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., रत्नागिरी

शाखा : (१) संगमेश्वर (२) देवरूख

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १ लक्ष |
| खपलेलें भागांचें भांडवल | रु. १। लक्षांचे वर |
| गुंतविलेल्या रकमा | रु. ९ लक्ष रुपयांवर |
| ठेवी | रु. २१ लक्ष रुपयांवर |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १ लक्ष रुपयांवर |
| खेळतें भांडवल | रु. ३१ लक्ष रुपयांवर |

(१) बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

(२) सोनें माल, सिक्युरिटीज, विमा पॉलिसीज वगैरेचे तारणांवर व जामिनावर कर्जें दिलीं जातात.

(३) ५ व ७ वर्षे मुदतीचीं अनुक्रमें ४ व ४॥ टक्के व्याजाचीं ठेव सर्टिफिकिटें विकलीं जातात.

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा.

माहिती आनंदानें पुरविली जाईल.

वि. वि. भाटवडेकर,
मॅनेजर.

— फलटण तालुक्यासाठी मध्यवर्ती बँक —

# श्रीलक्ष्मी सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण

( स्थापना १९१६ )

| | |
|---|---|
| भागाचें वसूल भांडवल | रु. १·५० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३·३१ „ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ३०·०० „ |

★ मुंबई राज्य सरकारनें या बँकेचे रु. १,५०,००० चे भाग खरेदी केले आहेत.

★ रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें या बँकेस अल्प मुदतीचे शेतकी कर्ज वांटण्यास रु. आठ लाख मंजूर केले आहेत.

— ही बँक खालील दरानें ठेवी स्वीकारते —

(१) चालू ठेवी ½% (२) सेव्हिंग्ज ठेवी १%

(३) मुदत ठेवी १ ते ५ वर्षांस १¾ ते ४%

★ प्रत्येक पतवान शेतकऱ्यास त्याच्या पिकाच्या प्रमाणांत भरपूर कर्ज देण्याची व्यवस्था सरकारच्या अपेक्षेस अनुसरून ही बँक करीत आहे.

★ या कार्यांत आपणा सर्वांच्या पूर्ण सहकार्याची आम्ही अपेक्षा करीत आहोंत.

★ या बँकेंत ठेवी ठेवून व भाग खरेदी करून या राष्ट्र-कार्यांत मदत करावी अशी विनंती आहे.

माहितीसाठी कृपेनें समक्ष भेटा अगर लिहा.

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक

मु. रा. भोईटे, B. A., LL. B., अध्यक्ष

# इंडेक्स नंबर्स : व्यावहारिक उपयोग

शंभर वर्षांपूर्वी विमानांप्रमाणेंच निर्देशांक माहीत नव्हते. पैशाच्या किंमतींत इतर वस्तूंप्रमाणेंच चढउतार होतो हें जेव्हां लक्षांत आलें, तेव्हां निर्देशांकाचा उदय झाला. ग्राहकांना लागणाऱ्या रोजखपाच्या वस्तु, पैसा नेहमींच सारख्या प्रमाणांत विकत घेऊं शकत नाहीं. म्हणजेच पैशाच्या खरेदीच्या शक्तींत चढउतार होत असतो. आतांपर्यंतच्या अनुभवावरून युद्धकाळांत संबंधित देशांत पैशाची किंमत नेहमींच घसरलेली दिसून येते. पण, अलिकडच्या काळांत पैशाच्या किंमतींत जितकी घसरगुंडी झाली तितकी झपाट्यानें ती युद्धकालांतहि झालेली दिसून येत नाहीं. शिवाय, पैशाच्या खरेदीच्या शक्तींत अशा तऱ्हेनें जी घसरगुंडी युद्धकालांत झाली होती तिची भरपाई शांतता प्रस्थापित झाल्यावर वेगानें करण्यांत आली. त्यामुळें ज्याला आपण चलनवृद्धि म्हणतों तिचे बरेचसे वाईट परिणाम अंशतः तरी कमी झाले. पहिल्या महायुद्धांत जे देश पराभूत झाले त्या देशांतून चलनवृद्धीच्या दाबाचे परिणाम भयंकर रीतीनें लोकांच्या अनुभवास आले. जर्मनींत मार्कची किंमत रोज नव्हे तर तासातासाला घसरली. १९२२ मध्यें जर्मनींत हॉटेलांत राहण्याचे दर प्रत्येक तासाला नव्यानें ठरविण्यांत येत असत. पुष्कळ कारखान्यांतून कामाचें वेतन अगर पगार दिवसावर अगर आठवड्यावर ठरविण्यांत न येतां तासावर ठरविण्यांत येत असत. रोज लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती इतक्या चढ्या होत्या व त्यांची टंचाई इतकी विलक्षण होती कीं, पुष्कळांना कागदाचे अंगरखे घालावे लागले. चलनवृद्धीचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर जगाला बसलेला हा पहिला धक्का होता. नंतर हिटलरचा अर्थमंत्री डॉ. शाख्ट ह्याच्या करामतीमुळें जर्मनीनें ह्या सर्व अडचणींवर मात केली. तथापि, जर्मनीचा अनुभव अगदींच वाया मात्र गेला नाहीं. चलनवृद्धीच्या नव्या घटनेकडे जगांतील अर्थशास्त्रज्ञांचें त्यामुळें लक्ष वेधलें गेलें. खुद्द पैशाची किंमत कशी मोजावयाची असाच प्रश्न उत्पन्न झाला होता.

दुसऱ्या सगळ्या वस्तूंची किंमत पैशांत मोजली जात होती. पण, खुद्द पैशाचीच किंमत जर स्थिर नसेल तर वस्तूंच्या किंमतीचें मोजमाप चुकीचें ठरणार हें उघडच आहे. पूर्वी पैशाच्या किंमतीचें अचूक व निश्चित निदान करण्याचें साधन म्हणून सोन्याच्या किंमतीचा उपयोग होत असे, व सोनें खुल्या बाजारांत मोकळेपणानें मिळत असे. सोन्याची किंमत वाढली कीं पैशाची किंमत घटत असे. उलट, सोन्याची किंमत कमी झाली कीं पैशाच्या एकाच घटकाला अधिक वस्तू मिळूं लागत. पण देशामागून देशांनीं सुवर्णपद्धतीचा त्याग केल्यावर आणि सोन्याच्या व्यापारावर निर्बंध घालण्यांत आल्यावर पैशाची किंमत ठरविण्याची ही पद्धत निकामी झाली. ती व्यवहार्य राहिली नाहीं. ह्याच परिस्थितींत फिशर ह्यानें 'इंडेक्स नंबर्स' (निर्देशांक) हें पुस्तक लिहिलें. त्यांतील मूळची कल्पना फार सोपी आहे. प्रत्येक वस्तूच्या किंमतीसाठी निराळा निर्देशांक तयार करण्यांत येऊं लागला. त्यासाठी कोणतें तरी एक वर्ष किंमतीच्या तुलनेसाठी प्रमाणभूत मानण्यांत आलें आणि त्या वर्षातील त्या पदार्थांच्या किंमतींशी त्यानंतरच्या वर्षांतील त्याच वस्तूंच्या किंमतींची तुलना करण्यांत येऊं लागली. औद्योगिक उत्पादनांत अगर शेतीच्या उत्पादनांत झालेली वाढ अगर घट निर्देशांकाच्या साह्यानें आजमावतां येऊं शकते, ही गोष्ट फिशर ह्यांनींच पहिल्यानें सांगितली. त्यानंतर मनुष्याच्या आर्थिक व सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील घडामोडी निर्देशांकांच्या साह्यानें अजमावतां येतात ही गोष्ट अनेक लोकांच्या ध्यानांत आली. मग घराच्या भाड्यांचे, करांचे व इतर अनेक प्रकारचे निर्देशांक तयार करण्यांत येऊं लागले.

अशा रीतीनें तयार करण्यांत आलेले पहिले निर्देशांक फारसे गुंतागुंतीचे नव्हते. पाव, लोणी, अंडीं, मांस, इत्यादि रोज लागणाऱ्या कांहीं वस्तूंची निवड करण्यांत आली आणि प्रत्येक वस्तूसाठी वेगळा निर्देशांक तयार करण्यांत येऊं लागला. तरीसुद्धां किंमतीमधील चढ-उतार लहानसहान होते असें नाहीं. एखाद्या वेळीं मागणी व पुरवठा ह्यांच्यामध्यें फार


## दि विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

**नागपूर.**

( विदर्भाची प्रमुख सहकारी बँक )

अल्प, मध्यम व लांब मुदतीचीं कर्जें

सहकारी सेंट्रल बँका व लँड मॉर्टगेज बँकांमार्फत वांटप केलीं जातात.

**अल्प मुदतीच्या ठेवी**

आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

वि. म. जोगळेकर
मॅनेजर.

रा. वि. काळीकर
अध्यक्ष.

# दि इचलकरंजी अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., इचलकरंजी.

स्थापना : १९३० : हेड ऑफिस-इचलकरंजी
फोन नं. २३६ : शाखा-आजरें (जि. कोल्हापूर)

BANK HELPS THE TEXTILE AND COTTAGE INDUSTRIES OF ICHALKARANJI
(MANCHESTER OF MAHARASHTRA.)

| | | |
|---|---|---|
| भरलेलें शेअर भांडवल | रु. | १,३५,४१५ |
| रिझर्व फंड | रु. | १,११,६०८ |
| इतर फंडस् | रु. | १,७१,९७१ |
| खेळतें भांडवल | रु. | ३४,३७,१५८ |
| एकूण ठेवी | रु. | २९,०८,११३ |
| इन्व्हेस्टमेंट व हातांतील व बँकांतील शिल्लक | रु. | १०,६४,३१९ |
| कर्जें | रु. | १३,२७,३९० |

| | |
|---|---|
| कर्जाचे दर | ६ ते ८ टक्के |
| ठेवींचे दर चालू | १ टक्का |
| सेव्हिंग्ज | १·५० टक्के |
| मुदत ठेव | १·५० ते ४·५० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
माफक दरांत लॉकर्स भाड्यानें देण्याची सोय.

डी. आर. काळे ★ दत्तात्रय बाबूराव कदम
मॅनेजर. चेअरमन.



# बँक ऑफ पूना, लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. ११,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें
गो. गं. साठे मॅनेजर



# भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. नो. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.



स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[शेड्यूल्ड बँक]

हेड ऑफिस :
पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

३० जून, १९५९ अखेर

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे | दहा वर्षे |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.
दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

तफावत पडली आणि आयात–निर्यातीवरील बंधनांनीं ती आणखीच तीव्र झाली, कीं किंमतींमधील चढउतार अधिक लवकर व मोठ्या फरकाचे होत. पूर्वीच्या काळांतील किंमतींचें स्थैर्य नष्ट होऊं लागलें आणि रोजखपाच्या वस्तूंच्या किंमतींत एकदम चढउतार होऊं लागले. त्यामुळें अधिक वेतनाच्या व पगाराच्या मागण्या करण्यांत येऊं लागल्या. पैशाच्या किंमतींत झालेल्या घटीचें प्रमाण मोजण्यासाठी निर्देशांकांचा उपयोग अधिक करण्यांत येऊं लागला. पण पदार्थांच्या किंमती ह्या ठिकाणागणिक वेगळ्या असतात. म्हणून प्रत्येक महत्त्वाच्या शहरासाठी वेगळे निर्देशांक तयार करण्यांत येऊं लागले. इतकेंच नाहीं तर निरनिराळ्या गटांतील लोकांचे राहाणीचें मान निरनिराळें असल्याचें दिसून आल्यामुळें अनेक प्रकारचे निर्देशांक तयार करण्यांत येऊं लागले. उदाहरणार्थ, ग्राहकांचा निर्देशांक, कामगारांच्या राहणीचा निर्देशांक, मध्यममवर्गाच्या राहणीचा निर्देशांक, वगैरे.

निर्देशांकाची कल्पना पैशाच्या किंमतींत होणारी घट मोजण्यासाठी जोपर्यंत वापरली जात होती तोपर्यंत समाजशास्त्राच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग करण्यास फारशी प्रेरणा नव्हती. पण, ह्या कल्पनेचा उपयोग राहणीच्या खर्चाचा वेतनाशी मेळ घालण्यासाठी जेव्हां करण्यांत येऊं लागला तेव्हां गुंतागुंत निर्माण होऊं लागली. पहिली गोष्ट अशी कीं निर्देशांक तयार करतांना जी नमुना पाहाणी करण्यांत येते तींत समाविष्ट करण्यांत आलेल्या कुटुंबांतून निरनिराळ्या वस्तूंना महत्त्व-मापनाची एकच कसोटी लावण्यांत येत नाहीं. शेजारीं शेजारीं राहणाऱ्या पांच कुटुंबांची जरी आपण नमुना पाहाणी केली तरी प्रत्येक कुटुंबांत रोजखपाच्या वस्तूंना वेगवेगळें महत्त्व देण्यांत येत असल्याचें आढळून येईल. अर्थात राहणीच्या खर्चाच्या निर्देशांकांत झालेल्या वाढीचें बरेंचसें अचूक चित्र डोळ्यांसमोर येण्यासाठी कांहींतरी पाया हा धरावाच लागतो. पण निर्देशांक तयार करतांना वस्तूंना देण्यांत येणाऱ्या महत्त्वाचें मापन करण्याची पद्धतच मुळांत अचूक नाहीं. उदा. इंग्लंडमध्यें अंडीं, मांस, दारू, इत्यादि पदार्थांना राहणीचा निर्देशांक तयार करतांना भारताच्या मानानें अधिक महत्त्व द्यावें लागेल. आणि भारतांत जरी झालें तरी मांसाहारी आणि शाकाहारी लोकांच्या राहाणीचा निर्देशांक तयार करतांना त्याच वस्तू आधारभूत घेतल्या व त्यांना तितकेंच महत्त्व दिलें तर तें बरोबर होणार नाहीं. पण, पदार्थांच्या महत्त्वमापनांतील फरक एवढी एकच गोष्ट निर्देशांक तयार करतांना दोषास कारणीभूत होते असें नाहीं. युद्धकाळांत वेतनाचा विचार करण्यांत येऊं लागला तेव्हां आणखी एक अडचण उपस्थित झाली. सरकारनें नेमलेले इन्स्पेक्टर्स जेव्हां बाजारांत हिंडून किंमतीबद्दल माहिती गोळा करूं लागले तेव्हां त्यांनीं आपले अंदाज नियंत्रित दरावर साहजिकच आधारले. कारण, सरकारच्या यंत्रणेला काळ्या बाजारांतील दरांची दखल घेणें अर्थातच शक्य नव्हतें. तेव्हां झालें असें कीं, किंमती गोळा केल्या गेल्या त्या नियंत्रित बाजारांतील. पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र ग्राहकांना त्यापेक्षा कितीतरी अधिक किंमती द्याव्या लागत होत्या. त्यामुळें राहणीच्या निर्देशांकांत अधिकच दोष उत्पन्न झाले. नियंत्रित दरावर विसंबून तयार केलेला राहणीचा निर्देशांक आणि इंग्लंडमधील ट्रेड युनिअन काँग्रेससारख्या संस्थेनें तयार केलेला राहणीचा निर्देशांक ह्यांच्यांत कधीं कधीं फारच तफावत पडूं लागली. त्यामुळें कितीहि प्रयत्न केले तरी वेतनाची राहणीच्या निर्देशांकांशीं सांगड घालण्याच्या कामीं फारसें यश आलें नाहीं.

राहणीच्या चालू निर्देशांकाच्या असमाधानकारक स्वरूपाचें आणखी एक उदाहरण देण्यासारखें आहे. १९४९ साल आणि पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें शेवटचें वर्ष ह्यामध्यें अन्न धान्याचें उत्पादन २२ टक्क्यांनीं वाढलें. १९४९–५० सालीं अन्नधान्याचे एकूण उत्पादन ५·४ कोटी टन झालें तर १९५४ ५५ सालीं तें ६·७ कोटी टन झालें. ही वाढ वर म्हटल्याप्रमाणें २२ टक्के आहे. पण १९५४–५५ चा अन्नधान्याच्या उत्पादनाचा निर्देशांक मात्र ११५ च आहे. (आधारभूत वर्ष १९४९–५० = १००) प्रत्यक्ष उत्पादनांत झालेली एकूण वाढ आणि निर्देशांकांतील आंकडा ह्यांची तुलना केल्यास ही तफावत नेहमीच दिसून येते. उदा. औद्योगिक


# दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी

स्थापना ] जिल्हा कोल्हापूर [ १९५०

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८०,५६० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | रु. २४,५१३ |
| खेळतें भांडवल | रु. ५,२४,०१९ |

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

सभासदांच्या सर्व गरजा भागविणेची तरतूद.

**आ. बा. नाईक** | **एल. वाय्. पाटील**

मॅनेजिंग डायरेक्टर | चेअरमन





उत्पादनाचा सामान्य निर्देशांक १९५८ सालीं १५८ पर्यंत वाढला. ( १९५१ = १०० ) पण त्यामुळें उत्पादनांत झालेल्या एकूण वाढीची बरोबर कल्पना येणार नाहीं. कारण सामान्य निर्देशांकांत तुलनात्मक दृष्टया कमी महत्त्वाच्या उद्योगधंद्यांच्या उत्पादनाचाहि समावेश करण्यांत आलेला आहे. विजेची यंत्रसामुग्री सोडून इतर यंत्रसामुग्रीचा निर्देशांक १९५२ सालीं ८८ होता तो १९५८ सालीं ३६१ झाला. विजेच्या यंत्रांच्या उत्पादनाचा निर्देशांक १९५२ सालीं १०२ होता तो १९५८ सालीं २७४ झाला. उलट कापडाच्या उत्पादनाचा निर्देशांक १९५२ सालीं १०४ होता तो १९५८ सालीं अवघा ११३ पर्यंतच वाढला. ह्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं, सामान्य निर्देशांकावरून खऱ्या परिस्थितीची कल्पना येत नाहीं. पण निर्देशांकांची पद्धत जर निर्दोष असती तरीहि फारसें बिघडलें नसतें. पण तसें नाहीं हें आतां कळून येऊं लागलें आहे. बाजारांत ग्राहकांना लागणाऱ्या पुरेशा वस्तू नसतांना त्यांच्या हातांत अधिक पैसा देणें म्हणजे चलनवृद्धि अधिकच तीव्र करण्यासारखें आहे. अमेरिकेंत आणि इतर पाश्चात्य देशांत वेतनाची व पगारांची राहणीच्या निर्देशांकाशीं सांगड घालण्याची ही पद्धत निरुपयोगी आहे हें अधिकाधिक पटूं लागलें आहे. पण राहणीच्या खर्चाची कल्पना देणारें दुसरें कोणतेंहि गमक हाताशीं नसल्यामुळें आणि रोजंदारीवर अवलंबून असणाऱ्या कामगारांत असंतोष पसरण्याची भीति असल्यामुळें भारतांत अजून हीच पद्धत अंमलांत आहे.

रहाणीच्या निर्देशांकाची पद्धतीच जर सदोष आहे तर त्यावर इलाज काय? रहाणीच्या खर्चांत झालेल्या वाढीची अचूक कल्पना यावी म्हणून प्रत्येक कचेरीनें, गिरणीनें अगर कारखान्यानें आपला स्वतंत्र निर्देशांक तयार करावा व त्यासाठी आपल्या नोकरवर्गाच्या मासिक खर्चाचा आधार म्हणून उपयोग करावा अशी सूचना करण्यांत आली. इंग्लंडमध्यें कांहीं छोट्या उद्योगधंद्यांनीं हा प्रयोग करून पाहिला आणि तो बराच यशस्वी झाला ह्यांत शंका नाहीं. पण ह्याहि पद्धतीवर चलनवृद्धीला मदत करण्याचा मूळचा आक्षेप येतोच.

ह्या सर्व मुद्यांचा विचार करून अलीकडे असें सुचविण्यांत येत आहे कीं, कामगारांना व नोकरांना अधिक पैसे न देतां त्यांना लागणाऱ्या रोजखर्चाच्या वस्तूच द्याव्या. प्रत्येक कचेरींत अगर गिरणींत अन्नधान्याच्या वांटपाचें एक दुकान उघडण्याच्या कल्पनेचा उगम वरील सूचनेंतूनच झाला. पण ह्या वस्तूंच्या किंमतींत जर एकदम मोठे चढउतार होऊं लागले आणि रोजंदारांना जर त्या किंमतींत वस्तू द्याव्या लागल्या तर मूळची आपत्ति तशीच चालूं राहील. म्हणून पुष्कळशा पाश्चिमात्य देशांत वेतनाची रहाणीच्या खर्चाच्या निर्देशांकाशीं सांगड घालण्याचे प्रयत्न पूर्णपणें सोडून देण्यांत आले आहेत. भारतांत मात्र रहाणीच्या खर्चाच्या निर्देशांकाचा आधार घेण्याची संवयच पडून गेली आहे. भारतामधील कामगाराला राहणीच्या खर्चाच्या वाढीच्या प्रमाणांत वेतन मागण्याचें समजूं लागलें आहे. तेव्हां अनेक बाजूंनीं विचार करून समाधानकारक तडजोड काढणें आवश्यक आहे.

फो. नं. ४१४८४ [ तार : माधवाश्रम, बॉम्बे
# माधवाश्रम लि.
मोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय
तसेंच ● उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.
● विवाह-कार्यांची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.
● कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.
माधवाश्रम लि., गिरगांव, मुंबई ४

# रेखा फर्निशर्स
२२४, सदाशिव, पुणें.
(टेलिफोन नं ६५१३)
उत्कृष्ट फर्निचरसाठी सुप्रसिद्ध;
घरांची व दुकानांची शोभा वाढविणें
हें आमचें वैशिष्ट्य आहे.

आपलें आरोग्य व सुखशांतीकरितां
' नैसर्गिक ' जीवनसत्त्वें असलेलें
# शुद्ध व साजूक तूप
अवश्य वापरा.
म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, पुणें २.
(फोन नं. ६४३०)

४६ वर्षांवर चालत आलेली कोल्हापुरांतील आद्य सहकारी संस्था !
# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर
स्थापना सन १९१३ इ. —:— रजि. नं. १८३२२

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. १,४३,३६० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,०१,८९० |
| इतर फंडस् | रु. ४८,५३५ |

] सभासद संख्या ३४५५ [
सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
रिकरिंग डिपॉझिटखातें व दैनिक भिशीचे व्यवहार सुरू आहेत.
सोनें चांदीचे जिनसांचे, व्यापारी मालाचे व मुदतबंद ठेवींचे तारणावर ' ब ' वर्ग सभासदांनाहि कर्जें देण्याची सोय केली आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
ए. ए. वागार, मॅनेजर. | द. न. कुलकर्णी, कणेरकर, प्रेसिडेंट.

# नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,

## नासिक.

ज्या असंख्य शेतकरी बंधूंनीं बँकेकडून पैसे घेऊन अधिक उत्पन्न काढलें आणि आपलीच बँक समजून वेळेवर पैसे परत केले त्या सर्वांचें या आनंदाच्या दिवशीं

अभिनंदन

या बँकेंतील सर्व पैका ग्रामीण जीवनाच्या उत्थानासाठींच उपयोगी पडतो.

सर्व प्रकारचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात.

| | | दिन. ३०-९-१९५८ | दि. ३०-९-५९ |
|---|---|---|---|
| (१) भरपाई झालेलें शेअर भांडवल | रु. | १५,०१,५०० | १८,१३,३५० |
| (२) ठेवी | रु. | ७३,५८,७११ | १,०५,६१,२७१ |
| (३) सहकारी सोसायट्यांना दिलेलीं कर्जें | रु. | ९१,०५,००० | १,४३,५४,५६९ |
| (४) खेळतें भांडवल | रु. | १,४५,१०,१५३ | २,०१,९२,७५८ |

वि. गो. पुराणिक, मॅनेजर. | भाऊसाहेब हिरे, चेअरमन.



२४ वर्षे उत्कृष्ट दर्जाची साखर तयार करीत असलेला कारखाना

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.,

## कोल्हापूर.

दीपावलीनिमित्त सर्वांना शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

या कारखान्यांतून प्रथम श्रेणीची उत्तम साखर, डिनेचर्ड स्पिरिट, फर्निचरसाठी उपयुक्त असें फ्रेंच पॉलिश व ऑईल मिल विभागांतून येशेल तेल यांचा नियमित व मोठ्या प्रमाणावर पुरवठा केला जातो.

आमचा माल मुंबई राज्य, म्हैसूर राज्य व भारतांत इतरत्रहि पुरविला जात असून मालाच्या चांगुलपणाबद्दल सर्वत्र ख्याति आहे.

अद्यावत् सुधारणा, कलात्मक रचना व अद्यावत् यंत्रसामुग्री हें आमच्या कारखान्याचें वैशिष्ट्य आहे.

मॅनेजिंग एजंटस,

दि युनायटेड एजन्सीज प्रायव्हेट लि.,

कोल्हापूर.



विविध प्रकारच्या कापडाच्या ‘क्वालिटी’ व ‘गॅरंटी’ मुळें,

सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेलें पुण्यांतील अग्रेसर कापडदुकान

# ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स

‘होम ऑफ क्वालिटी अँण्ड व्हरायटी’

पेरूगेट रोड, पुणें २.

फोन नं. ७३१८



केवळ स्वस्त म्हणून नव्हे, खात्रीचें ठिकाण:— जुन्या गाद्या दुरुस्ती व नव्या खरेदीकरितां

# साठे गादी-कारखाना

फोन नं. ७७५६ मुंजाबाचा बोळ, ४१८ नारायण पेठ, पुणें २.

### "ताजे पेढे येथें विकत मिळतात"

एका दुकानावर वरीलप्रमाणें पाटी होती.

एक : 'विकत मिळतात,' कशाला लिहायला हवं ! तुम्ही ते फुकट देणार आहांत असं कुणालाच वाटणार नाहीं.

दुसरा : 'येथें' कशाला म्हणायला हवं ! तुम्ही दुसऱ्याच्या दुकानांत पेढे थोडेच विकणार आहांत !

तिसरा : 'ताजे' म्हणायची काय जरूर आहे ! तुम्ही शिळे पेढे विकायला लागल्यावर काय होईल तें पहा !

दुकानावरील पाटीवर फक्त 'पेढे' असा शब्द उरला.

### पायीं चालून तर पाहा !

कचेरींत काम करणाऱ्यांना प्रकृति नीट कशी राखावी, ह्याची मोठी चिंता वाटते. पण एक सोपा मार्ग आहे. त्यांनीं कामाला चालत जावें आणि घरीं चालतच परत यावें. ते कचेरीपासून फार दूर राहत असतील, तर त्यापैकी चार मैलांचें अंतर तरी त्यांनीं चालावें. त्यामुळें त्यांचें वजन आवाक्यांत राहील, त्यांना झोप चांगली लागेल आणि डोळ्यांत चमक निर्माण होईल. पावसाळ्यांत छत्री किंवा रेनकोट घेऊन पायीं चालण्यांत मौज वाटूं लागेल.


## * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. छोटालाल डी. जोशी

मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... | ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... | ... | रु. ५६,००,००० |

★ चालू खातें व्याज ½ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर



## दि विटा मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटा

[ जि. द. सातारा ] [ स्थापना : १४ डिसेंबर १९३६ ]

नूतन वर्ष आमचे भागदार व ठेवीदार यांना सुखाचें जावो !

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. १,१८,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. ५०,५८८ |
| इमारत फंड | रु. ५८,००० |
| इतर निधी | रु. २४,४४५ |
| ठेवी | रु. ९,६३,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. १३,००,००० |

बँकिंग चे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीचे दर :—पन्नास न. पै. पासून ते रु. ४·५० न. पै. पर्यंत.
ठेवीचे दराबाबत ऑफिसमध्यें सविस्तर माहिती मिळेल.

ना. मुख्य मंत्री मुंबईराज्य, श्री. यशवंतरावजी चव्हाण, यांचे हस्तें बँकेचे इमारतीचें बांधकाम लौकरच सुरू होणार आहे !

गो. रा. ब्रह्मनाळकर, एलएल्. बी., मॅनेजर. | रा. ब. दिवटे, चेअरमन. | स. वि. कोरे, प्रेसिडेंट.



## ऑइल इंजिन व पंप-स्पेअरपार्ट

मॅन्युफॅक्चरर्स
मे. गद्रे बंधू
इंजिनियर्स
सांगली.

दक्षिण सातारा, मुंबई स्टेट.



### ★ होतकरू संसारी तरुण-तरुणींसाठी ★

श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. २=५० |
| पुढे पाऊल | रु. २=०० |
| तुमचें स्थान कोणतें ? | रु. २=०० |

ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन तुमचें शुभचिंतन प्रभावी करा !

—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—

२५ व्या वर्षांत पदार्पण

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

**प्रगतीचा हा टप्पा गाठतांना आपल्या असंख्य आश्रयदात्यांना साभार अभिवादन करीत आहे !**

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) श्री. धों. कृ. साठे
श्री. फ. दो. पद्मजी श्री. मा. वी. शहा श्री. मा. म. गुत्ते
श्री. रा. ब. म. बा. जांभेकर श्री. म. स. पारखे श्री. वि. सी. शिरगांवकर
श्री. ज. के. रेगे श्री. र. भि. बांठिया

**बँकेच्या ५० शाखा-कचेऱ्या**

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर-तीन शाखा, जव्हेरी बाजार, मराठा मंदिर, शींव, वरळी ), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर, हिंगोली, हुबळी, हैदराबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, खामगांव, लातूर, मोमिनाबाद, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें ( भवानी पेठ, डेक्कन जिमखाना, खडकी, सोमवार पेठ, टिळकरोड, शिवाजीनगर व गणेशखिंड ), परळी वैजनाथ, रत्नागिरी, सांगली, सोलापूर, ( फलटण गल्ली व मोरारजी पेठ ), श्रीरामपूर, ठाणें व यवतमाळ.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होईजे ॥ श्रीज्ञानेश्वरी.

**★ १९३४ रौप्यमहोत्सवी वर्ष १९५९ ★**

स्थापना : २१ सप्टेंबर १९३४

मध्यमवर्गीयांच्या मालकीचा हा एकमेव साखर कारखाना, कै. श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांनीं चिकाटीनें, हिरीरीनें व धडाडीनें चालवून पूर्ण यशस्वी केला आहे. कंपनीच्या रौप्यमहोत्सवाच्या या शुभ वर्षी कै. श्री. चं. गो. आगाशे यांच्या पुण्यस्मृतीस सादर प्रणाम व कंपनीचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना, त्यांच्या साहाय्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

**नवा हंगाम दसऱ्याचे शुभदिनीं सुरू झाला आहे.**

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !

के. व्यं. चांफेकर,
मॅनेजर.

शं. ल. लिमये,
अध्यक्ष.

सहकार्य, परिश्रम व सचोटी

यांचे अधिष्ठानावर शेतकऱ्यांची शक्ति एकवटली म्हणजे पदरांत पडणाऱ्या गोड फळाचा आस्वाद घेत असतांच

लौकरच- **रौप्यमहोत्सव** साजरा करण्याचें भाग्य लाभत असलेली-

## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.,

माळीनगर, जि. सोलापूर. :: स्थापना : १९३२

यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सर्व ग्राहक, इष्टमित्र यांना सुख-समृद्धीचें जावो अशी सदिच्छा व्यक्त करीत आहे.

| हरिभाऊ बळवंतराव गिरमे | मारुतीराव खंडूजी पांढरे | गजानन सहदेव कारभारी |
|---|---|---|
| मॅनेजिंग डायरेक्टर | चेअरमन | एम्. ए., एलएल. बी.<br>मॅनेजर. |

संचालक-मंडळ

१. श्री. शंकरराव भाऊराव राऊत
२. श्री. शंकरराव बाळकूजी इनामके
३. श्री. पंढरीनाथ हणमंतराव गिरमे
४. श्री. जगन्नाथ गणपतराव रासकर
५. श्री. कृष्णाजी लक्ष्मणराव गिरमे
६. श्री. भगवंतराव मारुतीराव जाधव
७. रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके
८. श्री. भगवंतराव गेनूजी गिरमे
९. श्री. रघुनाथराव सोपानराव इनामके

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

( स्थापना १९३८ )

शाखा : पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, खोपोली, ओझर.

संचालक मंडळ

श्री. के. पी. जोशी, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. का. म. महाजन, उपाध्यक्ष | श्री. बी. बी. वाळवेकर |
| श्री. सौ. इंदुमती र. फडके | श्री. रा. भ. गिरमे |
| श्री. रा. प्र. दामोदरे | श्री. न. प. केळकर |

एकूण खेळतें भांडवल रुपये ८५,००,००० चे वर

आम्ही आपली सेवा सतत २१ वर्षे करीत आहोंत !

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर,
B. A., LL. B.
मॅनेजर.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

दीपावली व नूतन वर्ष बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाचें जावो !


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.